संतकथा

संतकथा

नैतिक शिक्षण योजना

Sanskruti Samvardhan Pratishthan
संस्कारेणैव हि संस्कृति

ज्यांच्या अमोल सहकार्यांमुळे नैतिक शिक्षण योजनेचा हा उपक्रम यशस्वी होत आहे आणि संस्कारक्षम वयात मुलांना भारतीय संतांच्या आयुष्याविषयी-शिकवणीविषयी आवड निर्माण होणार आहे अशा सर्व शिक्षक मुख्याध्यापक आणि शाळा संचालकांना......

कृतज्ञतापूर्वक धन्यवाद !

लेखक-संकलक :

१) श्रीमती अलका मुतालिक
२) श्रीमती सुखमणि रॉय
३) श्रीमती वैभवी बुधकर
४) श्रीमती शिरीष अत्रे
५) डॉ. जोगेश्वर नीलकंठ नांदुरकर
६) श्रीमती अलका गोडबोले

प्रकाशक :

श्री. मोहन सालेकर
संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान,
७२/२, खटाव टेरेस,
डॉ.एस्.एस्.राव मार्ग, लालबाग,
मुंबई - ४०० ००१२.

मुखपृष्ठ व सजावट :

श्री. चंद्रशेखर जोशी

संपादक :

श्री. मोहन सालेकर
श्रीमती अलका गोडबोले

प्रथमावृत्ती :

दि. २९ जून, २०२३
आषाढ शुद्ध एकादशी, शके १९४५

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

सहयोगी मूल्य : **रु. १५०/-**

मुद्रक:

सुंदरम आर्ट प्रिटिंग प्रेस
१२, वडाळा उद्योग भवन,
वडाळा, मुंबई- ४०००३१

	संत सूची	पृष्ठ
१)	भगवान गौतम बुद्ध	५
२)	वर्धमान महावीर	९
३)	आद्य शंकराचार्य	१३
४)	गुरु नानक देव	१७
५)	संत तिरुवल्लुवर	२१
६)	रामानुजाचार्य	२५
७)	संत बसवेश्वर	२९
८)	संत नरहरी	३३
९)	संत ज्ञानेश्वर	३७
१०)	संत नामदेव	४१
११)	संत जनाबाई	४५
१२)	मध्वाचार्य	४८
१३)	संत भानुदास	५२
१४)	संत रोहिदास	५५

	संत सूची	पृष्ठ
१५)	संत सूरदास	५८
१६)	संत मीराबाई	६२
१७)	संत एकनाथ	६६
१८)	संत नरसी मेहता	७०
१९)	संत रामदास	७४
२०)	संत चैतन्य महाप्रभू	७७
२१)	संत तुकाराम	८०
२२)	संत तुलसीदास	८३
२३)	भगवान रामकृष्ण परमहंस	८७
२४)	संत गुलाबराव महाराज	९०
२५)	संत गाडगे महाराज	९४
२६)	आचार्य रमण महर्षी	९७
२७)	स्वामी रामतीर्थ	१०१
२८)	योगमूर्ती जनार्दन स्वामी	१०५

प्रस्तावना

२००३ पासून 'संस्कृति संवर्धन प्रतिष्ठान', 'कथारूप रामायण' 'चरित्र रामायण' 'कथारूप महाभारत' आणि 'क्रांतिगाथा' या पुस्तकांच्या आधारे, इयत्ता ५वी ते ८ च्या विद्यार्थ्यांमध्ये मानवी मूल्यांची पेरणी करीत आहे. मुले पुढे जाऊन उत्तम, राष्ट्रप्रेमी आणि सहृदय नागरीक बनावीत या उद्देशानेच प्रतिष्ठान हे काम करीत आहे.

अनेक शिक्षक-मुख्याध्यापक-पालक नेहमी सांगत होते, 'इयत्ता ४ थी च्या मुलांनाही तुमच्या उपक्रमात सहभागी करून घ्या. मुलांना भारतीय संतांची ओळख करून द्या.'

या त्यांच्या सूचनांचा -सल्ल्याचा गांभीर्याने विचार करीत आम्ही या वर्षी 'भारतीय संतांच्या कथा' (संत-कथा) प्रकाशित करीत आहोत. संतांच्या विचारांचा-वर्तनाचा-मूल्यांचा हा अक्षय्य ठेवा उमलत्या वयाच्या मुलांच्या स्वाधीन करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. हे पुस्तकही मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी अशा चार भाषात प्रकाशित होत आहे.

या पुस्तकात आम्ही पूर्व-पश्चिम-दक्षिण-उत्तर या चारी दिशातील राज्यात होऊन गेलेल्या संतांच्या कथांचा आणि त्यांच्या जीवनाविषयी थोड्या माहितीचा समावेश केला आहे. त्यामुळे संपूर्ण भारतभर एकात्मता साधत, भक्तिरसाने आणि सामाजिक समरसतेने परिपूर्ण असणारे विचार मांडणारे संत वास्तव्य करीत-भारतभर भ्रमण करीत, लोकांना चांगल्या गोष्टी शिकवीत होते हे मुलांच्या लक्षात येईल.

एक बदल मात्र आम्ही करीत आहोत. यावर्षीपासून 'कथारूप रामायण' हे पुस्तक चौथीसाठी असेल तर 'भारतीय संत कथा' हे इयत्ता ५ वी साठी असेल. चरित्र रामायण, कथारूप महाभारत आणि क्रांतिगाथा ही नेहमीप्रमाणे अनुक्रमे इयत्ता ६ वी, ७ वी आणि ८ वीसाठी असतील.

या आमच्या उपक्रमात या पुस्तकाच्या संदर्भात लेखन-संकलन करणाऱ्या व्यक्तिंनी आम्हाला, हे ईश्वरी कार्य आहे असे समजून जे बहुमोल सहाय्य केले, त्याबद्दल आम्ही ऋणी आहोत.

चित्रकार श्री. चंद्रशेखर जोशी यांच्या अनुरुप, सुंदर चित्रांनी पुस्तक आकर्षक बनले आहे. त्यांचेही मन:पूर्वक आभार!

हे पुस्तक आपणा सर्वांना आवडेल आणि आमच्या संपूर्ण उपक्रमास आपले सहकार्य लाभेल, असा आम्हाला विश्वास वाटतो.

श्री. मोहन सालेकर,

संस्थापक - मानद सचिव, **संस्कृति संवर्धन प्रतिष्ठान**

१. भगवान गौतम बुद्ध

गौतम बुद्ध यांना महात्मा बुद्ध, भगवान बुद्ध, सिद्धार्थ, आणि शाक्यमुनी या नावांनीही ओळखले जाते. भगवान गौतम बुद्ध यांचे विचार आजही मोठ्या प्रमाणावर मानले जातात. भगवान गौतम बुद्ध यांना शांती व अहिंसेचे प्रतीक मानले जाते.

गौतम बुद्धांचा जन्म इ.स. पू. ५६३ मध्ये लुंबिनी (नेपाळ) येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शुद्धोदन आणि आईचे नाव महाराणी महामाया होते.

बुद्ध या शब्दाचा अर्थ आहे. 'आकाशाएवढा प्रचंड ज्ञानी'. ही उपाधी गौतम बुद्धांनी स्वप्रयत्नांनी मिळविली आहे.

गौतम बुद्ध हे मनोविजयी होते, हे सर्वज्ञात आहे. ते नेहमी शांत, सस्मित आणि प्रसन्न असत. त्यांच्या सहवासात येणाऱ्या लोकांनाही या प्रसन्नतेचा लाभ होत असे. पण काही लोक असेही होते की, त्यांना गौतमांना मिळणारा सन्मान सहन होत नसे. त्यांचा अगदी जळफळाट होत असे. असाच एक माणूस एकदा 'गौतमांना रागवावयास भाग पाडायचेच, त्यांचा अपमान करायचाच, फजिती करायचीच,' असे ठरवून त्यांच्या प्रवचनाच्या ठिकाणी आला. प्रचंड जनसमुदाय जमला होता. तथागत शांतपणे त्या समुदायाला मार्गदर्शन करत होते. तेव्हा हा माणूस तेथे पोचला आणि सर्वांसमोर त्याने गौतम बुद्धांना पाहून 'न भूतो न भविष्यति' असे अत्यंत वाईट शब्द वापरले. जमलेले लोक अस्वस्थ झाले. संतापले, पण तथागत शांत होते. त्यांच्या चेहऱ्यावरील स्मित जरासेही ढळले नव्हते. तो माणूस बराच वेळ शिव्याशाप देतच होता. बऱ्याच वेळाने तो थकून थांबला व डोळे मोठे करून गौतम बुद्धांकडे पाहत राहिला.

गौतम बुद्धांनी स्मितहास्य केले आणि त्याच्याकडे पाहत शांतपणे म्हणाले,

'मी तुला एक प्रश्न विचारू का?'

'विचारा.' तो गुरगुरला.

'जर तुला कोणी एखादी वस्तू भेट दिली आणि ती भेट स्वीकारण्यास तू नकार दिलास तर त्या भेटीवर मालकी हक्क कोणाचा?'

'मालकी हक्क?' त्याने प्रतिप्रश्न केला.

''हो, ती भेटवस्तू कोणाकडे राहील?'' गौतम बुद्धांनी विचारले, ''इतकेही कळत नाही? सोपे आहे, ती वस्तू त्या देणाऱ्याकडे राहील!'' तो माणूस म्हणाला.

'अगदी बरोबर!' तथागत स्मित करीत म्हणाले, 'मग जर मी तुझे हे शिव्याशाप स्वीकारण्यास नकार दिला तर ते कोणाकडे राहतील?''

तो माणूस सुन्न झाला आणि गौतम बुद्धांच्या चरणी लागला.

म्हणूनच नेहमी लक्षात ठेवणे आवश्यक आहे की जगात कोण आपल्याला काय बोलेल यावर आपण नियंत्रण ठेवू शकत नाही. पण त्यांच्या चांगल्या किंवा वाईट बोलण्याचा स्वीकार करणे, न करणे हे पूर्णपणे आपल्याच हाती असते.

अशी शिकवण देणाऱ्या या महान विभूतीचे वयाच्या ८० व्या वर्षी इ.स. पूर्व ४८३ मध्ये उत्तर प्रदेशमधील कुशीनगर येथे महापरिनिर्वाण झाले.

गौतम बुद्धांची ही आणखी एक आपल्याला आश्चर्यचकित करणारी कथा!

गौतम बुद्धांशी संभाषण झाल्यावर एका व्यक्तीत झालेल्या आमूलाग्र बदलाची! गौतम बुद्ध आणि अंगुलिमालाची! अंगुलिमाला हा शब्द पाली भाषेतला आहे. आणि त्याचा अर्थ आहे 'बोटांचा हार'.

फार पूर्वी मगध राज्यातील एका गावाची गोष्ट आहे. त्या गावातील सर्व माणसे खूप घाबरलेली होती. कारण जवळच्या जंगलात एक भयंकर डाकू राहत होता. तो आपण मारलेल्या व्यक्तीचे एक बोट कापून घेत असे. अशा ९९ बोटांची माळ तो गळ्यात घालीत होता. म्हणूनच त्याला अंगुलिमाला असे नाव पडले होते.

एक दिवस जंगलाजवळच्या त्याच गावात महात्मा बुद्धांचे येणे झाले. लोकांनी त्यांना नमस्कार केला. आदरातिथ्य केले. काही दिवस राहिल्यावर बुद्धांनी गावातील लोकांना विचारले, ''तुम्ही

सगळे इतके घाबरलेले का असता ?''

लोकांनी त्यांना अंगुलिमालाची गोष्ट सांगितली. ती ऐकून भगवान बुद्धांनी त्या जंगलाजवळ जाण्याचा निर्णय घेतला. लोकांनी परोपरीने त्यांची विनवणी करून सांगितले, ''स्वामी, तिकडे जाणे धोक्याचे आहे. तो कोणालाही सोडत नाही.''

भगवान बुद्धांनी धीर देत त्यांना सांगितले, 'म्हणूनच मी तिकडे जाणे आवश्यक आहे. त्याला माझी गरज आहे.'

भगवान बुद्ध वनाकडे जात राहिले. काही वेळात ते जंगलात पोहोचलेदेखील! महात्म्याच्या वेषात, या एकट्या माणसाला शांतपणे येताना पाहून अंगुलिमालाला आश्चर्य वाटले. त्याने मनात विचार केला, 'आता याला संपवून मी माझ्या गळ्यातील माळ १०० बोटांची करेन.' बुद्ध चालतच

होते. अंगुलिमाला त्यांच्यामागे धावू लागला. पण तो त्यांना पकडू शकला नाही. मग तो ओरडला, ‘‘अरे वाटसरू, थांब! नाही तर मी तुला ठार मारेन.’’

देव म्हणाले, ‘‘तू मला थांबायला सांगत आहेस. मी तर थांबलोच आहे, स्थिर आहे. तूच स्थिर नाहीस.’’ अंगुलिमाला म्हणाला, ‘‘उगाच काही तरी बोलू नकोस. पण तू धाडसी दिसतोस. या जंगलात येऊन माझ्यासारख्या शक्तिमान शूरालाही घाबरत नाहीस.

भगवान बुद्ध म्हणाले, ‘‘जर तुम्ही स्वत:ला खूप शक्तिशाली समजत असाल तर झाडाची काही पाने तोडून आणा.’’अंगुलिमालाने काही पाने तोडून आणली. आता भगवान बुद्ध म्हणाले, ‘‘आता त्यांना पुन्हा झाडाला जोड.’’

अंगुलिमाला म्हणाला, ‘‘तुम्हाला समजत नाही का? एकदा तुटलेली/तोडलेली वस्तू पुन्हा जोडता येत नाही.’’

भगवान बुद्ध म्हणाले, ‘‘मी तुम्हाला तेच सांगू इच्छितो, की जेव्हा तुमच्यात काहीही जोडण्याची शक्ती नसेल तर काहीही तोडण्याचा तुम्हाला अधिकार नाही. कोणाला जीवन देण्याची शक्ती नसेल तर मारण्याचा अधिकार नाही.’’

बुद्धांचे तेज आणि तरीही संयमपूर्वक पण अधिकारवाणीने बोललेल्या या शब्दांचा अंगुलिमालावर मोठा प्रभाव पडला. त्याने तत्क्षणी आपले शस्त्र खाली टाकले आणि म्हणाला, ‘‘आजपासून मी कोणताही अधर्म करणार नाही. मला आपल्याजवळ राहण्याची अनुमती द्या. ’’ आपल्या पायाजवळ नतमस्तक झालेल्या अंगुलिमालाला भगवानांनी उठवले आणि त्यानंतर अंगुलिमाला संन्यासी झाला.

बोध : योग्य मार्गदर्शन मिळाले तर माणूस दुष्कृत्य सोडून चांगल्या मार्गावर येतो.

प्रश्न :

१) अंगुलिमालाची गोष्ट ऐकून तुम्हाला कोणत्या गोष्टीची आठवण झाली?

२) भगवान बुद्धांना एका माणसाने कोणती गोष्ट भेट म्हणून दिली होती?

३) बुद्धांचे जन्म गाव लुंबिनी आजच्या जगात कोठे आहे?

२. भगवान महावीर

भारतीय साहित्य आणि मानसात एक प्रसिद्ध श्लोक आहे-

एतद्देश प्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः।
स्वं स्वं चरित्र शिक्षरेन पृथ्वियां सकल मानवा।।

म्हणजे या पृथ्वीतलावर भारत असा एक देश आहे की या देशात जन्म घेतलेल्या महापुरूष, संत आणि महात्मे यांनी आपल्या जीवनचरित्राने आणि आचरणाने जगभरच्या लोकांना नित्यनूतन मार्ग दाखवले. त्या महात्म्यांपैकीच एक जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर. (मूळ नाव वर्धमान) त्यांनी तत्कालीन भारतीय समाजात आपल्या व्यक्तित्व आणि कर्तृत्वाने एका नवीन जीवनपद्धतीची सुरुवात करीत, सद्‌भाव, शांती आणि बंधुत्व या भावना स्थापित केल्या. याच जीवनपद्धतीला आज आपण 'जैन धर्म' म्हणून ओळखतो.

भगवान महावीरांचा जन्म इ.स. पूर्व ५६६ मध्ये मगध देशात वैशाली नगरातील कुंडपूर मधील राजवाड्यात झाला. त्यांच्या पित्याचे नाव सिद्धार्थ आणि आईचे त्रिशला.

राजा सिद्धार्थाच्या गजशाळेत शेकडो हत्ती होते. एक दिवस चारा खाण्यावरून काही तरी गोंधळ झाला आणि दोन हत्ती एकमेकांबरोबर भांडू लागले. एक हत्ती उन्मत्त झाला आणि गजशाळेतून बाहेर पडला आणि जे समोर येईल ते उध्वस्त करू लागला. घरे मोडली, वृक्ष उखडून फेकून दिले आणि सगळेजण भयभीत झाले. कोणी माहूत त्याला शांत करू शकला नाही. वर्धमानला ही गोष्ट कळली आणि त्याने भयग्रस्त नागरिकांना आश्वस्त केले आणि स्वतः हत्तीच्या शोधात निघाला.

प्रजेचा वर्धमानवर विश्वास होता. त्याची शक्ती आणि पराक्रम यांची जाणीव होती. शोधता शोधता वर्धमान आणि हत्ती समोरासमोर आले. हत्ती तर त्यांनाही तुडवून लावण्यासाठी धावतच येत होता. पण वर्धमान एका जागी स्थिर उभे होते. त्यांना तसे उभे पाहून गजराजाला काय वाटले

माहीत नाही, पण तोही स्थिर उभा राहिला.

त्याच्या दृष्टीला दृष्टी देत महावीरांनी गोड आवाजात म्हटले, ''गजराज! शांत हो पाहू! मागील जन्मीच्या वाईट कृत्यांमुळे तुला हा पशूजन्म प्राप्त झाला आहे. या जन्मीही हिंसा सोडली नाहीस तर पुढील जन्मी नरकयातना भोगाव्या लागतील. आत्ताच जागा हो आणि शांत हो!''

हत्तीला जणू त्यांचे बोलणे कळले आणि त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. त्याने सोंड वर करून वर्धमान महावीराला नमस्कार केला आणि तो शांतपणे गजशाळेत परत गेला.

आपल्या माता-पित्याप्रमाणे महावीरांवर देखील पार्श्वनाथांच्या शिकवणुकीचा प्रभाव होता. जसा एखादा साधारण मानवप्राणी संसाराच्या मायामोहात गुंतलेला असावा तसेच तेही दिसत होते. पण अंतरातून त्यांची धर्मावर श्रद्धा जडली होती आणि संसारसुखाविषयी उदासीनता निर्माण झाली होती. क्षत्रिय योद्ध्यात वाढल्यामुळे योद्ध्यांचे गुण त्यांच्या ठायी एकवटले होते, पण आताचे हे युद्ध दुसऱ्या कोणा शत्रूशी नव्हते तर ते क्रोध, कपट, लोभ, मोह यांच्याशी होते. त्यांच्यावर विजय, तोच खरा विजय असे त्यांचे मत होते. आयुष्य क्षुद्र आणि क्षणभंगूर होय असे मानून त्यांना शाश्वत जीवनाची

ओढ लागली होती.

त्यांनी आपल्या आईला साष्टांग नमस्कार केला आणि गंभीरपणे म्हणाले, ''आई, तू सारे जाणतेस. दु:ख, व्यथा व रोगराई यांनी भरलेल्या या संसारात सुख, आनंद आहे तरी कुठे? मी आत्मज्ञानाच्या शोधात जात आहे. दया कर आणि मला तुझा आशीर्वाद लाभू दे.''

आपले नगर सोडून ते शांतवन नावाच्या उपवनात आले. इ.स. पूर्व ५६९ ते ५५७ इतकी बारा वर्षे कठोर संन्यासी जीवन घालवले. देहाची आसक्ती नव्हती. त्याच्या रक्षणाची चिंता नव्हती. आत्मज्ञानावर त्यांचे मन केंद्रित झाले होते. कुठेही एक दिवसाहून जास्त राहत नसत. परंतु पावसाळ्यात मात्र एके ठिकाणी वस्तीला असत. अशाच एका चातुर्मासात ते अस्थिग्रामात म्हणजे आजच्या बंगालमधील बरसान इथे राहिले. त्या गावाच्या वेशीजवळ शूलपाणीचे देऊळ आहे. तिथे जायला लोक घाबरत असत. ते शूलपाणी मंदिरात राहिले. वादळ, वीज-पाऊस, अनेक प्राण्यांचे घाबरवणारे आवाज येत होते पण वर्धमान स्थिर होते.

अनेक प्रदेश हिंडता हिंडता ते जृंभिका गावाला पोहोचले. ऋतुकूल नदी गावाजवळून वहात होती. एका वृक्षाखाली ते आसनस्थ झाले. आराधनेत आणि प्रार्थनेत ते इतके तल्लीन झाले की त्यांना भोवतालच्या जगाचे भान उरले नाही.

भारतीय पंचांगाप्रमाणे वैशाख शुक्ल दशमीच्या दिवशी इ.स.पूर्व ५५७ ला त्यांना दिव्य ज्ञानाची अनुभूती झाली. महावीर 'तीर्थंकर' झाले.

'तीर्थंकर' पदवीनंतर महावीरांनी जनसामान्यांना धर्माचा मार्ग दाखवला. पंचव्रत म्हणजे अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह .

अहिंसा म्हणजे प्राणिमात्राला दु:ख न देणे.

सत्य म्हणजे खोटे न बोलणे.

क्रोध आणि तिरस्कार यांचा त्याग करणे.

अस्तेय म्हणजे चोरी न करणे.

दुसऱ्याच्या संपत्तीचा लोभ न धरणे.

ब्रह्मचर्य म्हणजे संयम बाळगणे.

अपरिग्रह म्हणजे आपल्याजवळील गरजेपेक्षा जास्त वस्तू दुसऱ्या गरजूंना देणे.

महावीरांनी ३२ वर्षे धर्मप्रसाराचे काम केले आणि इ.स. पूर्व ५२७ च्या दीपावलीच्या दिवशी

महावीरांना निर्वाणपद प्राप्त झाले.

सत्ताधारी राजांना समाज विसरून जातो, पण धर्मसंस्थापकांची स्मृती चिरंतन असते.

महावीरांचे आदर्श जीवन हे उघड्या ग्रंथाप्रमाणे आहे. ते म्हणत की कुणीही त्यांचे अनुकरण करीत आपले ध्येय गाठू शकतो.

बोध : अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य (संयम) आणि अपरिग्रह या पंचतत्त्वांच्या पालनाने आयुष्य सार्थकी लागेल.

प्रश्न :

१) महावीर हे जैन धर्माचे कितवे तीर्थंकर होते?

२) महावीरांनी समाजाला कोणत्या भावना स्थिर करण्यास सांगितले?

३) रागावलेल्या गजराजाला महावीरांनी कसे शांत केले?

३. आद्य शंकराचार्य

भारताच्या इतिहासातील उत्तम तत्त्ववेत्ता आणि तत्त्वज्ञानाचे शिक्षक म्हणून आद्य शंकराचार्यांचे नाव अग्रस्थानी राहते. आपले अद्वैत वेदांताचे तत्त्वज्ञान हेच खरेखुरे तत्त्वज्ञान आहे, हा त्यांचा विश्वास होता. भारतीय संस्कृतीवर त्यांनी जो ठसा उमटवला त्याचे महत्त्व काही प्रमाणात आजही कायम आहे. म्हणून भारतीय वाटचालीत त्यांचे स्थान अद्वितीय समजता येते.

आचार्यांच्या जीवनकालाविषयी अनेक वाद निर्माण झाले. पण लोकमान्य टिळकांनी शृंगेरी मठातील उल्लेख तपासून आचार्य सन आठव्या शतकात झाले, असे मानले आणि इतरही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पुराव्यांनी तेच सिद्ध केले.

बौद्ध धर्मप्रचाराचे रहस्य बुद्ध व त्याचा संघ यांच्या समाजाच्या सर्व स्तरावरील सर्वांपर्यंत पोहोचण्याच्या उपक्रमात आढळते. आचार्यांनी हे मर्म जाणले आणि आपले शिष्य - अनुयायी आणि सामान्य लोकांना बरोबर घेऊन संपूर्ण भारतभर भ्रमण केले.

केरळातील नंबुद्री कुटुंबात कालडी गावात जन्म झालेल्या शंकराचे पिता अल्पायुषी होते आणि त्यामुळे त्यांच्या संगोपनाची जबाबदारी त्यांच्या आईवरच पडली. आईचे कष्ट आचार्यांच्या नजरेतून सुटले नाहीत. आणि त्यामुळे जीवनभर त्यांच्याही मनात आईविषयी अनुपम प्रेम होते.

अत्यंत बुद्धिमान आणि एकपाठी असामान्य ग्रहणशक्ती आणि स्मरणशक्तीच्या बळावर शंकराचार्यांनी अवघ्या आठव्या वर्षी चारही वेदांमध्ये पारंगतता मिळवली, तर बाराव्या वर्षी त्यांची सर्व दर्शनशास्त्रांची तयारी पूर्ण झाली. कांचीला आपले प्राथमिक शिक्षण संपवून, आईकडून संन्यास घेण्यासाठी अनुमती मिळवून ते गुरूच्या शोधात असताना नर्मदेच्या काठी, मध्य प्रदेशातील गोविंद गुरूंजवळ

पोहोचले. त्यांच्याच कृपेने त्यांचे शिक्षण सुरू झाले. याच काळात त्यांची अद्वैतावरील विचारधारा पक्की झाली. गुरूच्या सहवासात बृहदारण्य उपनिषदावरील भाष्य आणि अनेक शिवस्तोत्रे पूर्ण केली आणि त्यांच्या आज्ञेवरूनच भ्रमण करायला सुरूवात झाली आणि ब्रह्मसूत्रे, उपनिषदे आणि भगवद्‌गीता यांवरील भाष्यरचनेला सुरुवात झाली. निरनिराळ्या पवित्र स्थानांना भेट देत देत ते काशी क्षेत्राला पोहोचले. काशीची आद्यदेवता जी अन्नपूर्णा देवी तिच्याजवळ त्यांनी अभूतपूर्व अशी भिक्षा मागितली, ''हे पार्वती माते, ज्ञान आणि वैराग्य प्राप्त करण्याचे सामर्थ्य, तू मला दे।''

काशीमध्ये असतानाच एक विलक्षण प्रसंग घडला.

पहाटेच्या वेळीच ते स्नानासाठी नदीवर जाऊ लागले. वाटेत, तेव्हा हीन मानलेल्या जातीतील एक माणूस त्यांना भेटला. शंकरांनी त्याला ओरडून सांगितले, ''अरे! दूर हो. तू अस्पृश्य आहेस. मला स्पर्श करू नकोस.'' त्यावर त्या माणसाने अगदी विलक्षण उत्तर दिले, ''तू कोणाला अस्पृश्य म्हणत आहेस? या शरीराला की आत्म्याला? आपले दोघांचेही शरीर एकाच मातीतून निर्माण झाले आहे. त्यात राहणारा आत्मा तर कशानेही दूषित, अपवित्र होत नाही. शिवाय जो आत्मा सर्वव्यापी आहे, तो एकमेकांपासून कोणते अंतर ठेवणार? म्हणून आपल्यात कोणता फरक आहे?'' शंकरांनी या उत्तरावर क्षणार्धात विचार केला. आपला सर्व अहंकार झुगारून दिला आणि त्या माणसाच्या पायावर लोळण घेतली. ज्याने वेदांतातील तत्त्वज्ञान इतका सहजसोप्या भाषेत आणि प्रभावीपणे सांगितले, तो सर्वसामान्य मनुष्य असूच शकत नाही. या विचारांनी त्याला प्रत्यक्ष ईश्वराचा अंश मानून त्याला नमस्कार केला.

'प्रत्येक मनुष्यात एकच ब्रह्मतत्त्व आहे', या विचारांचा आजही भारतीय मानसावर प्रभाव आहे. याच विचारातून युद्धजन्य किंवा अन्य संकटग्रस्त भागातून भारताने केवळ भारतीयच नाही तर इतर ४८ देशांतील नागरिकांची आधुनिक काळात सुटका केली.

महिष्मती ही मगध प्रांताच्या उत्तरेला असलेली एक नगरी. मंडनमिश्र या पंडिताचा तिथे निवास होता. आचार्यांची शिकवण ही अद्वैतवादी होती. 'ब्रह्मज्ञान होणे म्हणजे स्वतःचा परिचय होणे. तिथपर्यंत पोहोचण्यासाठी कर्म करायलाच हवे. मात्र त्यात अपयश आले तर दुःख न बाळगता तटस्थ व्हावे, ही क्षमता अंगी निर्माण होण्यासाठी ज्ञानमार्गाची उपासना करायला हवी. नेमून दिलेली कर्तव्ये मन लावून करताना मी कोणी वेगळा नसून मी म्हणजेच ब्रह्म हे जाणून घ्यायला हवे,' असे आचार्य सांगत.

मंडनमिश्र मात्र कर्मकांडाचे एकनिष्ठ उपासक होते. मंडनमिश्र यांच्या घरचा पत्ता विचारला असता मिळालेले उत्तर अगदी लोकविलक्षण होते. ज्या वाड्याच्या दारावर असलेल्या पिंजऱ्यातील पोपट-मैनाही आपापसात ''वेदांना स्वत:चे प्रामाण्य आहे का? कर्माचे फळ कोण देतो? जग शाश्वत आहे की अशाश्वत?'' यांसारखी वेदांत चर्चा उच्चरवाने करतात, ते मंडनमिश्रांचे घर आहे, असे समजा.

मुलांनो, घरामध्ये जे बोलले जाते, जसा विचार केला जातो, तसेच घरातील पाळलेले पक्षी बोलतात. म्हणूनच आपण नेहमी उत्तम बोल बोलले पाहिजेत.

शंकराचार्यांनी मंडनमिश्रांबरोबर वाद करण्याचे ठरले. अट होती, जो पराजित होईल त्याने दुसऱ्याचे शिष्यत्व पत्करावे. उभयतांना अट मान्य होती. आणि वादातील जय-पराजयाचा निर्णय उभयभारती या मंडनमिश्रांच्या पत्नीने करावा, असे ठरले. त्या काळात स्त्रियाही वेदांचा अभ्यास करीत होत्या.

मंडनमिश्र केवळ कर्मावर भर देत होते - ''जसे कर्म तसे फळ, ही त्यांची धारणा होती. ब्रह्म



ही कल्पना आकलन करण्यापलीकडे आहे.'' तर शंकराचार्य म्हणाले, ''केवळ भौतिक जीवनानंदाचा विचार करून चालणार नाही. दैनंदिन जीवनातील नित्यकर्मांना विरोध नाही पण कर्माला मर्यादा आहेत. जीव आणि शिव वेगळे नसून ते एकच असल्याने अविनाशी आहेत आणि सर्वश्रेष्ठ आनंदासाठी अध्यात्मिक ज्ञान हे सर्वस्व आहे.''

अशा प्रकारे सखोल जात वादविवाद अनेक दिवस चालला. अखेर मंडनमिश्र पराजित झाले. त्यांनी शंकराचार्यांचे शिष्यत्व पत्करले.

बौद्धिक वादविवादाबरोबरच त्यांनी अनेक देवतांच्या स्तुतिपर स्तोत्रे रचली. देवळांचा जीर्णोद्धार केला. एका शिष्याने विचारले, ''आचार्य, मूर्तीला पुजणे म्हणजेच मी आणि मूर्तिरूप ईश्वर हे दोन आहेत. असा अर्थ होत नाही का?''

आचार्य म्हणाले, ''सर्वसाधारण मनुष्य अद्वैत मत समजू शकत नाही. त्यासाठीच भक्तिमार्गाची आवश्यकता आहे. लोकांना श्रद्धेसाठी एखादे स्थान किंवा मूर्ती यांची आवश्यकता असते आणि भक्तांना हळूहळू अद्वैत मार्गाकडे नेता येते.''

अद्वैत वेदांत शिकवण्यासाठी आणि त्याच्या प्रसारासाठी त्यांनी भारतभर चार पीठे - चार मठांची स्थापना केली. दक्षिण भारतात श्रृंगेरी मठ, ओरिसा म्हणजे पूर्वेकडे गोवर्धन मठ, द्वारकेत शारदा मठ आणि उत्तरेला उत्तराखंडातील बद्रिकाश्रमात ज्योर्तिमठ.

बोध : ज्ञानप्राप्तीने जीवनाचे सार्थक होते.

प्रश्न :

१) शंकराचार्यांनी कोणत्या तत्त्वज्ञानाचा प्रचार केला?

२) शंकराचार्यांनी कोणत्या धर्माचे पुरुरत्थान केले ?

३) शंकराचार्यांनी स्थापित केलेल्या कोणत्याही दोन मठांची नावे आणि मठांच्या स्थळांची नावे सांगा.

४. गुरुनानक देव

शीख धर्माचे प्रवर्तक आणि शीख गुरु परंपरेचे पहिले गुरु गुरुनानक. पूर्ण विश्वात गुरु नानक यांचे नाव आदराने घेतले जाते. हे भारतीय संत परंपरेतील एक महान संत होते. ज्यांनी विश्वाला मानवतेचा अनुपम संदेश दिला.

आज पश्चिम पाकिस्तानात असलेल्या तलवंडी (आज याचे नाव 'ननकाना' आहे) या गावात मेहरा कल्याणदास (लोक यांना मेहता कालूराम या नावाने ओळखत.) आणि माता तृप्ता यांच्या पोटी १५ एप्रिल, १४६९ रोजी नानकांचा जन्म झाला.

नानक सात वर्षांचे होताच त्यांना पाठशाळेत पाठविण्यात आले पण त्यांना शाळेतील शिक्षणात अजिबात रस नव्हता. मग वडिलांचे मालक रायबुतार यांनी वडिलांना सल्ला दिला, 'याला फारशी भाषा शिकवू या. मग आपण याला आपल्याच कार्यालयात नोकरी देऊ.' फारशी भाषा शिकण्यास नानक मौलवीकडे जाऊ लागले. नानकांनी शिक्षकांना विचारले, 'गुरुजी, आपण मला काय शिकवणार आहात?' गुरुजी म्हणाले, 'मी तुला दुकानदारीचा सगळा व्यवहार-हिशोब शिकवणार आहे आणि हिंदी शिकवणार आहे.' पण यातही काहीच रस नसल्याने नानक काहीच शिकले नाहीत.

त्यांचे पिता त्यांना म्हशी चरायला घेऊन बाहेर पाठवीत पण बाहेर जाऊन ते प्रभु चिंतनात मग्न होत आणि म्हशी कुठच्या कुठे निघून जात. एक दिवस ते म्हशी चरायला घेऊन गेले असता, प्रभुचिंतनात मग्न झाले आणि पाखरांचे थवेच्या थवे येऊन कणसे खायला लागले. जेव्हा त्यांनी डोळे उघडले तेव्हा पाखरांचा हा आनंद पाहून ते मोठ्या उत्साहाने गायला लागले –

'साई की चिडियाँ, साई का खेत।
खाओ री चिडियों, भर-भर पेट।।

नानक देवांची बहीण नानकी हिने नानकला आपल्याबरोबर सुलतानपुरला नेले. तिथे नबाबाने त्यांना धान्य गोदामाचा प्रमुख म्हणून नोकरी दिली. या मोठ्या अधिकार पदावर नोकरी करीत असता त्यांनी गरीब आणि निर्धन लोकांना बरीच मदत केली. एक दिवस नानक लोकांना धान्य मोजून देत असता एक-दोन-तीन असे मोजता मोजता 'तेरा' या संख्येवर आले आणि अनेकदा धान्य मोजूनही 'तेरा' हीच संख्या मोजत राहिले.

ही घटना पाहून त्यांचे विरोधक चिडले आणि त्यांनी नबाबाजवळ चहाडी केली. 'नानक आपले धान्यगोदाम लोकांना लुटून देत आहे.'

खानाने नानकांना एका खोलीत बंद करून ठेवले आणि गोदामातील धान्य तपासणीचा आदेश दिला. तपासणीनंतर सर्व धान्य बरोबर आहे असा निर्वाळा अधिकाऱ्यांनी दिला. तेव्हा विरोधकांची तोंडे बंद झाली.

वस्तुस्थिती अशी होती की नानक गोरगरिबांना तेवढेच अन्न मोफत वाटत असत जेवढे त्यांना वेतन मिळत होते.

अशा प्रकारे १०-१२ वर्षे निघून गेली. नानक देशभ्रमण करीत एमनाबादला (सध्याचा पाकिस्तान) आले. तेथे मलिकभागो नावाचा एक श्रीमंत गृहस्थ राहत होता. त्याने ग्रामभोजनाचा एक मोठा कार्यक्रम आयोजित केला होता. नानकांबरोबर त्यावेळी मर्दाना नावाचा एक शिष्य होता. त्याला वाटले की, नानक या श्रीमंताच्या भोजनात सहभागी होण्यास येथे आले आहेत. परंतु नानक नगरात गेले आणि एका मोडक्या तोडक्या घरासमोर उभे राहून त्यांनी 'सतकरतार' असा आवाज दिला. मर्दाना बेचैन होऊन त्यांच्याकडे पाहू लागला. दरवाजा उघडला आणि अत्यंत गरीब माणूस बाहेर आला. तो हात जोडून नानकांना म्हणाला, ''महात्माजी, आपण चुकून या गरिबाच्या घरी आला आहात, मलिकभागोचे घर पुढे आहे. या, मी आपणांस त्या घरी नेऊन पोहोचवितो.''

नानक स्थिर उभे राहिले आणि हलकेच हसून म्हणाले,''हे बन्धुवर लालो, आम्ही तुझे अतिथी. आम्ही तुला भेटण्यास आलो आहोत.'' त्यांचे शब्द ऐकून लालो गहिवरला आणि त्यांना आपल्या घरात घेऊन गेला. ज्वारीची भाकर आणि भाजी शिजवून त्यांना खाऊ घातली. नानकही आनंदाने भोजन करीत अन्नाची प्रशंसा करू लागले. लालो आनंदाने फूलून गेला.

अशा प्रकारे मानवा-मानवात एकात्मता निर्माण करून त्यांनी ईश्वरभक्तीचे महत्त्व सांगितले. त्याकाळी प्रवास पायी करावा लागत असे आणि त्यांनी तिबेट, मानसरोवर व चीनमध्येही प्रवास

केला. मानसरोवरच्या प्रदेशातील गुंफात गुरु नानकांचीही प्रतिमा आहे. यालाच तिबेटी लामा लोक ‘अमृतसरचे गुरु रिम्पोचे’ किंवा ‘भद्रगुरु’ या नावाने संबोधतात.

चीनमध्ये गुरु नानकांच्या आगमनाचे प्रतीक म्हणून एका शहराचे नाव ‘नानकिंग’ असे ठेवण्यात आले आहे.

त्यानंतर ते सौदी अरब, इराक, आफ्रिका आदी देशात गेले. बगदादचा खलिफा जेव्हा त्यांना भेटण्यास आला तेव्हा गुरूनानक लहान लहान दगड वेचत होते. खलिफाने आश्चर्याने विचारले, ‘हे आपण काय करीत आहात.’ नानक म्हणाले,‘‘आम्ही मृत्यूनंतर याचा उपयोग परलोकात करणार आहोत.’ खलिफा हसला आणि म्हणाला, ‘गुरुजी, हे दगड परलोकात कसे जातील?’ नानक शांत स्वरात म्हणाले, ‘जर आपण जमा केलेली संपत्ती परलोकात जाऊ शकते, तर हे दगड का जाणार नाहीत?’

हे उत्तर ऐकून खलिफाचे डोळे उघडले आणि त्याने ताबडतोब आपली जमा केलेली संपत्ती गरजू लोकांना वाटून दिली. यानंतर नानकांनी खलिफाला जो आदेश केला तो ‘नसीहतनामा’ या

ग्रंथात समाविष्ट केला आहे.

मक्केमध्ये नानक पवित्र स्थानाकडे पाय करून झोपले. त्यामुळे तेथील लोक नाराज झाले, म्हणाले, 'आपण या पवित्र दिशेला पाय करून झोपू नका. ती पवित्र दिशा आहे.' तेव्हा नानक म्हणाले, 'माझे पाय उचलून आपण अशा दिशेला ठेवा, जी पवित्र नाही.'' लोकांना आपली चूक उमगली आणि ते शांत झाले.

प्रसिद्ध संत नामदेवांशीही त्यांची भेट झाली असा उल्लेख आहे. गुरु ग्रंथसाहेबमध्येही नामदेवांच्या अभंगांचा समावेश केलेला आहे.

गुरु नानक म्हणत, 'दिवसरात्र परमेश्वराचे स्मरण करा. साधू-संतांचा आदर करा. त्यांची सेवा करा. एखाद्या सिंहासारखे जीवन जगा. कुत्र्याचे जीवन जगू नका!

नानक जीवनभर कर्मच करीत राहिले. ते स्वत: शेतीवर काम करीत. आपल्या आयुष्यातील शेवटचे दिवस त्यांनी करतारपूरला घालविले. बंधू लहाणाजी हे नानकांचे उत्तराधिकारी म्हणून 'अंगद' या नावाने प्रसिद्ध झाले. शेवटी ७ सप्टेंबरला १५३९ रोजी गुरु नानकांनी आपल्या शरीराचा त्याग केला.

गुरु अंगदांनी (द्वितीय गुरु) त्या प्रदेशातील प्राचीन लिपीचा पुनरुद्धार केला. तीच पुढे 'गुरुमुखी' म्हणून प्रसिद्ध झाली.

नानक म्हणत, कुंभार एकाच प्रकारच्या मातीपासून अनेक प्रकारची भांडी तयार करतो त्याप्रमाणे एकाच प्रकारच्या पाच तत्त्वांचे देवाने अनेक देह बनविले आहेत, तर त्यात लहान-मोठा भेद कसा?

सनातन धर्माच्या रक्षणासाठी शीख धर्मगुरुंनी दिलेले योगदान कोणालाही विसरता येणार नाही.

बोध :

एकाच प्रकारच्या पाच तत्त्वांचे अनेक देह बनविले तर त्यात लहान-मोठा भेद कसा असेल?

प्रश्न :

१) गुरु नानक भारताबाहेरील कोणकोणत्या देशात गेले होते?

२) नानकांनी खलिफाला जो उपदेश केला तो —— या ग्रंथात समाविष्ट केला आहे.

३) गुरु अंगदांनी ज्या प्राचीन लिपीचा पुनरुद्धार केला तीच पुढे —— म्हणून प्रसिद्ध झाली.

५. संत तिरुवल्लुवर

भारताचे ११ वे राष्ट्रपती, ए.पी.जे अब्दुल कलाम,२००२ ते २००७ या काळात आपले राष्ट्रपती होते. त्यांचा जन्म आणि बालपण तामिळनाडू मधील रामेश्वरम् मध्ये गेले होते.

''कोणती पुस्तके तुम्हाला अतिशय आवडतात आणि तुमच्यावर त्यांचा प्रभाव आहे?'' असा प्रश्न त्यांना एका मुलाखतीत विचारला होता. त्यावेळी त्यांनी दोन पुस्तकांची नावे सांगितली होती. एक होते 'लाईट फ्रॉम मेनी लॅम्प्स' आणि दुसरे होते 'तिरुक्कुरल' ज्याचे कवी होते तिरुवल्लुवर.

साधारणपणे दोन हजार वर्षापूर्वी लिहिले गेलेले हे काव्य. 'तिरुक्कुरल' या नावाचा अर्थ बघितला तर 'तिरु' म्हणजे 'पवित्र' आणि 'कुरल' म्हणजे आपण जसा 'दोहा' म्हणतो किंवा 'ओवी' म्हणतो तशी रचना असते. या ग्रंथात मानवी स्थिती, नितिमत्ता आणि सद्गुण याविषयी विचार मांडले आहेत.

तमिळनाडूतील या कवि-संतांविषयी आज आपण जाणून घेऊया.

त्यांचा जन्मकाळ निश्चित माहीत नाही. कोणी म्हणते, ख्रिस्तपूर्व १३० वर्ष, तर कोणी म्हणते, इ.स. ५ वे शतक. पण यावर मात्र सगळ्यांचे एकमत असते की तिरुवल्लुवर यांनी, त्यांच्या काळापासून आजपर्यंत सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, तत्त्वज्ञान आणि अध्यात्मिक या सगळ्या क्षेत्रातील अनेक लोकांना प्रभावित केलेले आहे. ते एक संत होते आणि त्यांचे लेखन, त्यांची ग्रंथ संपदा ही तमिळमधील एक अत्यंत उच्च दर्जाची निर्मिती आहे.

१३३०-दोहे असलेले कुरल तीन भागात विभागले गेले आहे. 'आरम' (सद्गुण), 'पोरुल' (संपत्त), 'इंबामफ' (प्रेम) शेवटी यातून 'विटू' (मोक्ष) प्राप्त करणे हे ध्येय आहे.

गीता, बायबल आणि कुराण यांच्यानंतर तिरुक्कुरल या ग्रंथाचा सर्वाधिक भाषात अनुवाद केला गेला आहे. हिंदी, मराठी अशा भारतीय भाषांबरोबरच जर्मन, फ्रेंच, इंग्रजी अशा जागतिक भाषातूनही या ग्रंथाचा अनुवाद झाला आहे.

मुलांनो, भारतीय उपमहाद्वीपाच्या दक्षिण टोकाला कन्याकुमारी येथे तिरुवल्लुवर यांची - १३३ फूट उंचीची प्रतिमा बनवली आहे. या ठिकाणी अरबी समुद्र, बंगालची खाडी आणि हिंद महासागर हे एकत्र येतात. १३३ फूट हे १३३ अध्यायांचे प्रतिनिधित्व करतात आणि त्यांची तीन बोटे ही त्यांचे तीन विषय अर्थात नैतिकता, धन आणि प्रेम यांचे प्रतिनिधित्व करतात.

तिरुवल्लुवर यांच्या बाबतीत एक कथा आपल्याला अगदी आवडणारी आहे. तिरुवल्लुवर तामिळनाडूमध्ये अगदी प्रसिद्ध आहेत. आपल्या पित्याप्रमाणे त्यांनी वस्त्र विणणे आणि त्यांचा व्यापार करणे हा व्यवसाय स्वीकारला होता. मल्ल्यापुर गावात ते राहत होते.

पांढरी शुभ्र दाढी आणि तेजस्वी चेहरा असणाऱ्या या गृहस्थांना वस्त्र व्यापाराच्या दुकानात पाहून बाजारात आलेल्या एका श्रीमंत मुलाला प्रश्न पडला, 'व्यापार करणारा हा माणूस आणि साधूचा चेहरा आणि वेष. ही काहीतरी ढोंगबाजी असावी, पण त्याच्या मित्राने त्याला सांगितले, ''हे तिरुवल्लुवर आहेत. ते संतच आहेत आणि त्यांनी आपल्या राग-लोभ, मोह या भावनांवर विजय मिळवला आहे.'' या तरुण मुलाला काही पटेना. श्रीमंत घरातील श्रीमंत मुलाचे विचार काही वेगळेच होते. त्याने ठरवले या गृहस्थांची परीक्षा घ्यायची.

तो त्यांच्या दुकानात गेला आणि एक साडी घेऊन, ''या साडीची किंमत काय आहे?'' असे त्याने विचारले. तिरुवल्लुवर म्हणाले, ४ रुपये. त्या मुलाने ती साडी फाडून अर्धी केली आणि मग विचारले, ''अर्ध्या साडीची किंमत काय?'' २ रुपये. आणखी एकदा त्याने ती फाडली आणि विचारले, ''आता?'' तिरुवल्लुवर म्हणाले, १ रुपया. मुलाने आणखी एकदा दोन तुकडे करुन विचारले, ''आता या तुक्याची किंमत किती?'' जराही न रागावता तिरुवल्लुवर म्हणाले, ''५० पैसे.'' हे उत्तर ऐकल्यानंतर आणि त्यांना जराही क्रोध आला नाही हे पाहून तो मुलगा म्हणाला, ''पण आता हा तर माझ्या काहीच उपयोगाचा नाही. मला नकोच आता.'' तिरुवल्लुवर शांतपणे म्हणाले, ''हो बेटा, आता तुलाच काय, कुणालाच याचा उपयोग नाही. त्यांनी आपले वस्त्र गोळा करून ठेवायला सुरुवात केली. हे सर्व पाहून तो मुलगा लज्जित झाला. त्यांच्या पाया पडला आणि म्हणाला, ''गुरुवर मला क्षमा करा. मी आपल्याला ओळखले नाही. मी खूप मोठी चूक केली. त्यानंतर त्याने त्या साडीचे पैसे देऊ केले, पण गुरुवर तिरुवल्लुवर म्हणाले, ''तू तर काहीच घेतलं नाहीस. आता मी तुझ्याकडून पैसे कसे घेणार?'' मुलाला काहीच सुचेना. त्यावर तिरुवल्लुवर म्हणाले, ''ह्या साडीचे तुकडे-तुकडे करून तू नुकसानभरपाई करू शकत नाहीस. ही साडी तयार करण्यासाठी किती लोकांनी कष्ट केले आहेत ते माहित आहे का तुला? मला वाईट इतकेच वाटतंय की ही कोणा माता भगिनीच्या उपयोगी पडली असती.''

मुलगा खजील झाला आणि म्हणाला, ''गुरुवर, मला शिष्य करून घ्या.''

तिरुवल्लुवर म्हणाले, ''आपण सदाचाराचा मार्ग स्वीकारा. दुसऱ्यांच्या कष्टांचे मोल जाणा. आपल्याकडे पैसे आहेत, ते लोकोपयोगी कामांसाठी वापरा. त्यानेच तुमचे आणि समाजाचेही कल्याण

होईल.''

तिरुवल्लुवर यांनी अशाच साध्या, सोप्या शब्दात रोजच्या आयुष्यात उपयोगी पडणाऱ्या, व्यवहारात आणणे शक्य असणाऱ्या गोष्टींबद्दल जनजागृती केली.

बोध :

१) सदाचाराच्या मार्गावर चालताना दुसऱ्यांच्या कष्टांचे मोल जाणा.

२) आपल्याजवळील पैसा लोकोपयोगी कामांसाठी वापरून समाजाचे कल्याण करा.

प्रश्न :

१) तिरुवल्लुवर यांनी लिहिलेल्या ग्रंथाचे नाव काय ?

२) तिरुवल्लुवर यांची -१३३ फूट उंचीची प्रतिमा कोठे बनवली आहे ? त्या जागेचे वैशिष्ट्य काय ?

३) त्यांची तीन बोटे कशाचे प्रतिनिधित्व करतात ?

६. श्रीरामानुजाचार्य

'बहुसंख्य जनांना मुक्ती मिळवून देण्यासाठी मी नरकवास सुद्धा आनंदाने पत्करीन' असे म्हणणाऱ्या श्रीरामानुजाचार्य यांची ही कहाणी.

श्री भगवान श्रीविष्णूच्या उपासकांना 'वैष्णव' म्हणतात. विष्णूचे अवतार श्रीरामचंद्र आणि श्रीकृष्ण. श्री म्हणजे लक्ष्मी. या जगन्माता लक्ष्मीची आराधना करून, तिच्या कृपेने भगवान विष्णूला प्रसन्न करणे हा ज्या वैष्णवांचा हेतू असतो त्या भक्तांना श्रीवैष्णव म्हणतात.

तामिळनाडूतील वैष्णव उपासक आल्वाद यांनीच श्रीवैष्णव भक्तिमार्गाला अमाप प्रसिद्धी मिळवून दिली. आल्वादानंतर आचार्य परंपरा सुरु झाली. यातले पहिले व मोठे आचार्य म्हणजे यमुनाचार्य. त्यांच्यानंतरचे होते रामानुजाचार्य.

तल्लख बुद्धीच्या या मुलाचे, रामाचा धाकटा भाऊ लक्ष्मण यांच्याशी विलक्षण साम्य होते म्हणूनच 'रामाचा अनुज' (लहान भाऊ) म्हणून याचे नाव पडले 'रामानुज'. चेन्नईपासून वीस मैलांवर असलेल्या श्रीपेरंबुदूर या गावी इ.स.१०१७ मध्ये त्यांचा जन्म झाला. वडिलांच्या निर्वाणानंतर हे कांचीपुरमला आले आणि स्थायिक झाले.

महान आचार्य यमुनाचार्य यांना 'रामानुज' यांनीच आपला वारसा पुढे चालवावा असे वाटत असे. आपला शेवट दूर नाही हे सुद्धा ते जाणून होते. त्यांनी महापूर्ण या आपल्या शिष्याला कांचीस जाऊन रामानुजांना आणण्याची आज्ञा केली. पण रामानुज श्रीरंगला पोहोचण्यापूर्वीच यमुनाचार्यांचे निधन झाले.

रामानुज त्यांच्या तेजस्वी कलेवराकडे पहात होते. त्यांना असे दिसले की यमुनाचार्यांच्या

उजव्या हाताची तीन बोटे दुमडलेली आहेत. त्यांचे शिष्य म्हणाले, ‘आपल्या आयुष्यात तीन महत्वाच्या गोष्टी करायच्या राहिल्या असे आमच्या गुरुजींना सतत वाटत असे.’ रामानुज धीर गंभीर आवाजात म्हणाले, ‘शपथ घेतो की मी त्या पूर्ण करीन.’’ त्यांनी प्रतिज्ञा केली की, ‘श्रीवैष्णव तत्त्वज्ञानाचा मी प्रसार करीन; व्यास-पाराशर आणि नम्माल्वार यांच्याबाबतची श्रद्धा मी साकार करून दाखवीन आणि भगवान व्यासांच्या ब्रह्मसूत्रांवर टीकाग्रंथ लिहीन.’’ रामानुजांनी असे म्हणताच यमुनाचार्यांच्या उजव्या हाताची दुमडलेली बोटे एकदम सरळ झाली! उघडच होते की या नवोदित शिष्याला गुरुच्या इच्छा कळल्या होत्या आणि त्या कामनापूर्तीकरिता यमुनाचार्यांचा या शिष्याला आशीर्वाद होता.

यमुनाचार्यांचे निकटचे शिष्य महापूर्ण हे ही रामानुजांना गुरुस्थानी होते. आपल्यावर गुरु म्हणून अनुग्रह करण्याची रामानुजांनी केलेली विनंती महापूर्ण यांनी मान्य केली आणि विशिष्टद्वैताच्या तत्त्वज्ञानाच्या सूक्ष्म गोष्टी महापूर्ण यांनी रामानुजांना समजावून दिल्या.

अजूनही आपले ज्ञान अपूर्णच आहे या विचाराने त्यांनी महापूर्णांना पुन्हा एकदा अध्यापन करण्याची विनंती केली असता त्यांनी रामानुजांना ‘गोष्टीपूर्ण’ महाराजांकडे पाठवले.

गोष्टीपूर्णांनी रामानुजांची भक्ती आणि लायकीची परीक्षा घेतली आणि खात्री पटल्यावर त्यांनी रामानुजांना दंड आणि कमंडूल घेऊन बोलावले. रामानुज मात्र ‘दाशरथी’,‘कुरेशा’ या दोघा शिष्यांबरोबर पोहोचले. गुरुजी म्हणाले,‘मी तुम्हाला एकट्याला बोलावले होते. या दोघांना घेऊन कशाला आलात?’’ रामानुजांनी चटकन उत्तर दिले, ‘‘दाशरथी म्हणजे माझा दंड आणि कुरेशा कमंडलू. त्यांच्याशिवाय मी मागे राहूच शकत नाही.’’ आपल्या शिष्यांवरचे रामानुजांचे उत्कट प्रेम बघून गोष्टीपूर्णांना गहिवरून आले.

‘ओम् नमो नारायणः’ या अष्टाक्षरी स्तोत्राचे मर्म समजावून सांगितल्यावर गोष्टीपूर्ण म्हणाले, ‘‘जो हे स्तोत्र योग्य प्रकारे म्हणेल त्याला आत्मबोध होईल म्हणून ते शिकवताना सगळ्यांनाच ते न शिकवता निवडक काही शिष्यांनाच हे स्तोत्र शिकवा’’ ‘पण असा व्यक्ती-व्यक्तीतला भेद रामानुजांना मान्यच नव्हता. या दैवी ज्ञानाचा प्रत्येकाने लाभ घेतला पाहिजे असे त्यांना वाटे. दुसऱ्या दिवशी सर्व

लोकांना एकत्र करून ते एका मंदिराच्या गोपुरावर चढले. मग त्यांनी स्वत: शिकलेल्या स्तोत्राचा गूढार्थ जोराने ओरडून सांगितला. ते स्तोत्र खाली जमले त्यांना म्हणायला लावले आणि पुन: पुन्हा अर्थ नीट समजावून दिला. लोक आनंदाने फुलून आले.

हा प्रकार ऐकल्यावर गोष्टीपूर्ण रागावले.'तुम्ही केलेल्या या अपराधाची तुम्हांस कोणती शिक्षा भोगावी लागेल याची कल्पना आहे काय?' ते रामानुजांना म्हणाले.

'माझ्या गुरुंचा अवमान केल्याबद्दल मला कदाचित नरकात पडावं लागेल, पण गुरुजी, सर्वसामान्य जनतेला मी जो धर्म-अर्थ समजावून सांगितला, त्यात त्यांना उच्च आत्मिक आनंद लाभला. म्हणून कायमचे जरी तुरुंगात खितपत पडावे लागणार असेल तरी त्याला माझी पूर्ण तयारी आहे.' या शब्दांनी गोष्टीपूर्णांचे डोळे उघडले आणि त्यांनी रामानुजांना प्रेमाने मिठीच मारली.



रामानुजांच्या तत्त्वज्ञानाचा विशेष भर ईश्वराच्या करुणेवर होता. भगवंतात सत्य, दिव्यता, सौंदर्य असे अनेक गुण आहेत. आपण स्वतःच्या सुखाकडे लक्ष न देता, माणसा-माणसात भेद न पहाता, समभावाने, विनम्रपणे सकल मानवांवर प्रेम केले; धर्म-जात हा अभिनिवेश ठेवला नाही तर आपल्यातून ईश्वराचीच भक्ती प्रकट होते, असा महान संदेश रामानुजांनी आपल्याला दिला आहे.

बोध : भेदाभेद न ठेवता समरसतेचा भाव जागविणे हीच ईश्वराची भक्ती.

प्रश्न :

१) भगवान श्रीविष्णूंना प्रसन्न करणाऱ्या उपासकाला ______ म्हणतात.

२) रामानुज म्हणाले, ''दाशरथी म्हणजे माझा'______ आणि ______ म्हणजे कमंडलू.

३) रामानुजांच्या तत्त्वज्ञानात विशेष भर कशावर होता ?

७. संत बसवेश्वर

मुलांनो, कोणताही व्यवसाय अथवा कुठल्याही प्रकारचे काम हे कमी दर्जाचे किंवा श्रेष्ठ दर्जाचे असे नसते आणि त्यावरुन ते काम करणाऱ्या माणसाचे श्रेष्ठत्वही ठरत नसते, असा विचार मांडणारे युगपुरुष होते संत बसवेश्वर. मनापासून केलेले प्रत्येक काम हीच खरी शिव उपासना. हे त्यांच्या 'कायक वे कैलास' सिद्धांताचे सार. शारीरिक श्रम व व्यवसाय हाच स्वर्ग (कैलास) आहे.

संत बसवेश्वरांचा जन्म १२ व्या शतकात कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर बागेवाडी या गावात ११०५ साली झाला. त्यांच्या वडिलांचे नाव आदिराज आणि आईचे नाव मदलांबिका होते. मदलांबिका परम शिवभक्त होत्या.

संत बसेवश्वरांनी बारा वर्षे कृष्णा आणि मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कूडलसंगम येथील अध्ययन केंद्रात राहून त्यांनी निरनिराळ्या भाषा, धर्म, तत्त्वज्ञान यांचा अभ्यास केला.

महात्मा बसवेश्वर अस्पृश्यता मानत नव्हते, त्याची एक गोष्ट पाहूया. एकदा कल्याण नगरीत शिवशरण ढोर कक्क्याची पत्नी रस्त्यातून चालली असताना तिने पाहिले की, महात्मा बसवेश्वर घोड्यावर स्वार होऊन येत आहेत. तिने बसवेश्वराना थांबावयास सांगून आदरपूर्वक आपल्या घरी जेवणाचे निमंत्रण दिले. पण राजदरबारात कामाला जाण्याची घाई असल्याने बसवेश्वर थांबले नाहीत. राजदरबारातील कामकाज आटोपून घरी जाताना त्यांना त्या ढोर पत्नीच्या जेवणाच्या निमंत्रणाची आठवण झाली व ते त्यांच्या घरी येऊन धडकले पण तिथे त्यांना कोणीच दिसले नाही. एवढ्यात दाराच्या फटीतून भाताची शिते घेऊन बाहेर पडणाऱ्या मुंग्यांची रांग बसवेश्वराना दिसली. त्यांना वाटले की, मुंग्याच आपल्यासाठी प्रसाद आणत आहेत पण ती शिते मुंग्यांकडून

काढून घेणे त्यांना योग्य वाटले नाही. लगेच ते दुकानात गेले आणि गूळ घेऊन आले, तो गूळ त्यांनी मुंग्यांसमोर ठेवला. गुळाच्या वासाने मुंग्यांनी भाताची शिते सोडली व त्या गुळाला चिकटल्या. त्यांनी सोडलेली भाताची शिते बसवेश्वरांनी जमा केली व घरी जाऊन स्नानपूजा आटोपून त्यांनी तो प्रसाद ग्रहण केला. असे होते संत बसवेश्वर.

एकदा पावसाळ्याच्या दिवसात गावाशेजारील एक छोटा बालक डबक्यात बुडत असल्याचे पाहून बाल बसवेश्वरांनी त्याला बाहेर काढले परंतु डबक्यात बुडणारा मुलगा अस्पृश्य असल्याने बसवेश्वरांचे कौतुक होण्याऐवजी त्यांना शिक्षा झाली. या घटनेचा बाल बसवेश्वरांच्या मनावर गंभीर परिणाम झाला.

वयाच्या आठव्या वर्षी त्यांचे उपनयन (मुंज) करायची वेळ झाली. तेव्हा बसवेश्वर धर्म मार्तंडांना म्हणाले, ''माझ्यापेक्षा मोठ्या असलेल्या अक्का नागाई या बहिणीचा संस्कार आधी करा, मग माझा.''

धर्म मार्तंड म्हणाले, ''स्त्री शूद्र असते. तिला हा संस्कार करता येत नाही.'' त्यावर बसवेश्वर



म्हणाले,'' स्त्री ही शूद्र असेल तर तिच्यापोटी जन्मणाराही शूद्रच असला पाहिजे ना !'' आई शूद्र, मुलगा पवित्र ही गोष्ट मनाला पटत नाही. जोपर्यंत आपण याचे उत्तर नीट देत नाही तोपर्यंत मी हा संस्कार करणार नाही. ''मानवा-मानवात, आई-मुलात, बहीण-भावात भेद करणारा तुमचा धर्म मी मानणार नाही.'' तत्कालीन धर्म सांगणाऱ्यांना या तर्काचा प्रतिवाद करता आला नाही.

त्यांनी बसवेश्वरांपुढे दोन पर्याय ठेवले, ''एकतर तुला हा संस्कार करून घ्यावाच लागेल अन्यथा तुला जननी आणि जन्मभूमीचा त्याग करावा लागेल.'' अवघ्या आठ वर्षे वयाच्या बसवेश्वरांनी क्षणाचाही विलंब न लावता उत्तर दिले, 'माझ्या आत्म्याला जोपर्यंत एखादी गोष्ट पटत नाही तोपर्यंत मी ती मान्य करणार नाही.'' त्यांनी दृढ निश्चय केला आणि म्हणाले, 'मी दुसरा पर्याय निवडतो.'

त्यांनी घरादाराचा त्याग केला आणि कूडलसंगमावर जाऊन 'श्रीसंगमेश्वर' गुरुंकडे शिक्षण घेतले. पुढे मंगळवेढा (जिल्हा सोलापूर-महाराष्ट्र) येथे येऊन राजा बिज्जलाच्या दरबारी नोकरी केली.

त्यांनी दया, अहिंसा, सत्य, सदाचार इ. गुणांचा प्रचार केला. भूतदया बाळगा, प्रेमाने वागा, परोपकार करा अशी त्यांची शिकवण होती. बसवेश्वरांनी कल्याण येथे निर्माण केलेली 'शिवानुभव मंडप' म्हणजेच 'अनुभवमंडप' ही संस्था जागतिक धर्मेतिहासातील अनन्यसाधारण संस्था होय. ही त्या काळातील लोकशाहीची पहिली संसद होती.

वेगवेगळ्या जातीतील आणि व्यवसायातील भक्त म्हणजे 'शिवशरण', येथे एकत्र जमत आणि विविध विषयांवर चर्चा-विचार विनिमय करीत असत. लयबद्ध गद्यातून होणारी ही चर्चा -ही वचने पुढे संग्रहित करण्यात आली.

परिसंवादाच्या रूपाने जी चर्चा होत असे तीच पुढे कन्नड साहित्यात 'वचनसाहित्याच्या' रुपाने प्रसिद्ध झाली. त्यांनी यातून समाजाचे प्रबोधन केले.

देशाचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी लंडन येथे थेम्स नदीच्या काठी बसविण्यात आलेल्या बसवेश्वरांच्या पुतळ्याचे अनावरण करताना याच गुणांचा जगासमोर जाहीर गौरव केला.

या वचनांचे २३ भाषात रुपांतर झाले असून २८ एप्रिल, २०१७ रोजी बसवेश्वर जयंतीच्या निमिताने ते नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशाला समर्पित करण्यात आले.

"ज्यांच्याजवळ पैसा आहे, तेच देऊळ बांधू शकतात. पण माझ्यासारखा गरीब माणूस पैशाअभावी इच्छा असूनही हे काम कसे करणार? खरे पहाता, माझा देह हेच एक मंदिर आहे. माझे पाय देवळाचे स्तंभ आहेत. डोके देवळाचा सोनेरी गोलघुमट आहे. हे कुडलसंगमाधिदेवा, चेतनेला अंत नाही. आपण देहरुपी देवळात परमेश्वराला पाहू शकतो. म्हणून अचेतन देवळापेक्षा चेतन देहच खरे देवालय आहे." असे त्यांनी एका कवनात म्हटले आहे.

असे हे महान संत इ.स. ११६७ मध्ये वयाच्या ६२ व्या वर्षी संगमेश्वराशी एकरूप झाले. कृष्णा आणि मलप्रभा नदीच्या संगमावर त्यांचे समाधीस्थळ उभारले आहे.

बोध:

१) स्त्री-पुरुष समानच असतात.

२) शारीरिक श्रम आणि कोणताही व्यवसाय कमी दर्जाचा नसतो.

प्रश्न:

१) बसवेश्वर कोणत्या राज्यातील होते ? त्यांनी कोणाचे प्राण वाचवले?

२) बसवेश्वरांनी घरादाराचा त्याग का केला ?

३) बसवेश्वरांच्या पुतळ्याचे अनावरण कधी, कोणी, कुठे केले ?

८. संत नरहरी

नरहरी दादा जातीने सोनार. गावामध्ये सोनाराच्या कामासाठी नाव कमावून होते. गावातली लोक कधीमधी त्यांच्याकडून काही करून घेत असत पण एक दिवस आश्चर्य घडलं. ''अहो दादा, नरहरी सोनार दादा आहात का घरात?'' एवढं कोण हाक मारतंय ते बघायला नरहरीदादा बाहेर आले आणि काय पाहिलं त्यांनी? एक मोठी असामी दारात उभी होती. त्यांच्या रेशमी वस्त्रावरूनच कळत होती त्यांची श्रीमंती. त्यांच्यासोबत पंढरपूर गावातील दोन माणसंही होती. आपल्या गावातल्या त्या लोकांना नरहरीदादांनी ओळखलं आणि म्हणाले, ''कोण आपण? काय हवंय आपल्याला?'' आलेले पाहुणे म्हणाले,'' ''अहो मी आपल्या गावात, पंढरपूरला, विठ्ठलाच्या दर्शनाला काही महिन्यापूर्वी आलो होतो. तेव्हा मला व्यापारात मोठी खोट आली होती, नुकसान झालं होतं. मी विठ्ठलाला नमस्कार केला आणि नवस केला. ''व्यापारात भरभराट येऊ दे, तुझ्या कमरेला सोन्याचा करगोटा बांधीन.'' ''आता बघा, इतक्या दिवसांनी माझा व्यापार खूप चांगला चालला आहे. मग नवस नको का फेडायला? हवा ना, म्हणून नवस फेडण्यासाठी आलोय. पण सोन्याचा करगोटा करुन देणारा कोणी सोनार दिसला नाही मला. शेवटी गावातल्या या दोघांनीही तुमचं नाव सांगितलं आणि तेच मला इथे घेऊन आले. आता माझी विनंती आहे, की हा सोन्याचा, हिऱ्यांनी घडवलेला करगोटा तुम्हीच करून द्या. तुमची मजुरी, काय खर्च येईल तो देईन. मी दोन दिवस गावातच राहणार आहे तोपर्यंत जर तुम्हाला करगोटा तयार करता आला तर फार चांगलं होईल.'' नरहरी

पटकन म्हणाले, ''मला नाही जमणार.'' त्या गृहस्थांना वाटलं, यांना पैसे हवेत की काय जास्त? म्हणून त्यांनी विनवलं,'' अहो, कृपा करून नाही म्हणू नका. मोठ्या आशेने आलोय मी तुमच्याकडे. आणखी पैसे देऊ का तुम्हाला?'' नरहरी म्हणाले, ''पण प्रश्न पैशाचा नाही आहे. मी आहे शिवभक्त आणि शंकराला सोडून दुसऱ्या कोणत्याही देवाचं मी मुखावलोकनही करत नाही. त्यामुळे आपल्या देवाचा करगोटा करणं कसं जमेल मला ? शक्य नाही ते.'' यातून काहीतरी मार्ग काढावा म्हणून व्यापारी म्हणाला,'' आपण माझ्या देवाचे मुखदर्शन नका करू. मी काय करतो, त्या विठ्ठल मूर्तीच्या कमरेचे माप घेऊन येतो. त्या मापाचा करगोटा तुम्ही मला करून द्या. चालेल ना?'' हो नाही करता करता, नरहरी सोनार करगोटा करून द्यायला तयार झाले. व्यापाऱ्यांनी विठ्ठलाच्या मूर्तीच्या कमरेचे माप आणून दिलं. त्या मापानुसार सोन्याचा सुंदरसा करगोटा करून दिला. व्यापाऱ्याने तो करगोटा नेला आणि विठ्ठलाच्या मूर्तीला मनापासून नमस्कार करून तो विठ्ठल मूर्तीच्या कमरेला घातला. कमरेला घातला कसला, तो खूप आखूड झाला होता. मूर्तीच्या कमरेला तो काही केल्या घालता येईना.

व्यापारी पुन्हा आला. करगोट्याची लांबी वाढवून घेतली. आता पुन्हा व्यापारी देवळात गेला आणि काय सांगायचं, आता तो खूपच सैल झाला होता. मूर्तीच्या कमरेतून गळायला लागला. व्यापाऱ्याला काळजी पडली, आपला नवस पूर्ण होतो की नाही. तो पुन्हा नरहरीकडे आला. म्हणाला, ''असं काय दादा, तुम्ही केलेला

करगोटा एकदा खूप अखूड होतो आणि एकदा खूप लांब होतो. त्यामुळे मूर्तीच्या कमरेला तो व्यवस्थित बसतच नाहीये. हां, मी तर माप बरोबर आणून देतोय तुम्हाला. आता आपण असं करू या का, तुम्हीच एकदा चला आणि करगोटा तेवढा नीट करून द्या. नाही म्हणू नका हो, '' व्यापारी कळवळून म्हणाला. नरहरीदादा म्हणाले, ''पण मी तुम्हाला आधीच नव्हतं का सांगितलं की मी माझ्या शंकराशिवाय कोणत्याही देवाचे मुख पाहू शकत नाही. तुम्ही भलता आग्रह नका करू.'' व्यापारी आपला हट्ट सोडेनात. त्यांनी विनवणी केली, ''अहो, मी तुमच्या डोळ्यावर पट्टी बांधून नेतो पण मंदिरात येऊन तेवढा करगोटा नीट बसवून द्या.'व्यापाऱ्याची तळमळ पाहून नरहरी तयार झाले. डोळ्यावर पट्टी बांधून ते विठ्ठलाच्या मंदिरात गेले. मूर्तीला हातानेच चाचपडून त्यांनी कमरेचे माप घ्यायचा प्रयत्न केला आणि काय आश्चर्य! मूर्तीला स्पर्श करून तिच्या अंगावरुन हात फिरवताना नरहरीला वाटले, ही तर आपल्याच देवाची, शंकराची मूर्ती आहे. तशाच जटा, त्याचेच बाहू, तसेच वस्त्र, गळ्यातील सर्पहार. सारं काही आपल्याच देवासारखं. पटकन म्हणाले, ''अरे, हा तर माझा देव.'' आणि त्यांनी डोळ्यावरची पट्टी काढली तर पुढे मूर्ती मात्र उभी होती विठ्ठलाची. त्यांना काही कळेना. त्यांनी पुन्हा डोळे मिटून मूर्ती चाचपडली आणि पुन्हा पहिल्यासारखंच वाटलं. लगेच त्यांच्या डोळ्यात लख्ख प्रकाश पडला. अतिशय वाईट वाटलं आणि दु:खी अंतकरणाने विठ्ठलाला म्हणाले,'' प्रभू तू वेगवेगळ्या रूपात जरी असलास ना तरी तू एकच आहेस, हे मला आज समजलं. मला क्षमा कर'' असं म्हणून नरहरी करगोटा घालू लागले. आणि अहा आश्चर्य! करगोटा विठ्ठलाच्या कमरेला तंतोतंत बसला!

पंढरपूरात राहूनही विठ्ठल मंदिरात न येणाऱ्या शिवभक्त नरहरीला विठ्ठल मंदिरात पाहून लोकांना आश्चर्य वाटलं. ते विचारायला लागले की आपण कसे आलात पंढरीला? मात्र कुठल्याही रूपात आणि वेगवेगळ्या रूपात आपल्याला आपला देव भेटतो हे पूर्ण पटलं होतं नरहरीदादांना!

नरहरी सोनार यांचा जन्म पंढरपुरात इ.स. ११९३ मध्ये श्रावण शुक्ल १२ ला झाला. ते वडिलोपार्जित सुवर्णकाम करीत असल्याने त्यांचे आडनाव पुढे सोनार झाले. विविध अठरापगड जाती जमातींच्या संतांनी एकत्र येऊन वारकरी संप्रदाय वाढविला. त्यांचा जन्मच जणू शिव-वैष्णव किंवा हरि-हराचा वाद मिटवण्यासाठी झाला होता.

बोध : तात्पर्य : देव कोणत्याही स्वरुपात असो, देव एकच असतो.

प्रश्न :

१) योग्य पर्याय निवडा.

अ) नरहरी पंढरपूर / गाणगापूर / विजापूर येथे रहात असत.

आ) नरहरी सोनार/ लोहार/ कुंभार काम करीत असत.

२) सोन्यापासून बनविल्या जाणाऱ्या दहा अलंकारांची नावे शोधा.

३) मूर्तीला हात लावून चाचपडून बघताना नरहरींना कोणत्या देवाचा आभास झाला ?

१. संत ज्ञानेश्वर



तेराव्या शतकातील गोष्ट आहे. नगर जिल्ह्यातील पैठणजवळील आपेगाव येथे राहणाऱ्या विठ्ठलपंत कुलकर्णी आणि रूक्मिणीबाई या दाम्पत्याला चार अपत्ये झाली. विठ्ठलरावांनी संन्यास घेऊन नंतर संसारात प्रवेश केल्याने संन्याशाची पोरं म्हणून समाजाने हेटाळणी केलेली ही चार भावंडे. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई अशी त्यांची नावे.

वडिलांकडून आणि वडील भावाकडून ज्ञानदेवांनी पुष्कळ ज्ञान प्राप्त केले. बुद्धिमान, एकपाठी ज्ञानेश्वरांचे वेद, महाभारत, भगवद्गीता यांचे पठण झाले. परंतु त्याकाळच्या पैठणच्या ब्रह्मवृंदांनी या मुलांना व्रतबंधाचा - मुंजीचा अधिकारही नाकारला. त्यानंतर त्यांनी पैठणमध्ये आपल्या नव्या आयुष्याला आरंभ केला.

धर्मपंडितांनी किंवा कर्मठ धर्माने ज्यांना जवळ केले नाही, त्या अस्पृश्य-दलितांना, बहुजन समाजातील लोकांना निवृत्ती-ज्ञानोबांजवळ जाण्याचा मार्ग मिळाला. ज्ञानदेवांनी या लोकसमाजास भक्तिमार्गाचे महत्त्व सांगण्यास सुरूवात केली. जनतेतील एक मोठा वर्ग या भावंडांच्या नव्या भक्तिमार्गाकडे ओढला गेला.

पैठणच्या वास्तव्यातील एक कथा. त्या काळातील काही दुष्ट लोक या मुलांना हरप्रकारे त्रास देत असत. सर्वांभूती आत्मा एकच - अगदी सारखाच आहे. या ज्ञानेश्वरांच्या शिकवणीने चिडलेल्या व्यक्तींनी विचारले, आम्ही वेद म्हणतो. हा पाणी पखालीतून नेणारा रेडा आहे. या रेड्यातही जर सारखाच आत्मा असेल तर त्याला वेद म्हणता येतील? ज्ञानदेवांच्या त्या साथीदार रेड्याने वेद पठण सुरू केले. सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला.

वाचताना हा चमत्कार वाटतो खरा, पण एका वेगळ्या सामाजिक वास्तवाचाही भाग आहे.

ज्ञानदेवांच्या सहवासात पैठणच्या या मुक्कामात अज्ञ, मूढ, पशुवत जगणारे लोकही शिकू लागले, ज्ञानी होऊ लागले. हा धष्टपुष्ट अंगाचा ज्ञानदेव नावाचा माणूस, कदाचित त्याचे आडनाव रेडे असेल किंवा त्याच्या अंगकाठीवरून त्याला रेडा, हेला, हल्या अशा नावाने हाक मारीत असावेत. तो पखालीतून पाणी पोहोचविण्याचे काम करीत असावा. त्याला ज्ञानदेवांच्या सहवासात येऊन ज्ञान मिळवण्याची इच्छा निर्माण झाली असेल आणि तोही चोख पाठांतर करीत असेल आणि म्हणूनच त्याला वेदपठण सुरू करता आले असेल.

अशीच आणखी एक कथा चांगदेव भेटीची. या भावंडांचे कौतुक त्यांच्याही कानावर गेले आणि त्यांना भेटायला जाण्यापूर्वी चांगदेवांनी एक पत्र लिहायला घेतले. पण पत्राच्या आरंभी तीर्थरूप लिहावे तर ज्ञानेश्वर वयाने लहान आणि चिरंजीव लिहावे तर त्यांचा अधिकार मोठा. शेवटी त्यांनी कोरा कागदच त्यांना पत्र म्हणून पाठवला. ज्ञानेश्वर म्हणाले, गुरू न केल्याने चांगदेव कोराच राहिला. त्यांनी त्याच कागदावर ६५ ओव्या लिहून पाठवल्या. तीच चांगदेव पासष्टी. त्यांनी लिहिले, ''संपूर्ण विश्वाचा चालक तुमच्याजवळ आहे. त्याच्याजवळ लहानथोर असा भेद नाही.''

चांगदेवांना हे उत्तर मिळताच, सर्व शिष्यसमुदायाबरोबर वाघावर बसून, सर्पाचा चाबूक हातात घेऊन निघाले. त्यांच्या येण्याची वार्ता कानी पडली तेव्हा ही चारी भावंडे एका भिंतीवर बसली होती. ज्ञानदेवांनी भिंतीला आज्ञा केली, संत भेटीस येत आहेत. आपण त्यांना सामोरे गेले पाहिजे. ती निर्जीव भिंत त्यांना घेऊन चालू लागली. ते दृश्य पाहून चांगदेवांचा अभिमान नाहीसा झाला.

आता वस्तुतः 'निर्जीव भिंत चालली' असे म्हणणे पटत नाही. पण आळंदी व त्या परिसरात चांगदेव आले तेव्हा गावातील भिंती ज्ञानदेवांच्या वचनांनी रंगलेल्या असतील. त्या वचनांमुळे त्या भिंती जिवंत व चालत्या-बोलत्या वाटल्या असतील. त्या भागात अशा प्रकारे ज्ञानयज्ञाची सुरूवात झाली असेल. भिंत चालवली, याऐवजी भीत - भीत - भीती असे शब्द कुठे तरी लेखनात आले असावेत व 'चालवली' ऐवजी 'घालवली' अशी रचना असावी, असे वाटून जाते. जनमानसातील भीती, भयगंड ज्ञानदेवांनी घालवला, हे तर नक्कीच म्हणता येते.

दुसराही एक विचार होऊ शकतो की चांगदेव आले त्या वेळी ही भावंडे ज्या भिंतीवर बसली होती, तेच त्यांचे रोजचे बोलण्याचे, प्रवचनाचे व्यासपीठ असेल. तेथूनच ज्ञानदेव आणि चांगदेव यांच्यात संवाद झाला असेल व म्हणून या अर्थाने ती भिंत बोलकी ठरली असेल.

पण हे चमत्कार झाले असतील किंवा नसतीलही. मुलांनो, खरा चमत्कार तर हा आहे की एका सोळा वर्षांच्या तरुणाने महाभारतातील श्रीमद् भगवद्‌गीतेवर विस्तृत टीका केली ज्ञानेश्वरी लिहून.

भगवद्‌गीता संस्कृत भाषेत आणि बहुसंख्य लोकांना तर संस्कृत येत नाही म्हणून गीतेतील ज्ञानापासून ते वंचित राहिले होते. निवृत्तीनाथांनी ज्ञानदेवांना गीतेवरील टीका प्राकृत भाषेत लिहिण्याची आज्ञा केली आणि म्हणून नेवासे गावात ज्ञानेश्वरीची रचना करण्यास प्रारंभ केला आणि तो ग्रंथ शके १२१२ (इ.स. १२९०) मध्ये लिहून पूर्ण केला.

श्रीकृष्णाने महाभारत युद्धाच्या वेळी कुरूक्षेत्रावर अर्जुनाला सांगितलेला उपदेश म्हणजे भगवद्‌गीता आणि तिचा अर्थ सांगणारी ती भावार्थदीपिका म्हणजे ज्ञानेश्वरी.

काव्य, भक्ती आणि ज्ञान यांचा हा एकत्रित, अलौकिक आविष्कार. ज्ञानदेवांचे प्रगल्भ कवित्व आणि त्यांचे ज्ञान यांचा पूर्ण संगम असलेला हा ग्रंथ म्हणजेच जणू चालता बोलता चमत्कार!

‘माझा मऱ्हाठाचि बोल कौतुकें। परि अमृतातेहि पैजा जिंके।
ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन।।’

ही सुरूवातीची प्रतिज्ञा आणि

‘दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्ये पाहो।
जो जे वांच्छील तो तें लाहो। प्राणिजात।।

या आर्शीवचनाने केलेला शेवट...

हे विश्वचि माझे घर। ऐसी मति जयाची स्थिर।
किंबहुना चराचर। आपण जाहला।।

हा सातशे वर्षांपूर्वी ज्ञानेश्वरांनी दिलेला अमर संदेश आहे.

बोध : संपूर्ण विश्व हे जणू एक घर आहे.

प्रश्न :

१) ज्ञानेश्वरांच्या तीन भावंडांची नावे सांगा?

२) ज्ञानेश्वरांनी कोणता ग्रंथ लिहिला?

३) ज्ञानेश्वरांना भेटायला कोणते अधिकारी पुरुष आले.

१०. संत नामदेव

महाराष्ट्राच्या संत परंपरेत, संत नामदेवांना महत्वाचं स्थान आहे. ते निस्सीम विठ्ठल भक्त होते. ही विठ्ठल भक्ती समाजात रुजवण्याचा प्रयत्न त्यांनी आयुष्यभर केला. त्यासाठी हजारो अभंगांची रचना केली तसेच भारतभर फिरून ठिकठिकाणी कीर्तने केली. 'वारकरी कीर्तन' या कीर्तन प्रकाराची सुरुवात नामदेवांनीच केली. महाराष्ट्रातील हा असा एकमेव संत की ज्याच्या अभंग रचना शिखांच्या 'गुरु ग्रंथ साहेब' या ग्रंथात समाविष्ट झाल्या. अशा या महान संताच्या जीवनातील हा एक प्रसंग.

संत जनाबाई त्यांच्या घरची दासी होती. ती वंचित समाजात जन्माला आली होती. पण संत नामदेवांनी तिलाही लिहायला वाचायला शिकवले. तिच्या हृदयात विठ्ठल भक्तीची ज्योत पेटवली. संत नामदेवांमुळेच ती संत कवयित्री बनली. त्यामुळे आपल्या या गुरुबद्दल तिच्या मनात अतीव प्रेमादर होता. त्या प्रेमादरापोटी तिने या घटनेची नोंद आपल्या एका अभंगात कौतुकाने केली आहे. ती लिहिते :

नामा येऊनिया पाहे । आजी कौतुक दिसताहे ।।१।।

संत नामदेव एकदा बाहेरून घरी आले. पाहतात तर काय, घराचं रूप पार पालटले होते. घर एकदम श्रीमंत झाले होते. घरात एवढं वैभव आले कोठून, असा प्रश्न नामदेवांना पडला. ते राजाई या त्यांच्या पत्नीला त्याबद्दल काही विचारणार होते. तेवढ्यात ती स्वत: पुढे आली आणि

तिने ते वैभव घरात येण्याचे कारण सांगितलं. ‘‘तव निवेदी राजाई, लागे नामयाचे पायी ।।’’

राजाईने काय कारण सांगितलं, ते संत जनाबाई सांगत नाही. पण आपण ते कारण जाणून घेऊ शकतो. संत नामदेव खूप पुण्यवान आहेत, हे लक्षात घेऊन कोणीतरी ते वैभव दान दिले असेल. दुसरा कोणी असता तर अचानक एवढं द्रव्य फुकट मिळाल्याने खूश झाला असता पण संत नामदेव खूश झाले नाहीत. त्यांनी फुकटात मिळालेलं ते द्रव्य स्वीकारले नाही. त्यांनी ते द्रव्य ताबडतोब वाटून दिले. ते म्हणाले,

हाती टाळ दिंडी गान । हेचि आमचे सर्व धन ।।५।।

‘‘हातात टाळ घेऊन दिंडीत गायन करणं हेच आमचं सर्व धन आहे.’’ तुकाराम महाराज ही म्हणतात त्याची आठवण येते.

आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने, शब्दांचीच शास्त्रे यत्न करू ।।१।।

शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्द वाटू धन जनलोका ।।२।।

तुका म्हणे पहा शब्दचि हा देव, शब्देचि गौरव पूजा करू ।।३।।

आपल्या गुरुची ही प्रामाणिक वृत्ती पाहून संत जनाबाईंना आनंद झाला. त्या म्हणतात.

ऐसे आश्चर्य देखोनी । जनी हासतसे मनी ।।६।।

असे प्रामाणिक लोक खऱ्या अर्थाने आदरणीय, वंदनीय, सन्माननीय ठरत असतात. त्यामुळे संत जनाबाईंना आपल्या या गुरुबद्दल कौतुक वाटावे हे स्वाभाविक होते. मुलांनो, आपलेही असेच कौतुक व्हावे, लोकांना आपल्याविषयी आदर वाटावा, असे तुम्हाला वाटते का ? तसे वाटत असेल तर तुमची वृत्ती प्रामाणिक असू द्या. कोणाकडून फुकट काही मिळावं, अशी अपेक्षा ठेऊ नका. जे काही मिळवायचे ते स्वतःच्या प्रामाणिक कष्टाने मिळवा. तीच आपली खरी कमाई असते. ती कमाई भले कितीही कमी असो, तिच्यात समाधान माना. अगदी आई वडिलांच्या पैशावरही मौज मजा करू नका. तो पैसा त्यांनी स्वतःच्या कष्टाने कमावलेला असतो. त्यावर आपला अधिकार काय ? असा विचार करा. जी काही मौजमजा करायची असेल ती स्वतः प्रामाणिक प्रयत्न करून मिळालेल्या पैशावरच करा. मग संत नामदेवांसारखे तुम्ही आदरणीय ठराल. जे कौतुक संत नामदेवांना, संत जनाबाईकडून मिळालं, तेच तुम्हालाही मिळू शकेल. जनाबाईंचे गुरु नामदेव, पण



नामदेवांना गुरुची प्राप्ती कशी झाली त्याविषयीची गोष्ट अशी–

एकदा आळंदी येथे नामदेव, ज्ञानेश्वर, गोरोबा कुंभार, निवृत्तीनाथ, मुक्ताई अशी अनेक भक्त मंडळी जमली होती. तेव्हा मुक्ताबाईने गोरोबा कुंभाराला सांगितले, ‘काका, या जमलेल्या मंडळींची, म्हणजे आमची सर्वांचीच परीक्षा घ्या.'' गोरोबाकाकांनी सर्वांना बसवून प्रत्येकाच्या डोक्यावर थापटणे मारले. ते म्हणत होते, ‘हे मडकं पक्कं भाजलं आहे. हे मडकं अजून कच्चं आहे.' होता होता नामदेवांच्या डोक्यावर थापटणे मारताच ते कळवळले तेव्हा गोरोबा काका म्हणाले, ‘अहो, हे मडकं कच्चं आहे.' आपल्या हातून देव स्वतः भोजन करतो या गोष्टीचा मनात अहंकार उपजलेल्या नामदेवांना, ते ऐकून खूप राग आला. ते तिथून निघून जाऊ लागले. ज्ञानदेवांनी त्यांना शांत केले. त्यांच्या मागोमाग गोरोबाकाकाही आले आणि त्यांनी नामदेवाना औंढ्या नागनाथांच्या देवळात जायला सांगितले. नामदेव तेथे गेले असता एक वृद्ध गृहस्थ-विसोबा खेचर महादेवाच्या पिंडीवर पाय टाकून झोपले होते. ते पाहताच नामदेव म्हणाले, ‘ए म्हाताऱ्या, पिंडीवर पाय टाकून झोपलास, काढ ते पाय पिंडीवरुन !' विसोबा खेचर विनवणीच्या स्वरात म्हणाले, ‘‘बाबा, तूच माझे पाच उचल, माझ्याने नाही रे उचलवत. काय करू ?''

नामदेवांनी पाय उचलून बाजूला ठेवले, तेव्हा पायाखाली महादेवाची पिंड दिसली. असे बऱ्याच ठिकाणी विसोबाचे पाय ठेवले; पण पाय ठेवील तिथे पिंड. त्यावेळी नामदेवांना ज्ञान झाले आणि त्यांनी विसोबा खेचर यांनाच आपले गुरु मानले.

बोध : मेहनत न करता मिळवलेल्या संपत्तीचा लोभ धरू नये.

प्रश्न :

१) नामदेवांच्या घरच्या दासीचे नाव काय ? तिला नामदेवांनी काय शिकविले ?

२) महाराष्ट्रातले नामदेव भारतातील इतर कोणत्या प्रांतात गेले ?

३) नामदेवांचे गुरु ज्ञानेश्वर/विसाजीपंत खेचर/मुक्ताबाई हे होते.

११. संत जनाबाई

''विठू माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा ।।'' हा प्रसिद्ध अभंग रचणाऱ्या थोर संत कवयित्री अर्थात संत जनाबाई होय. एखाद्या कामावर आपली निष्ठा असली की ते काम आपण अधिक आत्मविश्वासाने करतो आणि त्यासोबत देवाचे आशीर्वाद असले की त्यात नक्कीच यश मिळते. अशीच शिकवण देणाऱ्या संत जनाबाईची एक कथा पाहू.

संत कबीरदासांना विठ्ठलनामाची ताकद समजली ती संत जनाबाईंमुळे. संत जनाबाईंचे अभंग सर्वदूर लोकप्रिय झाले आणि त्यांची ख्याती कबिरांच्या कानी गेली. 'इतके सुंदर अभंग रचणारी ही महिला आहे तरी कोण ?' या उत्सुकतेपोटी संत कबीर जनाईच्या भेटीसाठी पंढरीस आले. तिथे आल्यावर त्यांना कळले की, त्या गोपाळपुरास गोवऱ्या थापायला गेल्या आहेत. तिला येण्यास काही अवधी लागेल. दासीचे काम करणारी, गोवऱ्या थापणारी बाई अभंग लिहिते, याचे त्यांना फार अप्रूप वाटले आणि ते तिची वाट बघत तिथे थांबण्याऐवजी गोपाळपुरास गेले.

तिथे नदीकाठावर दोन महिला एकमेकींशी भांडत असल्याचे त्यांना दिसले त्या दोघींच्या मध्ये गोवऱ्यांचा मोठा ढीग होता. गोवऱ्या चोरल्याचा आरोप त्या एकमेकीवर करत होत्या. कबीर काही वेळ त्यांचे भांडण ऐकत तिथे उभे राहिले. काही वेळाने त्यांनी त्या दोघींना विचारले , ''इथे जनाबाई नावाची कोणी महिला आहे का ?'' त्यांच्या या प्रश्नाने दोघींपैकी एक महिला रागाने म्हणाली, ''हीच की जनीं, माझ्याशी गोवऱ्यांवरुन भांडते आहे.'' जनाई अशी भांडेल यावर कबिरांचा विश्वासच बसेना. ते तिथून निघून जाऊ लागले. तेवढ्यात पहिली महिला कबिराना म्हणाली, ''तुम्ही आमचे एक काम करा, या गोवऱ्यापैकी आमच्या आमच्या गोवऱ्या निवडून, वेचून द्या.'' गोवऱ्या सारख्याच दिसत होत्या, त्या ढिगाऱ्यातील कुठली गोवरी कोणाची हे कसे ठरविणार ? 'याचे कबिरांना कोडे पडले, तेवढ्यात जनाई म्हणाल्या, ''त्यात काय इतका विचार करायचा ?

अहो महाराज, हे अगदी सोपे काम आहे. तुम्ही सर्व गोवऱ्या एके ठिकाणी करा आणि त्यातल्या प्रत्येक गोवरीला कान लावा. ज्या गोवरीतून 'विठ्ठल, विठ्ठल' असा आवाज येईल ती गोवरी माझी आणि ज्यातून आवाज येणार नाही ती हिची.'' जनाईच्या उत्तराने कबिरजींना एकदम बरे वाटले. त्यांनी त्या ढिगाऱ्यातून दोन गोवऱ्या उचलून कानी लावल्या आणि काय आश्चर्य, त्या गोवऱ्यातून 'विठ्ठल, विठ्ठल' असा आवाज येत होता. त्यामुळे बहुतांश गोवऱ्या जनाबाईच्याच होत्या.

गोवऱ्यांची वाटणी झाल्यावरही कबिरजींच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह होते. जनाईनी त्यांच्या मनातील शंका ओळखली आणि म्हणाल्या, ''या गोवऱ्यातून हा आवाज कसा आला असेल याचे तुम्हाला कोडे पडलेय का ? अगदी साधी गोष्ट आहे, मी गोवऱ्या थापताना विठ्ठलाचेच नाव घेत होते. त्यामुळेच माझ्या कार्यातूनसुद्धा विठ्ठलाचे अस्तित्व जाणवू लागले.''

मुलांनो, तुम्हीसुद्धा देवावर विश्वास ठेवून आपले काम केले पाहिजे, म्हणजे तुम्ही नक्कीच त्यात यशस्वी होऊ शकाल.

श्री क्षेत्र पंढरपूर येथे महाद्वारी आषाढ कृष्ण त्रयोदशी शके १२७२ (इ.स.१३५०) या

दिवशी जनाई समाधिस्थ होऊन पांडुरंगात विलीन झाली.

परभणी जिल्हयातील गोदावरीच्या तीरावरील 'गंगाखेड' हे जनाबाईंचे गाव. त्यांच्या वडिलांनी त्यांना नामदेवांचे वडील दामाशेट शिंपी यांच्याकडे नोकरीसाठी पाठविले. तेव्हापासून त्या संत नामदेवांच्या कुटुंबातील एक होऊन गेल्या. त्या स्वतःला 'नामयाची दासी' म्हणवून घेत असत.
'दळिता, कांडिता तुज गाईन अनंता । म्हणणाऱ्या जनाबाईंना संत नामदेवांमुळे सतत सत्-संग घडला होता.

बोध : एखाद्या कामावर निष्ठा असली की आपण ते काम अधिक आत्मविश्वासाने करतो.

प्रश्न :

१) जनाबाईंची कीर्ती कोणत्या संतांच्या कानावर गेली ?

२) जनाबाईमुळे कोणाला विठ्ठलनामाची ताकद कळली ?

३) दोन महिलांचे भांडण कशामुळे झाले होते ?

१२. मध्वाचार्य

'परमेश्वराला कोणत्या नावाने साद घालू या संभ्रमात पडू नका, कोणत्याही भाषेत आणि कोणत्याही नावाने परमेश्वराचा धावा करू शकता... मनुष्यमात्राची भाषाच नव्हे, तर सगळा निसर्गही ईश्वराचे गुणगान करतो. समुद्राचा गंभीर आवाज, चिमण्यांचा नाजूक चिवचिवाट, प्राण्यांचे वेगवेगळे आवाज हे जणू परमेश्वराचं गुणगानच आहे.'

असे विचार मांडणारे तेजस्वी संन्यासी म्हणजे आचार्य मध्व.

आचार्य मध्वांची जन्मभूमी म्हणजे कर्नाटकाच्या पश्चिम किनाऱ्यांवरील उडुपीजवळील छोटेसे निसर्गरम्य गाव पात्रक. आई वेदवती आणि पिता नडिल्लाय नारायण भट्ट. इ.स. १२३८ च्या विजयादशमीच्या मुहूर्तावर मध्वांचा जन्म झाला. वडिलांनी नाव ठेवले 'वासुदेव'!

छोटा वासुदेव तीन वर्षाचा होता, तेव्हाची गोष्ट. त्याचे आई-वडील त्याला घेऊन निडिभ्युरू या गावी त्यांच्या भावाकडे काही समारंभासाठी गेले होते. त्या गडबडीत छोटा वासुदेव दिसेनासा झाला.सगळ्यांनी शोधायला सुरुवात केली पण तो कुठेच दिसेना. श्रीयुत भट्ट यांना वाटेत कुणीतरी सांगितले, एक छोटा मुलगा कोडपूर मंदिराजवळून जात होता. वडील तिकडे धावले परंतु तिथे तो मुलगा नव्हता, मुलाला शोधत शोधत नडिल्लाय उडुपीला आले. नडिल्लाय स्वत:चे इष्टदैवत असणाऱ्या अनंतेश्वराच्या मंदिरात गेले आणि छोटा वासुदेव अनंतेश्वराच्या पिंडीसमोर हात जोडून उभा असलेला दिसला. वडिलांनी डोळ्यातले अश्रू आवरत विचारले, ''अरे वासुदेवा, इतक्या लांब तू एकटाच कसा आलास?' त्या छोट्या मुलाने उत्तर दिले, ''बाबा, मी एकटा नाही आलो काही! पहिल्यांदा कोडवरुच्या शंकर नारायणांना बघितले. तिथून बन्नंजे इथल्या महालिंगेश्वराजवळ आलो आणि तिथून सरळ इथे - इथे पिंडीत विराजमान झालेल्या महादेव नारायणाला बघितले. बाबा, या

सर्व मंदिरातले देव रस्त्याने मला सोबत करीत होते आणि ते स्वत:च मला रस्ता दाखवीत होते.''

वासुदेव सात वर्षांचा झाल्यावर त्याची मुंज केली आणि वेदांचे अध्ययन करण्यासाठी त्याला गुरुगृही पाठवण्यात आले. त्यावेळचे प्रसिद्ध वेदशास्त्री तोटंतिल्लाय यांच्याजवळ वासुदेवचे अध्ययन सुरु झाले. अभ्यासाच्या वेळेस तो गुरुसमोर बसत असे पण इतर वेळी इतर शिष्यांप्रमाणे पाठांतर करीत नसे. तो त्यावेळी मैदानावर खेळत असे.

कधी धावण्याची शर्यत, कधी पोहोण्याची. पहिला नंबर वासुदेवाचा. मल्लयुद्धात तो सर्वांना मात देई. एक दिवस गुरुंनी काहीशा रागाने विचारले, ''तुला एकदा शिकवलेले पुन्हा वाचायची जरूरच वाटत नाही ना? न वाचताच, मला वाटतं, तुला सर्व काही आठवते. मी आतापर्यंत शिकवलेली सुक्तं जरा पाठ म्हणून दाखव तर! पाहू तुझे पाठांतर.''

पद्मासनात बसत वासुदेवाने गुरुजींनी जेवढे शिकवले होते तेवढे सगळे स्पष्ट आणि खणखणीत आवाजात म्हणून दाखवले. गुरुजीही प्रसन्न झाले आणि साहजिकच वासुदेवाचे वेदपठण आणि खेळ दोन्ही सुरु राहिले. वयाच्या बाराव्या वर्षीच माता-पित्याची परवानगी घेऊन वासुदेवाने संन्यास घेतला आणि मग त्यांना वैदिक नाव मिळाले 'मध्व'.

मध्वाचार्य म्हणत, ' दुबळ्या शरीरात कुशाग्र बुद्धी राहू शकत नाही. बलवान शरीरातच केवळ प्रगल्भ बुद्धी राहू शकते.' त्यांनी आपल्या शिष्यांसाठी अंगमेहनत सक्तीची केली होती.

एकदा शिष्यांबरोबर ते बद्रीकेदाराकडे निघाले होते. हिमालयातल्या घनदाट आणि निबिड अरण्यांतून ते चालत होते. शिष्यांच्या डोक्यावर पुजेच्या सामानाची गाठोडी होती. एकाएकी एका डाकूंच्या टोळीने त्यांना चहुबाजूंनी घेरले. हातात कुऱ्हाडी घेऊन घेराव घालणाऱ्या त्या डाकूंकडे पाहून शिष्य घाबरून गेले. परंतु आचार्य मध्व यांच्या चेहऱ्यावर हास्य होते. आपल्या शिष्यांपैकी उपेंद्रतीर्थ शिष्याला उद्देशून ते म्हणाले, ''उपेंद्रा, अरे बघतोस काय? ज्या हाताने तू संन्याशाचा दंड पकडला होतास, त्याच हातात कुऱ्हाड पकडण्याची ताकद असायलाच हवी. पुढे हो.'' गुरुंच्या शब्दांमळे उपेंद्रतीर्थाच्या अंगात जणू शक्ती संचारली. अगदी तुफानी वेगाने तो पुढे झाला आणि डाकूच्या हातातली कुऱ्हाड हिसकावून घेऊन त्याने त्याच्यावरच वार केला. संन्याशाचे हे शौर्य, हा पराक्रम बघून आश्चर्यचकित झालेले डाकू पळून गेले.

आपल्या तत्त्वज्ञानाच्या प्रचारासाठी, प्रसारासाठी त्यांनी भारतभर भ्रमण केले. प्रवचने देऊन अनेक शिष्यांना तयार केले. पुढच्या पिढीसाठी 'गीताभाष्य', 'ब्रह्मसूत्र निरूपण' यासारखे

चाळीस ग्रंथ लिहिले. पुरुषार्थ संपन्न जीवन जगण्याची प्रेरणा दिली. जीवनाला त्यांनी भगवद् भक्तीची जोड दिली.

'कर्तव्याला कधीही विसरू नका. तुमच्यापेक्षा जो अधिक दु:खी आहे त्याची सेवा करणे हे खऱ्या अर्थाने कर्तव्य आहे. परमेश्‍वराच्या राज्याचे तुम्ही रहिवासी आहात. लोकसेवा हाच तुमचा सरकारी कर आहे!'

'हे जग म्हणजे परमेश्वराची अद्‌भुत सृष्टी आहे. परमेश्वराची श्रेष्ठता ओळखा. स्वत:तील शक्ती ओळखा आणि त्या महाशक्तीला शरण जा.' अशी त्यांची शिकवण प्रसिद्ध झाली.

अशा प्रकारे आचार्य मध्व यांनी आयुष्यभर निरनिराळ्या तऱ्हेने परमेश्वराचे गुणगान केले. आपल्या कार्यात येणाऱ्या संकटांना त्यांनी धैर्याने व निर्भयपणे तोंड दिले. अशा प्रकारे ७९ वर्षाचे कृतकृत्य जीवन जगल्यावर इ.स. १३१९ च्या माघ शुद्ध नवमीला सर्वांचा निरोप घेत त्यांनी उत्तरेकडील 'बदरी'कडे प्रयाण केले. त्यानंतर त्यांना कुणीही पाहिले नाही.

बोध:

कर्तव्याला कधीही विसरू नका. तुमच्यापेक्षा जो अधिक दु:खी आहे त्याची सेवा करणे हे खऱ्या अर्थाने कर्तव्य आहे.

प्रश्न:

१) मध्वाचार्यांनी आपल्या शिष्यांसाठी — सक्तीची केली होती.

२) मध्वाचार्यांनी लिहिलेल्या दोन ग्रंथांची नावे सांगा.

३) मध्वाचार्यांचे मूळ नाव काय ?

१३. संत भानुदास

संत ज्ञानेश्वरांच्या काळानंतर महाराष्ट्रावर आलेले भयानक परकीय आक्रमण धार्मिक, सांस्कृतिक दृष्ट्या फार भयकारी होते. हिंदूंना आपल्या धर्माविषयी न्यूनगंड निर्माण झाला आणि त्यांची धर्मावरची निष्ठा ढासळू लागली. अशा काळात संत भानुदासांनी विठ्ठलभक्तीची पताका फडकत ठेवली. संत भानुदास हे नाथपंथाचे होते. संत भानुदास हे विठ्ठलाचे भक्त होते. विठ्ठलाच्या भक्तीच्या दर्शनासाठी त्यांनी विजयनगरचा राजा कृष्णदेवराय यांच्या महालातून श्री विठ्ठलाची मूर्ती महाराष्ट्रात आणण्याचे महान कार्य केले आहे. संत भानुदास संत एकनाथांचे पणजोबा होते. संत भानुदास यांचा जन्म इ.स. १४४८ साली देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण कुळांमध्ये झाला. ते म्हणत ''आमुची एक कुळी पंढरीचा नेम/मुखी सदा नाम विठोबाचे/''म्हणजे विठ्ठलाची भक्ती त्यांच्या कुळात परंपरेने चालत आली होती असे दिसते. आपला प्रपंच चालविण्यासाठी त्यांनी कपड्यांचा व्यापार केला. व्यापाराच्या कामात असूनही, वेळात वेळ काढून ते पंढरीची वारी नित्यनेमाने करीत. संत भानुदास यांचे विषयी एक कथा प्रसिद्ध आहे आणि या ऐतिहासिक घटनेतून संत भानुदास यांचे विठ्ठलाप्रतीचे प्रेम आपल्याला दिसून येते.

असे म्हणतात की, विजयनगर साम्राज्याचा राजा कृष्णदेवराय! एकदा पंढरीच्या श्री विठ्ठलाची मूर्ती आपल्या राज्यात नेऊन प्रतिष्ठित करावी असा त्याच्या मनात विचार आला. त्याने तसेच केले. आषाढीवारी जवळ आल्यानंतर पंढरीत वारकरी श्री विठ्ठल दर्शनासाठी जमू लागले. परंतु

विठ्ठल दर्शनासाठी आले आणि विठ्ठलच त्याच्या जागेवर नाही, पाहून वारकरी विलाप करू लागले. त्यावेळी भानुदास यांनी सर्वांना आश्वासन दिले की, 'मी विठ्ठलाला परत आणेन'. भानुदास निघाले, काही दिवसांनी ते मध्यरात्रीच्या सुमारास विठ्ठलासमोर येऊन उभे राहिले, तेव्हा ते म्हणाले, ''देवा सर्व भक्त तुझी पंढरीत वाट पाहत आहेत. चल माझ्याबरोबर'' विठ्ठलाने आपल्या गळ्यातील तुळशीची माळ नवरत्नाच्या हारासह भानुदास यांच्या गळ्यात घालून थोडा धीर धरण्याचा सल्ला दिला. भानुदास तेथून बाहेर पडले. पहाटे काकड आरतीच्या वेळी जेव्हा पुजारी तेथे आले तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, देवाच्या गळ्यात नवरत्नाचा हार नाही. राजापर्यंत ही बातमी पोचली जो कोणी चोर असेल त्यास परस्पर सुळावर चढविण्याचे फर्मान राजाने सोडले.

सैनिक सर्वत्र पसरले, पहाटेच्या वेळी तुंगभद्रा नदीच्या किनारी भानुदास अंघोळ करीत

असताना एका सैनिकास त्यांच्या गळ्यात नवरत्नांचा हार दिसला. हाच तो चोर असावा असे गृहित धरून सैनिकाने भानुदासास बंदी बनवले. त्यानंतर सुळावर चढवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी भानुदास यांच्या मुखातून अभंग प्रगटला.

सुळावर चढविण्यात येणार त्या सुळास पालवी फुटली. हा प्रसंग त्यांच्याच भाषेत पहावयास झाल्यास, ''कोरडी काष्टी अंकुर फुटले । येणे तेथे झाले विठोबाचे ।।''

ही बातमी राजापर्यंत गेल्यानंतर राजाचा थरकाप उडाला. ज्याला आपण चोर समजलो तो चोर नसून महान भगवद्भक्त आहे हे समजल्याने राजाला पश्चाताप झाला. 'माझ्या भक्तांचा छळ झाल्यामुळे मी तुझ्याकडे राहणार नाही,' असा इशारा विठ्ठलाने दिला. भानुदास विठ्ठलाला घेऊन पंढरीस निघाले. पंढरीजवळ आल्यानंतर आनंदित झालेल्या वारकऱ्यांनी श्री. विठ्ठलाची रथावरुन मिरवणूक काढली. तो दिवस होता कार्तिक शुद्ध एकादशी. तेव्हापासून कार्तिकी एकादशीला रथ उत्सव होतात व या दिवसाचे स्मरण म्हणून आजही हा उत्सव आपल्याला पहावयास मिळतो.

श्रीभानुदासांच्या भक्तितून अंशतः उतराई होण्यासाठी विठ्ठलानं गोदावरी तीरावर पैठण क्षेत्रात त्यांच्या वंशात जन्म घेतला तो संत एकनाथ महाराजांच्या रूपात.

बोध : संकटकाळी ईश्वर स्मरणाने आपल्याला धैर्य मिळते.

प्रश्न :

१) संत भानुदास कोणत्या पंथातील होते ? त्या पंथातील आणखी एका संताचे नाव सांगा.

२) संत भानुदासांनी विठ्ठलाला कसे परत आणले ?

३) भानुदासांना फाशी देत असता, त्यांच्या तोंडी जो अभंग होता, त्याचा अर्थ सांगा.

१४. संत रोहिदास

मुलांनो, संत रोहिदास यांनाच रैदास किंवा रविदास या नावांनीही संबोधले जाते. चौदाव्या शतकाच्या अखेरीस किंवा पंधराव्या शतकाच्या सुरूवातीला त्यांचा जन्म झाला असावा, असे म्हणतात.

संतोखदास आणि कलसाबाई या चर्मकार दाम्पत्याच्या पोटी त्यांचा जन्म झाला. उत्तर प्रदेशातील वाराणसी शहरातील गोवर्धनपूर या गावात झाला.

पंचवाणी या नावाने दादू, कबीर, नामदेव, रैदास आणि हरिदास या पाच संतांच्या निवडक अभंग रचनांचे एक संकलन प्रसिद्ध आहे. तसेच शिखांचे पाचवे गुरू अर्जुनदेव यांनी या संतांच्या रचना आपल्या पवित्र गुरूग्रंथसाहेब मध्येही समाविष्ट केल्या आहेत. यावरून या सर्व संतांचा त्यांच्या समकालीन लोकांवर किती प्रभाव होता, हे दिसून येते. त्यांचे आचरण आणि विचार शुद्ध चारित्र्याचे नमुने होते. देवाशी लबाडी करून, स्वार्थी हेतूने कितीही भजन-पूजन केले तरी उपयोग नाही. याउलट, हाताने कोणतेही काम करीत असताना मन जर देवाशी एकतान झाले असेल तर वेगळी तपे-तीर्थाटने करावी लागत नाहीत, असे या संतांच्या चरित्रातून दिसून येते.

उपजीविकेसाठी चर्मकाराचा व्यवसाय करीत असल्याने उपासना करण्यासाठी काम करतानाच श्रीविष्णूचे नामस्मरण तो करीत असे. हीच त्याची तपश्चर्या होती. कोणी साधुसंत त्याच्याकडे गेले तर ते त्यांना चर्माचा जोडा करून देई. यात्रेकरूंचे जोडे सांधून देई.

एकदा रोहिदास पूजेला बसला होता. त्यावेळी त्याने पूजेकरिता चामड्याच्या बुधल्यामध्ये पाणी भरून घेतले होते. आसन, गवाळी, उपकरणी ही सर्व चामड्याची होती. त्याच वेळी एक

गृहस्थ त्याच्या घरी आले आणि हे पाहून त्याला म्हणाले, ''अरे, रोहिदासा, तू चर्माच्या आसनावर बसून देवपूजा कशी करतोस? ही विष्णूमूर्ती, शाळिग्राम यांची पवित्र वस्त्रात ठेवून पूजा करायला हवी.'' त्यांचे भाषण ऐकून रविदास म्हणाला, ''तुम्ही चर्मावाचून कोणता पदार्थ पाहिला आहात का? ज्या मृदुंगावर हरिभजन होते, तो मृदुंग चर्मानेच मढविलेला असतो ना? चर्माचीच धेनू पण तिचे दूध पवित्र! त्या दुधाचे पंचामृत स्नान तुम्ही देवाला घालता. देवळात नगारा वाजतो, तो असतो चामड्याचा आणि तो वाजविणारे हात चामड्याचे आणि त्याचा नाद ऐकणारे कान सुद्धा चामड्याचेच असतात. चर्माच्या जिभेनेच वेद म्हटले जातात आणि आपण जेवतो तेही चर्माच्याच हातांनी!

शाळिग्राम गवाळ्यात (चामड्याच्या आवरणात) ठेवलेला तुम्हाला चालत नाही पण निष्कलंक, निरूपम सर्वांच्या ठिकाणी सारखा असणारा जो आत्माराम तो आपल्या या शरीराच्या चामड्यातच राहतो ना?''

या युक्तिवादापुढे बोलणारा माणूस थक्क होऊन गेला. त्याला रोहिदासाचे म्हणणे पटले.

अशीच आणखी एक कथा-

लहानपणापासूनच त्यांना भक्तिमार्गाची गोडी लागली. एकदा त्यांच्या गावातील सर्व लोक काही सणानिमित्त गंगेत स्नानाला जात होते. त्यांच्या मित्रमंडळींनीही त्यांना आग्रह केला. ''अरे रोहिदासा, आज विशेष पर्वाचा दिवस आहे. आम्ही सगळेजण पवित्र गंगेत स्नान करण्यासाठी जात आहोत. तूही चल ना आमच्याबरोबर!'' रोहिदासाने त्यांना नम्रपणे नकार दिला. म्हणाला, ''माझ्याकडे आज बरेच काम आहे आणि ते आजच्या आज पूर्ण करून देईन, असा मी शब्द दिला आहे. त्यामुळे ते काम अर्धवट सोडून मी गंगास्नानाला येऊ शकणार नाही. जर काम पूर्ण झाले नाही तर मला बोल लागेल. मी गंगास्नानाला आलो तरी माझे लक्ष इथेच राहील आणि माझा शब्द मोडला तर मला गंगास्नानाचे आशीर्वाद कसे मिळतील?''

मित्रांनो, आपल्या कामाप्रती असलेली निष्ठा आणि आपल्या शब्दाची किंमत याच गोष्टींचे प्रतिबिंब या कथेत पडते.

पुढे ते असेही म्हणाले, ''मित्रांनो, माझे मन शुद्ध असेल तर माझी चपला धुण्याची जागाही गंगाच आहे.'' त्यावरूनच वाक्प्रचार प्रसिद्ध झाला, 'मन चंगा तो कठौती में गंगा!'

त्यांचे गुरू रामानंद होते. रामानंदांनी दक्षिणेतून अध्यात्म रामायण उत्तरेत नेले आणि राम हे अध्यात्म तत्त्व आहे, असा विचार मांडला आणि खरा भक्तिमार्ग म्हणजे काय, हे समजावून दिले.

''ईश्वर हा चंदनासमान आहे आणि आपण (भक्त) पाणी. ज्या शरीरावर चंदन लागेल ते सुगंधित होऊन जाईल. ईश्वर मेघ आहे आणि भक्त, मेघाला पाहून नाचणाऱ्या मोरासारखे. प्रभु मोती आहे तर भक्त धागा आणि मोत्याबरोबर सोन्यात गुंफले जाण्याचे भाग्य भक्ताचेच?''

असे सांगणाऱ्या अभंगात शेवटी ते म्हणतात 'प्रभू हा स्वामी आहे तर आम्ही दास आहोत.' भक्तिरसाने ओतप्रोत भरलेले हे भजन रविदासांचे निर्मळ पवित्र मनच दर्शविते.

बोध : कर्मपूजा हीच ईश्वर पूजा. परमेश्वराची भक्ती मनापासून करा.

प्रश्न :

१) रविदास गंगेवर गेले नाहीत कारण.......

२) रोहिदासांच्या आयुष्यावरुन कोणता वाक्यप्रचार रूढ झाला ?

३) 'प्रभू हा .... आहे तर आम्ही .... आहोत.'

१५. संत सूरदास

सूरदासांचा जन्म १४७८ मध्ये दिल्लीजवळच्या सिंही नावाच्या एका लहान गावातील गरीब ब्राह्मणाच्या घरी झाला. जन्मत:च ते आंधळे होते. त्यामुळे त्यांना अनेक दु:खद गोष्टींचा सामना करायला लागला. मुख्य म्हणजे त्या काळात अंध माणसांना लिहिणे-वाचणे शक्य नव्हते. त्यामुळे शिक्षणाचे दरवाजे त्यांच्यासाठी बंद होते.

ते अगदी लहान असताना एक दिवशी एक गायकांचा जथा देवाच्या स्तुतिपर गाणी गात त्यांच्या घरावरून चालला होता. ती गाणी ऐकताना त्यांचे मन आनंदाने दुथडी भरून गेले आणि मला गाणं शिकायचं आहे, असा त्यांच्या मनाने ध्यास घेतला. काही दिवसांनी दुसरा एक गट अशीच देवाच्या स्तुतिपर भजने गात जात होता. सूरदासांनी पुढचा-मागचा विचार न करता त्यांच्या मागोमाग जायला सुरूवात केली. रात्री ते सर्व एका तळ्याकाठी थांबले. त्यांच्यातल्या एकाने लहान सूरदासांना विचारले, ''बाळा, तू आमच्याबरोबर का येतो आहेस?''

सूरदासांनी उत्तर दिले, ''मला गायला शिकायचं आहे.'' त्या लोकांनी त्यांना रात्रीचे जेवणखाण दिले. पण एका आंधळ्या मुलाची जबाबदारी घेणे त्यांना नको वाटले. सकाळी सूरदासांच्या नकळतच ती सर्व मंडळी निघून गेली. बिचारे सूरदास एकटे पडले. पण आता घरी परत जायचे नाही आणि काही झाले तरी गाणं शिकायचंच असे त्यांनी ठरवले. मग ते त्या तळ्याकाठीच राहू लागले. कृष्णाच्या स्तुतिपर भजने ते सकाळपासूनच गायला सुरू करत. त्यांचा आवाज मधुर होता आणि त्यांच्या आवाजातील आर्जव, व्याकुळता यांनी लोक भारावून जाऊन मोठ्या ओढीने त्यांच्याकडे येऊ लागले, प्रेमाने त्यांना जेवणखाण आणून द्यायला लागले.

अशा रीतीने हळूहळू त्यांचे बरेच भक्त झाले. एका भक्ताने त्यांना गाण्यासाठी साथ म्हणून एकतारीसारखे एक वाद्य आणून दिले. सूरदास स्वतः गाणी रचत आणि एकतारीच्या साथीने म्हणत असत. त्यांची ती भावपूर्ण अशी ब्रज भाषेतली गाणी भक्तांनी लिहून ठेवायला सुरूवात केली.

एका रात्री सूरदासांनी स्वप्नात पाहिले की कृष्णाच्या समोर ते त्याच्या स्तुतिपर भजने म्हणत होते. सूरदास झोपेतून ताडकन उठले आणि त्यांची खात्री झाली की त्यांना हे कृष्णाचे बोलावणे आलेले आहे. मनाशी निश्चय करून ते पुन्हा झोपी गेले. सकाळी उठल्यावर ते वृंदावनला जायला निघाले. त्यांचे भक्त त्यांना व्याकुळतेने विनवू लागले की आम्हाला सोडून जाऊ नका. सूरदासांनी त्यांना समजावून सांगितले आणि ते वृंदावनाच्या दिशेने चालू लागले.



वृंदावनला जायच्या रस्त्यावर मध्ये एक मोठे अरण्य होते. पण सूरदास भारावल्यासारखे चालत होते. जिथे जिथे ते जात होते तिथे तिथे लोक त्यांच्या गाण्यांच्या जादूने मोहवून जात होते आणि त्यांना त्यांच्याच गावी राहण्याची विनंती करत. पण सूरदासांना केवळ वृंदावन दिसत होते.

एके दिवशी त्यांना कळले की नदीच्या पलीकडे स्वामी वल्लभाचार्य आलेले आहेत. स्वामी वल्लभाचार्य त्यांच्या कृष्णभक्तिविषयी प्रसिद्ध होते आणि त्यांनी कृष्णाविषयी खूप लिखाण पण केले होते. सूरदासांना वल्लभाचार्यांना भेटण्याची खूप आस लागली. पण नदीच्या पलीकडे कसे जायचे ? त्यांनी त्याची व्यवस्था करायला सुरूवात केली. पण योग असा की स्वतः वल्लभाचार्यच त्यांना भेटायला नदी पार करून आले. सूरदासांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. मोठ्या भक्तिभावाने त्यांनी वल्लभाचार्यांना दंडवत घातला आणि त्यांचा आशीर्वाद मागितला. वल्लभाचार्यांनी त्यांना कृष्णाचे एक भजन गायला सांगितले. त्यांचे भजन ऐकून वल्लभाचार्यांचे मन भरून गेले. त्यांनी सूरदासांना आपले आयुष्य कृष्णभक्तीत व्यक्तीत करावे असे सुचविले. ते स्वतः सूरदासांबरोबर काही दिवस राहिले. कृष्णाच्या अनेक कथा त्यांना सांगितल्या. सूरदासांना आपले शिष्य करून घेतले आणि त्यांना वृंदावनला घेऊन गेले. वृंदावनजवळ असलेल्या गोवर्धनमध्ये श्रीनाथ मंदिराचा मुख्य गायक म्हणून सूरदासांची त्यांनी नेमणूक केली.

गायक आणि भक्त म्हणून सूरदासांची कीर्ती दूरपर्यंत पोहोचली. एकदा अकबराच्या दरबारात राजगायक तानसेनाने सूरदासांचे भजन गायले. ते ऐकून अकबर भारावून गेला. सूरदासांना आपल्या दरबारात गाण्यासाठी त्याने बोलावणे पाठविले. सूरदासांनी मोठ्या नम्रपणे सांगितले, ''मी फक्त माझ्या देवाच्या कृष्णाच्या दरबारात गातो. दुसऱ्या कुठेही गात नाही.'' अकबर मग त्यांचे गाणे ऐकण्यासाठी वृंदावनात गेला. गाणे ऐकल्यावर त्याने सूरदासांना विचारले, ''मी तुम्हाला काय देऊ. ?'' सूरदासांनी सांगितले, ''मला कधीही तुमच्या दरबारात गायला सांगू नका,'' असे स्वाभिमानी होते सूरदास! आपला एकमेव देव श्रीकृष्ण-त्याच्या चरणी त्यांच्या भावभावना वाहिलेल्या होत्या.

स्वतः अंध असूनसुद्धा त्या कमतरतेचा अडसर त्यांनी आपल्या भक्तीत येऊ दिला नाही. एकदा ते देवळात जाण्यासाठी धडपडत होते. लोकांनी त्यांना विचारले, ''तुम्हाला तर दिसत नाही. मग तुम्ही कशाला जाता देवळात ?'' त्यावर सूरदासांचे उत्तर होते- ''मी त्याला पाहू शकत नाही. पण तो तर मला पाहू शकतो ना ?

देव आपल्या भक्ताला पाहणारच असा त्यांचा ठाम विश्वास होता आणि म्हणूनच एकीकडे असा संदेश दिला की आयुष्यात कोणतीही गोष्ट करताना ती योग्य आहे की अयोग्य आहे याचा विचार करूनच माणसाने ती करावी. कारण देव नेहमीच सर्वत्र पाहत असतो.

सूरदासांच्या कृष्णभक्तिपर ब्रजभाषेत लिहिलेल्या सुमारे ८००० भजनांचा संग्रह ''सूर-सागर'' या नावाने प्रसिद्ध आहे. भाषेचा गोडवा आणि भजनातील भक्तीचा अपूर्व भाव यासाठी हा संग्रह प्रसिद्ध आहे.

बोध : आपल्याला दिसत नसले तरी परमेश्वर आपल्याला पाहत असतो. त्यामुळे आपले वर्तन सदैव योग्य असले पाहिजे.

प्रश्न :

१) सूरदासांचा जन्म कुठे झाला? ते कोणाची भक्ती करीत?

२) सूरदासांप्रमाणेच अंध असलेल्या दुसऱ्या एका संताचे नाव सांगा.

३) सूरदासांच्या भजन संग्रहाचे नाव सांगा.

१६. संत मीराबाई

संत मीराबाई ही एक अलौकिक कृष्णभक्त म्हणून ओळखली जाते. तिने आपले सर्व जीवन कृष्णाला समर्पित केले होते. कृष्णभक्तिपर तिने रचलेली गीते/भजने अतिशय भावनापूर्ण आहेत आणि त्याचबरोबर त्यातले माधुर्य अवर्णनीय आहे. आज ४०० वर्षांनंतरही तिची गीते/भजने मनात रूंजी घालतात. त्यांची जादू अशी आहे की जरी ती जाऊनसुद्धा शेकडो वर्षे झाली असली तरी तिची गीते घरोघरी गायली किंवा ऐकली जातात. कदाचित त्यामागे त्या गीतामध्ये असलेली आर्तता, कृष्णाला भेटण्याची आस, त्यासाठी तिने केलेले आर्जव ऐकणाऱ्याच्या हृदयाला भिडतात.

मीराबाई एक राजपूत राजकन्या होती. तिचे वडील राणा रतनसिंह एक शूर योद्धा होते. लहानपणीच तिची आई वारली. त्याकाळी राजपुतांवर मोगल राजांची सतत आक्रमणे होत असत. राज्याच्या आणि धर्माच्या संरक्षणासाठी राजे कायम युद्धात गुंतलेले असत. मीरेचे वडील पण सतत युद्धभूमीवर असत. त्यामुळे तिचा सांभाळ तिच्या आजोबांनी म्हणजे दूदाजींनी केला.

एक दिवशी राजमहालाच्या समोरून एक मोठी मिरवणूक वाजत-गाजत चालली होती. लहानगी मीराही मिरवणूक पाहायला गेली. ती मिरवणूक एका लग्नाची होती. नवरदेव नटून-थटून बसला होता. त्याने राणाजींना प्रणाम केला. मीरेला वाटले तो एक चालता-बोलता बाहुलाच आहे! तिने आजोबांना विचारले, ''आजोबा हा कोण होता?''

''अगं, तो नवरदेव होता.'' आजोबा म्हणाले.

मीरा म्हणाली, ''आजोबा, मलाही असा एक नवरदेव आणून द्या ना. मी त्याच्याशी खेळीन.'' आजोबा मोठ्याने हसले. पण दुसऱ्याच दिवशी त्यांनी श्रीकृष्णाची एक सुंदर सजलेली मूर्ती मीरेला दिली आणि म्हणाले- ''मीरा, हा तुझा नवरदेव! त्याला नीट सांभाळ बरं का.'' आजोबांना आपल्या या कृतीचा पुढे किती मोठा परिणाम होणार आहे याची काहीच कल्पना नव्हती. मूर्ती मिळताच मीरा आनंदाने नाचू लागली. तिला नेमके जे हवे ते मिळाले होते. ती त्या मूर्तीबरोबर खेळू लागली, बोलू लागली आणि खरोखरच तो पतिदेव आहे, असे समजून त्याच्याबरोबर मोठ्या आदराने वागू लागली.

मीरेला श्रीकृष्णाची मूर्ती मिळण्याबाबत आणखी एक गोष्ट प्रचलित आहे. दूदाजी साधुसंतांचा खूप आदर करीत असत. त्यांच्या महालात अनेक साधूसंतांचे येणे-जाणे असे. एक दिवस रईदास नावाचे एक संन्यासी त्यांच्याकडे आले. ते संत रामानंदांचे शिष्य होते. उत्तर भारतात त्यांनी वैष्णव संप्रदायाचा प्रचार केला होता. त्यांच्याजवळ श्रीकृष्णाची मूर्ती होती. ते स्वतः त्या मूर्तीची पूजा करीत असत.

मीरेने ती मूर्ती पाहिली, तिला ती खूप आवडली आणि ती आजोबांकडे 'ती मूर्ती पाहिजे' म्हणून हट्ट करू लागली. आजोबांनी तिला खूप समजावून सांगितले की, अशी दुसऱ्याच्या पूजेतली मूर्ती मागू नये. त्यांनी मीरेच्या हट्टाकडे दुर्लक्ष केले.

संत रईदास दुसऱ्या दिवशी पुढील मुक्कामी निघून गेले. इकडे मीरेने त्या मूर्तीसाठी एकच आकांत केला. रडून रडून तिचे डोळे सुजले. ती अन्नपाणी घेईना. घोटभर दूधसुद्धा प्यायला तिने नकार दिला. 'मला ती मूर्ती पाहिजे,' असा तिने धोशा लावला. आजोबांना सुचेना काय करावे, या हट्टी मुलीचे! त्यांची रात्र काळजीतच गेली. दुसऱ्या दिवशी सकाळी मात्र त्यांना चकित व्हायची वेळ आली. संत रईदास राजमहालात आले आणि आपल्या हाताने ती मूर्ती मीरेच्या हातात दिली. मीरा आनंदाने नाचू लागली.

दूदाजी रईदासांना म्हणाले- ''महाराज, आपण आपल्या नित्य पूजेतील मूर्ती या हट्टी मुलीला दिलीत? आम्ही तिला दुसरी मूर्ती देऊन समजूत काढली असती.''

रईदास म्हणाले, ''काय सांगू राणाजी, काल रात्री प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण माझ्या स्वप्नात आले आणि म्हणाले, माझी परमभक्त मीरा माझ्यासाठी रडते आहे. तुम्ही लवकर जाऊन तिला ही माझी मूर्ती देऊन या. देवाच्या या आज्ञेचे पालन करण्यासाठी मी इथे आलो आहे. मीरा सामान्य मुलगी नाही, ती मोठी भक्त आहे.'' मूर्ती मीरेच्या हातात देऊन त्यांनी तिच्या मस्तकावर हात ठेवून आशीर्वाद दिला आणि ते निघून गेले. मीरेने मनोमन संत रईदासांना आपले गुरूच मानले.

या दोन्ही कथांवरून एक गोष्ट मात्र नक्की कळते की मीरेला श्रीकृष्णाची मूर्ती लहानपणीच मिळाली आणि श्रीकृष्ण तिचा जीवनसखा झाला. त्याच्या भक्तीत ती आकंठ बुडाली.

लग्न झाल्यावर तिची श्रीकृष्णभक्ती तिच्या सासरच्यांना अजिबात पसंत नव्हती. त्यातच मग एक दिवशी तिने तिच्याबद्दल, 'ही मरत का नाही,' असे बोललेले ऐकले आणि तिच्या मनाने घेतले की खरंच कशाला जगायचे- एकदा मेले की माझ्या भक्तीत काही अडथळा येणार नाही आणि तिने आत्महत्या करण्याचा निश्चय केला.

एकांत ठिकाणी असलेल्या डोहाजवळ जाऊन तिने कृष्णाची प्रार्थना केली. त्याला म्हटले

की, ‘मला ह्या देहाची आसक्ती नाही. मी माझे सर्व तुझ्यावर सोपवून तुझ्या चरणाशी आले आहे.’ असे म्हणून तिने डोहात उडी घेतली. पण मीरा काही मेली नाही. तिला असे जाणवले की जणू काही कृष्णानेच तिला सांगितले की, ‘आत्महत्या पाप आहे. तू वृंदावनाला जा.’ मग मीरेने पुढचा-मागचा विचार न करता घर सोडले आणि पायी पायी वृंदावनाच्या रस्त्याला लागली. वृंदावनाला तिला ठायी ठायी श्रीकृष्णाचे अस्तित्व जाणवू लागले. तिच्या भक्तिपूर्ण नृत्य-गायनाने तिची कीर्ती दूरवर पसरली.

बोध : प्रेम आणि भक्ती या दोन भावनांच्या आधारे आयुष्य अर्थपूर्ण होऊ शकते.

प्रश्न :

१) मीरा लहान असताना तिच्यावर कोणाचा प्रभाव होता ?

२) मीरेला भेटायला कोणते संत आले होते ?

३) मीरेप्रमाणे महाराष्ट्रातील एका संत स्त्रीचे नाव सांगा.

१७. शांतिब्रह्म - एकनाथ महाराज

महाराष्ट्राच्या भूमीत अनेक संत उदयाला आले. त्यातील एक, एकनाथांचा जन्म शके १४५० च्या काळात नाथांचा जन्म झला. नाथांनी समाजासाठी त्याग केलेला आहे. जन्मत: मातृ-पितृ छत्र हरपलेले हे बालक, आजोबांकडे वाढले. भक्ती, ज्ञान याचा वारसा आजोबांनी दिला. या बालकाला ओढ होती संतांची, सद्गुरूंची, म्हणून घराचा त्याग करून श्रीगुरूचरणी आले. यांचे गुरू जनार्दनस्वामी किल्लेदार होते. एकदा ते ध्यानाला बसले होते. शत्रूने मागून हल्ला केला, तेव्हा त्यांची युद्धाची अस्त्रे-शस्त्रे घेऊन नाथ युद्धाला गेले. पराक्रम केला. विजय मिळवला. शत्रूला परतवले. परत आले आणि कपडे, शस्त्रे जागेवर ठेवून दिली. केलेले (कार्य) काम मुखाने बोलायचे नाही, हे ते जाणत होते. असे होते एकनाथ महाराज! आपण थोडंसं काही केले तर सर्वांना सांगतो.

नाथांनी कधी सेवा म्हणून हिशेब लिहून काढावा, एकदा तर त्यांना दोन पैशांचा हिशेब लागेना. हा युवक रात्रभर काम करत राहिला. आकडेमोड करत बसला. पहाटे चूक सापडली तेव्हा हिशेब जमला. चूक कितीही छोटी असली तरी ती चूकच, ती सुधारली पाहिजे. प्रामाणिकपणा या गुणांसाठी मेहनत केलीच पाहिजे, हे त्यांनी इथे शिकवले आहे.

एकदा नाथ लोकांबरोबर काशीयात्रेस गेले. वाहतुकीची साधने नसल्याने यात्रा खडतर असे. सर्व प्रवास पायीच चालला होता. काशीला पोहोचल्यावर, विश्वेश्वराचे दर्शन घेतले. कावडीत गंगा भरून घेतली आणि सर्वजण काशीहून रामेश्वराला निघाले. काशीची गंगा रामेश्वराला अर्पण केली की यात्रेचे पुण्य मिळते, असा समज होता. काशी उत्तरेत तर रामेश्वर दक्षिणेचे टोक.

उन्हाळ्याचे दिवस. अंगाची लाही लाही होत होती. सर्वजण थकत-दमत, पाय ओढत पुढे चालत होते. तशा उन्हात रस्त्यात मध्यावर एक गाढव तळमळत पडले होते. तहान लागलीच असणार त्याला, पण गाढवाकडे कोण लक्ष देणार ?



एकनाथांनी त्या गाढवाची पाण्यासाठी झालेली ती व्याकूळ अवस्था पाहिली. ते कळवळले. आपल्या जवळची गंगा या मुक्या प्राण्याच्या मुखात घातली तर त्याची तहान भागेल, त्याचा आत्मा शांत होईल या विचाराने त्यांनी आपल्या कावडीतील गंगेचा घडा काढला. तो घडा त्यांनी गाढवाच्या मुखी रिकामा केला. थोडे पाणी त्याच्या अंगावर शिंपडले. गाढव पाणी पिऊन शांत झाले. तहान भागल्याने ते उठून चालू लागले. इतर यात्रेकरुंना मात्र त्यांचा राग आला. धर्म बुडविणारा म्हणून त्यांनी एकनाथांना दूषणे दिली.

एकनाथंनी त्यांना समजावून सांगितले की सगुण सावळ्या विठ्ठलाने या रुपात दर्शन दिले. आपली परीक्षा पाहिली ते पुढे म्हणाले, ''सर्वांभूती आत्मा समानच असतो. त्याची तहान भागविणे म्हणजे त्या आत्म्याचा मान राखणे होते. तोच रामेश्वर समजा. आता मी पुढे येणार नाही आणि

एकनाथ पैठणला परत गेले.

एकनाथांची ही गोष्ट सर्वतोमुखी झाली. लोकांना त्यांच्याबद्दल वाटणारा आदर दुणावला.

त्याकाळी काही चुकीच्या चालीरीती (रूढी) समाजात होत्या. त्या बदलायला हव्या होत्या. यासाठी त्यांनी लोकसाहित्याचा वापर केला. भारूडे लिहून समाजातील लहान-मोठ्यांना खूप हसवले. नुसतेच हसवले नाही तर हसवत उपदेश केला. सगळ्यांना हे फार आवडले. यातील एक भारूड तुम्ही सर्वांनी ऐकले असेल. ते म्हणजे, ''विंचू चावला, विंचू चावला...''

यात साध्या-सोप्या बोली भाषेतून आपलेच दुर्गुण कसे त्रास देतात. ते सांगतात, असे हसत-खेळत शिकवले तर शिकणाऱ्याला सुद्धा राग येत नाही, असे हसत खेळत शिकवण्यासाठी त्यांनी गवळणी, वासुदेव, पिंगळा, भुत्या तसेच किती तरी खेळातून बोध केला. रामायण, भागवत यावर खूप मोठे ग्रंथ लिहिले.

एकदा एक बाई छोट्या मुलाला घेऊन आली. जोरात म्हणाली, ''माझा हा मुलगा सारखा फक्त गुळ खातो. त्याची ही सवय सोडवा बरं तुम्ही.'' नाथ फक्त हसले, तिला म्हणाले, ''या आठ दिवसांनी, सांगतो या लेकराला.'' बाई मुलाला घेऊन गेली. आठ दिवसांनी परत आली. ''सुधारा याला, ऐकत नाही माझे.'' नाथ शांतपणे म्हणाले, ''बाळा! इकडे ये. मी तुला इतकेच सांगतो, अरे फार गुळ खाऊ नये. आपल्या तब्येतीला चांगला नसतो,'' हे ऐकले आणि ती बाई नाथांवर चिडली.

''फक्त इतकेच सांगण्यासाठी मला आठ दिवसांनी इतक्या दुरून बोलावलेत. हेच तेव्हा सांगता येत नव्हते का? ''तावातावाने ती म्हणाली. नाथ मात्र शांतच होते. ते म्हणाले, '' बाई! अहो, आमच्या घरी पांडुरंगाचे मंदिर आहे. त्याला रोज पुरणाचा नैवेद्य असतो. मी स्वतः नैवद्याचे पुरण खात होतो. पुरणात गुळ असतो ना! गेले आठ दिवस मी गुळ खाल्ला नाही. तेव्हा आता या बालकाला गुळ खाऊ नकोस हे सांगण्याचा अधिकार मला प्राप्त झाला.'' त्या बालकाची आई ऐकतच राहिली. गंमत अशी की नाथांच्या त्या वचनाने बालकाने गुळ खाणे थांबवले. त्याचा सरळ अर्थ असा की, नाथांचा बोध म्हणजे 'आधी केले, मग सांगितले' असा होता.

नाही तर हल्ली मुले दहावीला आली की घरातील मोठे, ''तू अभ्यास कर, टीव्ही पाहू नकोस'' म्हणतात आणि स्वतः मात्र टीव्हीसमोर बसतात. तेव्हा मुले ऐकणार कशी? सांगण्यापेक्षा करणे महत्त्वाचे आहे. हा बोध नाथांनी आपल्या स्वतःच्या आचरणातून दिला. मातृप्रेम, भाषाप्रेम, राष्ट्रप्रेम, मानवता-समता शिकवणारे हेच शांतीब्रह्म नाथ महाराज.

बोध :

१) प्रत्येकाने स्वतः स्वतःला तपासले पाहिजे म्हणजेच आत्मपरीक्षण केले पाहिजे.

प्रश्न :

१) संत एकनाथांना कोणती उपाधी (पदवी) शोभून दिसते ?

२) संत एकनाथांनी रचना केलेल्या विशेष प्रकाराचे नाव सांगा. त्यातून ते काय साध्य करू इच्छित होते ?

३) संत एकनाथांचा जन्म कोणत्या काळात झाला ?

४) एकनाथ महाराजांचे प्रसिद्ध भारुड कोणते ?

१८. संत नरसी मेहता

गुजरातच्या सौराष्ट्रातील हे संत आहेत. आजोबा पुरूषोत्तम पंड्या, वडील कृष्णदास तर काका पर्वतदास कृष्णभक्त होते. जुनागढजवळचे हे कुटुंब होते. घरातच भक्तीचा, विशषेत: कृष्णभक्तीचा वारसा होता. त्यांच्या जीवनात बदल घडवणारा प्रसंग म्हणजे त्यांनी केलेला गृहत्याग होय. मुळात विचारी, अनासक्त वृत्ती, त्यात कुटुंबातील व्यक्तीकडून झालेला अपमान, याने नैराश्य आले. त्याच रात्री घराचा त्याग करून वनातील एका शिवालयात यांनी तप केले, तपाचा परिणाम, सगुण दर्शन झाले. 'तुला काय हवे?' विचारताच या युवकाचे प्रत्युत्तर विलक्षण होते. 'आपणास जे हवे ते द्या.' या प्रसादाबरोबर त्यांना प्रतिभा प्राप्त झाली. शिव आणि कृष्ण उपासनेने कविता स्फुरू लागल्या. भक्तिपर रचनेने समाजात नावलौकीक प्राप्त होऊ लागला. आता कुटुंबियांनीही स्वीकारले.

त्यांनी विवाह केला. पुत्र-कन्यारत्न प्राप्त झाली. याही काळात त्यांचा भर होता तो भजन-कीर्तन भक्तीवर. यांची भक्ती, सतत घडणारी अक्षर वाङ्मयाची सेवा नातलगांच्या नजरेत येत होती. सर्वच संतांप्रमाणे तत्कालीन समाजाने टाळकुटे म्हणून त्यांची अवहेलनासुद्धा केली. नरसीजी मात्र शुद्ध भक्तिवर आरूढ होते.

एकदा गावातील काही टवाळ दुष्ट मंडळींनी त्यांची फजिती करावी, या दुष्ट हेतूने नवख्या प्रवासी माणसाला त्यांच्याकडे पाठवले. पाठवणाऱ्याच्या मनात पाप-वाईट हेतू होता. साधे-भोळे भाविक

नरसीजी यांनी प्रवासी माणसाला सहाय्य केले. त्याने हातातील आयती संधी समजून नरसीजींची फजिती करायचे ठरवले. पण नरसीजीचें मन इतकं शुद्ध होते की, परिणामी हा दुष्ट कट सफल झाला नाही.

याचे कारण काय ठाऊक आहे का मुलांनो ? आपले कर्म हाच आपला खरा परिचय असतो. तसेच तो स्वच्छ आरसा असतो. आरशाची काच जितकी स्वच्छ, तितके प्रतिबिंब छान पडते. अगदी तसेच कर्माने आपल्या व्यक्तित्वाचा परिचय होतो. काम कसे तरी केले, की पूर्ण कौशल्य पणाला लावून काम केले. यावर पुढील प्रवास आधारित आहे.

'आईची खरी पोर', ही त्यांची प्रसिद्ध रचना, या कवित्वामुळेही समाजातील काही लोकांनी त्यांना त्रास दिला. तरीही नरसीजी शांत असत. 'वंदा आणि निंदा' या दोहोंच्या पलीकडे ते होते. त्यांच्या सहनशक्तीच्या, भक्तीच्या अनेक कथा आहेत. त्यातील प्रसिद्ध म्हणजे त्यांच्या वडिलांचे श्राद्ध कर्म. घरी आर्थिक टंचाई होती. पित्याचे तर्पण करायचे अशा निर्धाराने नरसीजी पत्नीला सांगून सकाळी घराबाहेर पडले. अत्यंत मेहनती असलेल्या नरसींना कुणाकडे हात पसरणे मान्य

नव्हते. एका घरी त्यांना धन घेण्यासाठी बोलावले. या बदल्यात कीर्तन करा, अशी आज्ञा केली. कीर्तन करण्याचे त्यांनी स्वीकारले. कीर्तन भक्तीने देवाची प्राप्ती करून घेण्याचा जणू निर्धारच केला. अत्यंत मधुर स्वरात भावपूर्ण कीर्तन करताना ते सारे काही विसरले. आवडते पुस्तक वाचताना, खेळताना, सिनेमा बघताना तुम्ही घरदार, वेळ सारे विसरता मुलांनो! अगदी तसेच त्यांचे झाले. त्यांच्या त्या कामामुळे त्यांना खूप भिक्षा (धन) मिळाली. यातच त्यांनी आपले पुत्रकर्तव्य पार पाडले.

'काम करताना मन लावून करायचे. सर्व कौशल्य पणाला लावून करायचे, तसेच त्याबदल्यात कसलीच अपेक्षा ठेवायची नाही, असे काम माणसाचा जीवन स्तर उंचावते. तसेच खूप समाधान, शांती, आनंद देते.' हा त्यांचा उपदेश जर आपण लक्षात ठेवला तर किती छान आनंददायी आयुष्य असेल आपले, हो ना!

त्यांनी खूप काव्यरचना केली. त्यातून त्यांनी समाजाला विचारांचे भरभरून दान दिले. त्यांच्या भक्तिरसांनी युक्त अशा आत्मचरित्रपर रचना, पौराणिक आख्याने ज्यातून धर्म, न्याय, नीती, समता बोध केला. ज्ञान, भक्ती यांचाही उपदेश केला. काव्यातील विविध रसांचा वापर करून रसपूर्ण रचना केली. कविता-काव्यरचनेसाठी हळुवार संवेदनशील मन लागते, तेच त्यांच्यापाशी होते. त्यामुळे त्यांच्या रचना, भजने लोकांच्या मुखात सहज बसल्या. त्यातून त्या बोली भाषेतल्या होत्या.

त्यांचे एक भजन तर फारच लोकप्रिय आहे. ''वैष्णव जन तो तेणे कहिये! जे पीड पराई जाणे रे!'' आपल्या जीवनाचे सार्थक करणारा बोध यात आहे. 'जो दुसऱ्याचे दु:ख जाणतो, त्याच्या दु:खात सहभागी होतो, तो खरा माणूस!' माणसाने चांगले काम करून इतरांना सहाय्य करावे, पण अहंकार धरू नये. असत्याचा आधार घेऊ नये. लोभरहित, कपटरहित जीवन असावे. आपण हाताचा वापर मुक्तपणे दान देण्यासाठी करावा. माणूस जन्माचे सार्थक करून घेतले पाहिजे.

शेवटी त्यांच्या जीवनातील एक प्रसंग पाहूया. कुंवरबाई ही त्यांची मुलगी साहसी होती. तिच्याकडे मोठा धार्मिक सोहळा होता. अनेकांना आमंत्रणे गेली. त्यांची उत्तम सोय केली. पण हे

पडले गरीब! तेव्हा या पती-पत्नींची गाईच्या गोठ्यात राहण्याची सोय केली. लोकांच्या वाईट नजरा त्यांना समजत होत्या. शेवटी एकाने त्यांना याविषयी विचारले, तेव्हा त्यांचे उत्तर फार सुरेख होते.

"माझा कृष्ण सखा अत्यंत दयाळू आहे. त्याला गाई, गोदान अत्यंत प्रिय आहे. तेच त्यांनी मला दिले, याहून थोर भाग्य ते कोणते? गौमाता पवित्र, मानवाला सकस दूध देऊन सक्षम करणारी, तिच्या संगतीत राहणे म्हणजे कृष्णसंगतीत राहणेच होय.

नरसीजींचे हे उदात्त विचार ऐकून विचारणारा खजिल झाला. जीवनाकडे बघण्याची सकारात्मक दृष्टी आपल्याला त्यांच्याकडून मिळते. थोडक्यात म्हणजे पेला अर्धा रिकामा की, अर्धा भरलेला, हा विचार प्रत्येकाने करायचा आहे. हे संत आपल्याला विचाररूपी धन देतात, उधळतात. ते वेचता आले तर पहा, आपणसुद्धा किती समृद्ध होऊ!

बोध : आपले कर्म म्हणजे काम हाच आपला खरा परिचय असतो.

प्रश्न :

१) नरसी मेहतांनी परमेश्वराकडे काय मागितले ?

२) नरसी मेहतांचे प्रसिद्ध भजन कोणते ?

३) नरसी मेहतांनी हातांचा उपयोग कशासाठी करावा असे सांगितले आहे ?

१९. समर्थ रामदास स्वामी

महाराष्ट्रामध्ये शिवराय आपले सवंगडी जमवून, मुसलमान, अत्याचारी राज्यकर्त्यांच्या विरोधात उभे रहात होते. समर्थ रामदास स्वामींचे शिष्य स्वधर्म व स्वराज्य यांच्या प्रचारासाठी सर्वत्र संचार करीत होते. लोकांशी प्रवचन-कीर्तनातून संवाद साधत लोकजागृती करीत होते. अत्याचारी मोगलांच्या पायाखाली जनता तुडवली जात होती. सातारा विभागावर वर्चस्व असलेल्या आदिलशहाचा एक मोगल ठाणेदार संगम माहुलीला राहत होता. तो फार अत्याचारी होता. गरीब ब्राह्मण, गोसावी, बैरागी यांना फार त्रास देत असे. त्याने स्नान संध्या, पुराणे, कीर्तने बंद केली.

याच सातारा जिल्ह्यात श्री समर्थ शिष्य उद्धव स्वामी यांचा मुक्काम माहुलीला होता. त्यांनी स्नानसंध्या, पूजा अर्चा केली, एवढेच काय कृष्णामाईच्या घाटावर प्रवचन सुरू केलं. ''आपण बंदी घातली असता, हा कोण प्रवचन करणारा ?'' यामुळे चिडून जाऊन ठाणेदाराने उद्धव स्वामींना पकडलं, त्यांना आणि त्यांच्या बरोबरच्या लोकांना अंधारकोठडीत टाकलं. घाबरुन सगळे लोक पळून गेले, त्यामध्ये समर्थांचा एक शिष्यही पळाला. समर्थ त्यावेळेस चाफळला होते. शिष्य दुसऱ्या दिवशी धावत-पळत आला आणि म्हणाला, ''स्वामीजी, घात झाला. आपल्या उद्धव स्वामींना ठाणेदाराने पकडलंय. त्याने

त्यांना मारहाण केली आणि तुरुंगात टाकलं. ''घडलेली हकीकत ऐकून समर्थ रागाने लालबुंद झाले. कल्याण स्वामींकडून एक छडी मागून घेऊन ते ताडकन उठून चालू लागले. काही न खाता, पिता, झपाझप चालत ते सूर्यास्ताच्या आधी माहुलीला पोहोचले. आणि ते ठाणेदाराच्या वाड्यात धडकले. ठाणेदार हुक्का ओढत बसला होता आणि आजूबाजूच्या नोकरांवर, ''मी कसा पकडला त्या गोसावड्याला,'' म्हणून स्वतःची बढाई मारत होता. इतक्यात समर्थ आले. त्यांनी एका झेपेत ठाणेदाराला मानगूट धरून खेचलं आणि हातातल्या छडीने त्याला झोडपायला आरंभ केला. ठाणेदाराचे सेवक तोंडात बोट घालून उभे होते. समर्थांच्या रूपात सगळ्यांना जणू उग्र नरसिंहाचा अवतार दिसत होता. इतक्या क्रोधासमोर उभा राहणार कोण ? ठाणेदार समर्थांच्या पाया पडला.'' स्वामी, वाचवा. स्वामी थांबा, स्वामी थांबा'' अशा विनवण्या करू लागला. समर्थांनी गर्जना केली, ''अंधार कोठडीतील कैद्यांना प्रथम बाहेर काढ.'' ठाणेदाराने नोकरांना आदेश दिला, अंधारकोठडी

उघडण्यात आली आणि उद्धव स्वामी आणि त्यांच्याबरोबरच्या मंडळींनी समर्थांचे पाय धरले. समर्थांच्या क्रोधाचा ठाणेदारावर प्रभाव पडला. ''स्वामी, क्षमा करा'' म्हणत त्याने पुन्हा-क्षमा मागितली. ''इथून पुढे मी कुणाचा छळ करणार नाही. भजन, कीर्तन पुराण बंद पडणार नाही आणि कुणावरही अन्याय करणार नाही. कुणालाच जबरदस्तीने बाटवणार नाही.'' चक्क कुराणावर हात ठेवून अशी शपथ घेतली त्याने !

त्यानंतर समर्थांचा राग निवळला. त्यांनी दयाळू अंतःकरणाने त्या ठाणेदाराला क्षमा तर केलीच पण त्याशिवाय त्याला दिलेल्या मारावर त्यांनी स्वतः झाडपाल्याचे औषध लावून मलमपट्टी केली. समर्थ दिवसभर उपाशी आहेत हे कळताच गावातील लोकांनी समर्थांच्या, उद्धव स्वामी आणि मंडळींच्या जेवणाची व्यवस्था केली. त्या रात्री समर्थांनी माहुलीच्या घाटावर, सर्व प्राणिमात्र भगवंताची लेकरं आहेत. सर्वांशी समभावाने वागावं, समाजातील गुंडगिरी साफ मोडून काढावी, अन्यायाचा प्रतिकार करावा पण वाईट व्यक्तिच्या नाशापेक्षा वाईट वृत्तींच्या नाशाला महत्त्व द्यावे. या सूत्रावर निरनिराळी उदाहरणे आणि दृष्टांत देऊन अतिशय प्रभावी प्रवचन केलं. माहुलीच्या जनतेचे कान तृप्त झाले.

मित्रांनो, जुलूम, अत्याचार होत असताना कोणीही बघ्याची भूमिका घेणे योग्य नाही. योग्य मार्गाने अत्याचाराला प्रतिकार केलाच पाहिजे. याच क्षात्रधर्म साधनेचे महत्त्व समर्थ रामदासांनी लोकांना वारंवार पटवून दिले आणि शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेत योगदान दिले.

बोध : धटासी आणावा धट । उद्धटासी पाहिजे उद्धट । खटनटासी खटनट । अगत्य करी ।

प्रश्न :

१) रामदास स्वामी कोणत्या राजाचे गुरू होते ?

२) रामदास स्वामींनी लिहिलेली एक आरती किंवा दोन मनाचे श्लोक सांगा.

३) उद्धवस्वामींना ठाणेदाराने का पकडले ?

२०. संत चैतन्य महाप्रभू

दोन मित्रांची गोष्ट आहे ही. पंडित रघुनाथ आणि निमाई यांची. पंडित रघुनाथ यांनी एक पुस्तक लिहिले. त्यांचा विचार असा होता की या विषयात त्यांच्या इतका विद्वान कोणीही असणार नाही. पण जेव्हा त्यांना कळलं की निमाई पंडित पण या विषयावर पुस्तक लिहीत आहे तेव्हा ते खूप अस्वस्थ झाले. त्यांना माहित होतं की निमाई खरंतर या विषयातले पंडित आहेत, विद्वान आहेत. ते निमाईच्या घरी गेले आणि त्यांनी विचारलं, ''काय रे निमाई, तू काय न्यायावर पुस्तक लिहितो आहेस का ? ऐकलं तर खरं तसं.'' - निमाई म्हणाला, '' अरे बाबा, तुला कोणी काही सांगितलं आणि तुला खरं वाटलं? अरे, कुठे न्याय आणि कुठे मी ? न्याय हा मोठा कठीण विषय. माझ्या मनाच्या समाधानासाठी काहीतरी लिहितोय झालं.'' पण रघुनाथ म्हणाला, ''तरीसुद्धा मला ऐकायला आवडेल बरं का.'' निमाई म्हणाले, ''जशी तुझी मर्जी. चल, गंगातटावर जाऊ. नावेत बसून फेरी मारू आणि मी तुला पुस्तक वाचून दाखवतो.'' मग काय, ते गंगाघाटावर पोहोचले आणि नावेत बसून फिरायला लागले. पुस्तक वाचन सुरू केलं. पुस्तक वाचता वाचता निमाईच्या लक्षात आलं, रघुनाथाच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहत आहेत. त्यांना काही समजेना. त्यांनी विचारलं, ''अरे, काय करतोयस तू ? काय झालं तुला, रडतोस का?'' रघुनाथ म्हणाले, ''निमाई, माझी इतक्या वर्षांची मेहनत फुकट गेली रे. तुझ्या या पुस्तकाच्या समोर माझं पुस्तक कोण वाचणार? काय किंमत देणार त्याला ? आणि खरं सांगू का, मला ज्या पुस्तकाबद्दल एवढा

गर्व वाटत होता, ते तुझ्या पुस्तकासमोर काहीच नाहीये. तुझं पुस्तकच अधिक चांगले आहे.'' निमाई हसायला लागला म्हणाला, ''एवढंच ना आणि इतकी चिंता ?'' बघता बघता त्याने पटकन आपलं पुस्तक गंगेला समर्पण केलं, आणि म्हणाले, '' अरे, हे तर केवळ एक पुस्तक आहे. मित्रासाठी तर मी आपले प्राणसुद्धा देईन.''

मुलांनो, मित्रासाठी प्राण द्यायला तयार असणाऱ्या निमाईंच खरं नाव माहित आहे का तुम्हाला? खरं नाव होतं, 'विश्वंभर, जे पुढे 'चैतन्य महाप्रभू' म्हणून लोकांना आदरणीय, वंदनीय झाले. बंगालच्या नवद्वीप नगरात वडील जगन्नाथ मित्र आणि माता शची देवी यांचा लाडका पुत्र १५४२ मध्ये, फाल्गुन पौर्णिमा होळीच्या दिवशी विश्वंभरचा जन्म झाला. पुढे आयुष्यात खूप काही घडणार होतं. निमाई केवळ अकरा वर्षाचे असताना त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला आणि निमाईंनीच आपल्या आईला धीर दिला आणि त्या आईचा आधारही बनले. अभ्यास करण्याचा वेळ सोडून ते आपल्या आईची खूप सेवा करत. पुढे स्वामी पुरींनी त्यांना दीक्षा दिली. स्वामींनी त्यांना सांगितलं,

''नवद्वीपमध्ये जाऊन कृष्णभक्तीची लोकांना दीक्षा दे. '' स्वामींची आज्ञा मानून निमाई म्हणजेच 'चैतन्य प्रभू', नवद्वीपात आले. कृष्ण भक्तिचा वसा घेऊन ते कीर्तन करत असताना सगळ्या जाती धर्माचे लोक त्यांच्याबरोबर कीर्तनात सामील व्हायला लागले. काली पूजेच्या वेळी पशुहत्या होत असे, प्राण्यांचा बळी दिला जात असे, त्याचाही त्यांनी विरोध करायला सुरुवात केली. कृष्ण भक्तीत लीन चैतन्य प्रभू, आयुष्याचा बराच काळ जगन्नाथपुरीमध्ये राहिले. वयाच्या ४८व्या वर्षी जगन्नाथ रथयात्रेच्या दिवशी, त्यांचे जीवन संपन्न झालं. बंगालमध्ये चैतन्य प्रभूंचे नाव त्यांच्या कृष्णभक्ती आणि त्यांच्या शिकवणीने अमर झालं.

बोध: खऱ्या मैत्रीची परीक्षा त्यागातच होते.

प्रश्न :

१) चैतन्य महाप्रभूंचे मूळ नाव काय ?

२) निमाईचे पुस्तक वाचून पंडित रघुनाथला काय वाटले ?

३) आपले पुस्तक पंडित रघुनाथ/निमाई ने गंगेला अर्पण केले.

२१. संत तुकाराम

संत तुकाराम हे महाराष्ट्रातील एक महान संत कवी होते. त्यांचा स्वभाव खूप शांत आणि क्षमाशील होता. त्याचे एक उदाहरण श्री. तात्याजी महिपती यांच्या भक्तीविजय या ग्रंथात आढळते.

संत तुकाराम हे एकदा एका शेताजवळून जात होते. शेतकरी शेतात काम करत होता. तो तुकारामांना ओळखत होता. त्यानं आदराने त्यांना शेतात बोलावलं. उसाचा रस प्यायला दिला. शिवाय निघताना घरच्या लोकांसाठी काही ऊस दिले.

ते ऊस घेऊन संत तुकाराम पुन्हा रस्त्याने चालू लागले. वाटेत काही मुलं दिसली. त्यांनी ते ऊस त्यांना वाटून टाकले आणि एकच ऊस घेऊन ते घरी गेले. तुकारामांची मुलेही, ''बाबांनी ऊस आणला, ऊस आणला'' असे म्हणत नाचू लागली. तो गलका ऐकून मुलांची आई बाहेर आली आणि आनंदाने म्हणाली, ''तुम्ही ऊस आणला? '' पण एकच ऊस पाहून चिडून म्हणाली, ''इतक्या दूरवर शेतात जाऊन काय तुम्ही एकच ऊस आणलात ?''

''नाही, मालकांनी मला पूर्ण भाराच दिला होता पण रस्त्यात भेटलेल्या प्रत्येक मुलाला एकेक ऊस दिला आणि उरलेला घरी आणला.

पत्नी जिजाई हिला जेव्हा आपल्या पतीने ऊस वाटून टाकल्याचे कळले तेव्हा तिला खूप संताप आला. ती त्यांच्याशी भांडायला लागली. ते मात्र शांत होते. शेवटी रागाच्या भरात जिजाईने तो ऊस संत तुकारामांच्या पाठीवर फेकून मारला. त्याचे तीन समसमान तुकडे झाले. तरीही ते रागवले नाहीत. उलट ते म्हणाले, ''बरं झालं तू या उसाचे तीन समसमान वाटे केले ते ! आता एक वाटा

तुला, आणि बाकीचे मुलांना !''

त्यांचा हा शांतपणा पाहून जिजाबाई शांत झाली. आपल्या पतीशी भांडण केल्याचा तिला पश्चाताप झाला. तिने तुकारामांची क्षमा मागितली. संत तुकाराम हे सहिष्णुतेची मूर्तीच होते. घेण्यापेक्षा देण्यातला आनंद अनुभवणारे ! तीच त्यांची भावना आणि श्रद्धा होती.

संत तुकाराम यांची कीर्ती ऐकून छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या सेवकांच्या हाती संत तुकाराम यांच्यासाठी मशाल, छत्र, घोडे आणि रत्ने पाठविली. सेवकांनी नम्रपणे तो नजराणा देत तुकारामांना म्हटले, '' आपण परमेश्वराचे परम भक्त आहात आपला सन्मान करण्यासाठी महाराजांनी हा नजराणा पाठवला आहे. सेवक आणि घोडे, पालखी पाठवली आहे. आपण आमच्यासोबत राजदरबारात यावे.''

यावर तुकाराम नम्रपणे म्हणाले, ''महाराजांना सांगावे की परमेश्वराची आपल्यावर सदा कृपा राहील परंतु मला माझ्या विठ्ठलापासून विन्मुख करू नका. माझी कुटी माझा राजमहाल आहे आणि माझ्या विठ्ठलाचे मंदिर हाच माझा राजदरबार आहे.''

संत तुकारामांचे हे निर्लोभी रूप पाहून राजे भारावले आणि स्वत: अलंकार, वस्त्रे, घेऊन देहू गावी आले. हे सर्व वैभव पाहून तुकाराम महाराज म्हणाले,

सोने आणि माती । आम्हा समान हे चित्ती ।

यातून तुकारामांच्या वैराग्य वृत्तीचेच दर्शन घडते. पण तरीही सर्व सांसारिक व्यक्तिंसाठी मात्र त्यांचा उपदेश होता,

भिक्षापात्र अवलंबणे । जळो जिणे लाजिरवाणे ।

हा बाणा असायलाच हवा आणि तरीही धन किती कसे मिळवावे आणि कसे खर्च करावे हे सांगातांना म्हटले आहे.

'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे । उदास विचारें वेच करी ।।

म्हणजे कोणाकडे उधार, पैसे मागणे, भीक मागणे म्हणजे आपली प्रतिष्ठा गमावणे होय आणि उत्तम-स्वच्छ व्यवहार ठेवून धन जोडावे आणि मग जणू ते आपले नाहीच' अशा विचाराने योग्य ठिकाणी खर्च करावे.

बोध : प्रतिकूल परिस्थितीतही मन आणि मस्तक शांत ठेवून काम केले पाहिजे.

प्रश्न :

१) उसाच्या या कथेत तुकारामांचे कोणते गुण दिसून येतात ?

२) शिवाजी महाराजांनी पाठविलेला नजराणा पाहून तुकारामांची प्रतिक्रिया काय होती ?

३) तुकारामांसाठी त्यांची कुटी हा .... होता आणि विठ्ठल मंदिर ...... होते.

२२. संत तुलसीदास

आपण सर्वांनी वाल्मिकी ऋषींचे नाव ऐकलेले आहे. 'रामायण', संस्कृत भाषेतील हे आपले भारतीयांचे आदिकाव्य त्यांनी लिहिले हे ही आपण ऐकलेले आहे. या महाकाव्यातून त्यांनी प्रभू रामचंद्राचे चरित्र वर्णिले.

पण हे महाकाव्य संस्कृतमध्ये असल्याने ते सर्वसामान्यांना समजत नव्हते. उदार अंत:करणाच्या संतांना-कवींना ह्या गोष्टीचे फार दु:ख होते. त्यामुळे संस्कृत रामायणाची अनेक भारतीय भाषात रुपांतरे झाली. अनेक कवींनी आपापल्या शैलीत 'रामकथा' सांगितली-काव्यबद्ध केली.

संत तुलसीदास यांनी सांगितलेली रामकथा ही 'तुलसीरामायण' म्हणून प्रसिद्ध झाली. तुलसीदासांनी त्याला 'रामचरितमानस' असे नाव दिले आहे.

श्री तुलसीदासांना गोस्वामी म्हणत, ''गो म्हणजे इंद्रिये; त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारा, संसारातील सर्व मायामोह जिंकून संन्यासाप्रमाणे जीवन जगणारा तो 'गोस्वामी'.''

तुलसीदासांचा जन्म पंधराव्या शतकाच्या शेवटी झाला आणि सतराव्या शतकाच्या आरंभापर्यंत ते जगले. त्यांचे जन्मस्थान आणि जन्मकाल याबाबत अनेक मते आहेत.

आत्मायन दुबे आणि तुलसीबाई या उत्तरप्रदेशातील राजापूर येथे रहाणाऱ्या दांपत्याला हनुमंताची खूप भक्ती केल्यानंतर एक पुत्र झाला. असे म्हणतात की, हे बाळ जन्मल्याबरोबर रडले नाहीच, त्याने 'राम राम' म्हणावयास सुरुवात केली. म्हणूनच तुलसीदासांचे नाव 'रामबोला' (राम म्हणणारा) असे पडले. तुलसीदासांच्या जन्मानंतर लवकरच त्यांच्या आईचा मृत्यू झाला, वडिलांनी त्यांचा त्याग केला. काही वर्षे आजीने सांभाळ केला आणि तिच्या मृत्यूनंतर गावातील लोकच

त्यांचे पालक बनले. हनुमान मंदिरातील प्रसादावरच ते जगले. ते म्हणतच की ''मंदिर हेच माझे घर आणि ईश्वर हेच माझे मातापिता.''

नरहरीदास नावाचे गृहस्थ एक प्रसिद्ध विद्वान, अभ्यासक आणि कीर्तनकार होते. राजापूरच्या हनुमान-मंदिरातच त्यांनी मुक्काम केला आणि रामायणावर अनेक प्रवचने दिली. ती प्रवचने तुलसीला फार आवडली. तो मोठ्या भक्तिभावाने ती ऐकत असे. शांत दृष्टी, सुदृढ आणि सुडौल बांधेसूद शरीर, भव्य कपाळ आणि तेज:पुंज चेहऱ्याच्या तुलसीला नरहरीदासांनी विचारले, ''शिष्य होशील ?'' आनंदातिशयाने तुलसीने नरहरीदासांच्या चरणी लोळण घेतली.

गुरुजवळून त्यांनी वेद, उपनिषदे, पुराणे, दर्शने, संस्कृत आणि प्राकृत भाषा असे अनेक विषयांचे ज्ञान संपादन करीत, रात्री भजने करीत चौदा वर्षे प्रवास सुरू होता. ते रामायणावर केवळ प्रवचनेच करीत नव्हते तर स्वतंत्रपणे कवनेही रचीत.

शिक्षण पूर्ण झाल्याची खात्री होताच स्वतः नरहरींनी त्यांचा विवाह दीनबंधू पाठक यांची सुशील, सुंदर कन्या रत्नावलीसोबत करून दिला.

एकदा बायको माहेरी गेली होती. संतकवी तुलसीदास यांना तिची खूप आठवण येऊ लागली. ते रात्री तिला भेटायला गेले. ती पावसाळी रात्र होती. तरी ते भिजत भिजत गेले. वाटेत एक नदी आडवी आली. तिला पूर आला होता. तथापि त्या पुरात उडी मारुन ते पोहत नदी पार करून गेले. रात्रीची वेळ होती, म्हणून दार न ठोठावता, बाहेर लटकणाऱ्या रस्सीला पकडून वर चढले आणि खिडकीतून घरात शिरले. त्यांना पाहून रत्नावलीला धक्का बसला. तिने विचारले, ''तुम्ही घरात कसे आलात ?'' ''बाहेर लटकणाऱ्या रस्सीला पकडून,'' ते उत्तरले. ''रस्सी कुठे आहे, तो तर फांदीला लटकलेला साप होता.'' आपल्यासाठी, क्षुद्र शरीरासाठी पतीने एवढी यातायात करावी हे तिला पटले नाही.

''माझा देह तर अस्थी आणि चामडी यांनी भरला आहे. माझ्यावर एवढी प्रीती ? असेच प्रेम रामावर केले तर भव सागराचे म्हणजे जन्म मृत्यूचे भय रहाणार नाही.'' त्या शब्दांनी त्यांचे डोळे उघडले. ''येथून पुढे मी प्रभू रामचंद्रांना विसरणार नाही. प्रभू रामचंद्रच माझे सर्व काही'' असा त्यांनी ध्यास घेतला आणि त्या दिवसापासून ते 'तुलसीदास' झाले.

ते जरी संस्कृतचे पंडित असले तरी ते काव्य बोली भाषेतच लिहीत आणि लोकांना उपदेशही करीत असत. भक्तीचा उपदेश, संदेश ते लोकांना त्यांच्याच बोलीत देत असत.

तुलसीदास नंतर अयोध्येला गेले. काशीमध्ये असताना त्यांनी 'जानकी मंगल' आणि 'पार्वती मंगल' अशी दोन पुस्तके लिहिली होती. अयोध्येला एकांतवासात 'रामचरित मानस' लिहिले. प्रभू रामचंद्रांनी आपल्या आचरणाद्वारे आदर्श पुरुष कसा साकार केला हे त्यांनी अत्यंत प्रभावीपणे मांडले आहे. या ग्रंथात राजा, तसेच आदर्श नेता या स्वरुपात तर एक आदर्श स्त्री म्हणून सीतेचे चित्र रेखाटले आहे. इतकेच नाही तर लक्ष्मण, हनुमान, भरत, बिभीषण, जटायू, गुह, सुग्रीव हे सारे आदर्श बंधू, सेवक भक्त अशा अनेक भूमिका त्या त्या व्यक्तिंच्या रुपाने अजरामर-अक्षय आदर्श झाल्या आहेत.

ज्यावेळी लोक घोर निराशेने ग्रासले होते, पारतंत्र्याच्या अंधारात चाचपडत होते. त्यावेळी 'रामचरित मानस'ने त्यांच्यासाठी संस्कृतीचा प्रकाश देणाऱ्या दीपाचे काम केले. सत्य आणि

पावित्र्य ह्यांच्या सुंदर आदर्शांचा आविष्कार आणि प्रसार केला. त्यांनी आपल्या रचना काशीक्षेत्री प्रकाशित केल्या.

त्यांची विद्वत्ता आणि प्रतिभा काशीच्या लोकांनी मान्य केली. त्यांनी गोस्वामींचा सन्मान केला. तुलसीदासांना लोक 'वाल्मिकींचा 'अवतार मानू लागले. हजारो लोकांना भक्तीचे महात्म्य उमगले आणि ते प्रभू रामचंद्राचे उपासक बनले.

काही दुष्ट लोकांनी 'रामचरित मानस'ची निंदा करण्याचा प्रयत्न केला पण त्यामुळे त्याचा अधिकच गौरव झाला. ते लोक 'रामचरितमानसची' एक प्रत घेऊन अद्वैती विद्वान पंडित श्री. मधुसूदन सरस्वती ह्यांच्याकडे गेले आणि पुस्तक देऊन विचारले, 'या पुस्तकाबद्दल आपले मत काय ?' लोकांना वाटले गोस्वामी भिन्न परंपरेचे आहेत. श्री मधुसूदन ह्या पुस्तकाची निंदा करतील पण झाले उलटेच । पंडित मधुसूदन सरस्वती यांनी संपूर्ण पुस्तक वाचले आणि ते म्हणाले, ''काव्याच्या उद्यानात एक रोपटे तुलसीचे आहे. त्यावर काव्य सौंदर्याची फुले फुलली आहेत आणि त्यावर रामरुपी फुलपाखरु गुंजारव करून आनंद वाढवीत आहे.''

मुलांनो,

'गुणी गुणं वेत्ति, न निर्गुण:,' हेच खरे, गुणवान व्यक्तिलाच गुणांची पारख असते, ज्याच्याकडे कोणताही गुण नाही त्याला नसते.

तुलसीदासांनी सर्व तीर्थक्षेत्रांची यात्रा केली होती. जीवनाच्या अखेरच्या काळात ते काशी क्षेत्रीच राहिले. इ.स. १६२३ मध्ये काशी क्षेत्री असी नदीच्या घाटावर तुलसीदासांनी समाधी घेतली. (विक्रम संवत १६८०)

बोध: प्रत्येकाच्या ठिकाणी ईश्वरी अंश आहे. यास्तव नेहमीच दुसऱ्याच्या गुणांचे कौतुक करावे. परोपकार करावा.

प्रश्न:

१) तुलसीदासांच्या ग्रंथाचे नाव काय?

२) रामकथा सांगणारा संस्कृत ग्रंथ कोणी लिहिला ?

३) तुलसीच्या काव्यनिर्मितीविषयी श्री. मधुसूदन सरस्वती काय म्हणाले? त्यावरुन काय लक्षात येते ?

२३. भगवान रामकृष्ण परमहंस

मुलांनो, भगवान रामकृष्ण परमहंस हे बंगालमधील एक थोर संत होते. ज्यांनी स्वामी विवेकानंद यांच्या सारखा थोर शिष्य जगाला दिला, त्यांची महती काय सांगावी ? श्री. नीलकंठ नांदुरकर यांनी त्यांच्या जीवनावर 'परमहंस' ही कादंबरी लिहिली आहे. त्या कादंबरीतून हा प्रसंग घेतला आहे.

भगवान रामकृष्ण हे पैशाच्याबाबत अतिशय निर्मोही होते. आपल्या मनाला त्यांनी जाणीव पूर्वक तसे वळण लावले होते. संत पदवीला जाण्यापूर्वी ते एका हातात पैसे व दुसऱ्या हातात माती घेऊन बसत आणि मनाला समजावत ''पैसे आणि माती सारखीच आहेत.'' याचा परिणाम असा झाला की, त्यांच्या मनात तो विचार खूपच ठसला. मग पैशाचा स्पर्शही त्यांना सहन होईनासा झाला.

एकदा आपल्या शिष्य वर्गाला त्यांनी सांगितलं, ''मला पैशाचा स्पर्श सहन होत नाही.'' ते ऐकणाऱ्या लोकांमध्ये एक अति चिकित्सक तरुण होता. त्याचे नाव होतं श्री. नरेंद्र दत्त. त्याचा या विधानावर विश्वास बसेना. त्यानं ठरवलं की या विधानाची शहानिशा करायची.

थोड्या वेळाने भगवान रामकृष्ण काही कारणाने खोलीबाहेर पडले. नरेंद्राने त्यांच्या गादीखाली एक रुपयाचं नाणे ठेवलं. भगवान रामकृष्ण पुन्हा खोलीत आले आणि गादीवर बसले. त्याक्षणी त्यांना एकदम विजेचा धक्का बसावा तसा झटका बसला. ते एकदम ओरडत उठले, ''कोणीतरी या गादीखाली पैसे ठेवले आहेत''. मग नरेंद्राची खात्री पटली की, ते खरोखर निर्मोही आहेत.

हे नरेंद्र कोण होते ? तेच तर आपले स्वामी विवेकानंद होते.

मुलांनो, आपल्या मनाला जाणीवपूर्वक योग्य ते वळण लावले तर मन किती निर्मोही बनते ते पहा. तुम्हीही मनाला असेच योग्य ते वळण लावण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करा.



रामकृष्ण परमहंस यांचे मथुराबाबू नावाचे एक शिष्य होते. त्यांनी एक सुंदर मंदिर बनवले आणि विष्णूमूर्तीची प्रतिष्ठापना केली आणि या मूर्तीला मौल्यवान असे हिरे मोत्यांचे दागिने, उत्तम वस्त्रे प्रदान केली. देवळाची कीर्ती चहुदिशांना पसरली आणि अनेक भाविक दर्शनासाठी येऊ लागले.

एका रात्री काही चोरांनी देवाचे सगळे अलंकार चोरून नेले. उजाडताच ही वार्ता वाऱ्यासारखी सगळीकडे पसरली. मथुराबाबूंच्या कानावर पडताच ते धावत मंदिरात आले.

मूर्तिसमोर उभे राहून विलाप करू लागले. विष्णूला म्हणाले, ''देवा, आपल्याकडे गदा आहे, सुदर्शन चक्र आहे. यापूर्वी कितीतरी राक्षसांना आपण या शस्त्रांनी शासन केले आहे. मग आजच का गप्प राहिला ? चोर आपले वस्त्राभूषणे चोरून घेऊन गेले तरी आपण शांत कसे राहिलात ? त्यांना अद्दल का घडविली नाहीत ?''

बाजूला उभे असलेले रामकृष्ण सर्व ऐकत होते. ते हसत हसत मथुराबाबूंना म्हणाले, ''मथुराबाबू! ईश्वराला तुमच्यासारखा वस्त्राभूषणांचा मोह नाही. म्हणून तो त्यांच्यावर पहारा ठेवत नाही. दुसरे असे की त्याला काय कमी आहे की अशा क्षुल्लक दागिन्यांसाठी त्याने आपल्या दिव्य

शस्त्रांचा प्रयोग करावा ?''

मथुरा बाबूंना आपली चूक समजली. विष्णू आणि परमहंस दोघांपुढे ते नतमस्तक झाले.

एकदा रामकृष्ण परमहंस आपल्या शिष्यांबरोबर फिरत फिरत नदी किनारी पोहोचले. तिथे काही कोळी मासे पकडत होते, नदीजवळ शिष्यांना बोलावून रामकृष्ण म्हणाले, ''या जाळ्यात अडकलेल्या माशांचे निरीक्षण करताय ना ?''

कितीतरी मासे जाळ्यात अडकले होते. काही निष्प्राण पडले होते. त्यांनी जाळ्यातून सुटका करून घ्यायचा कोणताच प्रयत्न केला नाही. काही मासे बाहेर पडायचा प्रयत्न करीत होते पण निघू शकत नव्हते. काही खूप प्रयत्नांनी यशस्वी झाले आणि नदीत जाऊन पुन्हा पोहू लागले.

परमहंसांनी शिष्यांना विचारले, ''किती प्रकारचे मासे बघितले तुम्ही ?'' एका शिष्याने उत्तर दिले. ''तीन प्रकारचे. पहिल्या प्रकारचे मासे जे समोर आले ते स्वीकारुन मृत्यू पावले. दुसऱ्यांनी प्रयत्न केला पण ते अयशस्वी झाले आणि तिसऱ्यांनी प्रयत्न केले आणि अखेर ते यशस्वी झाले.''

रामकृष्ण म्हणाले, 'अगदी बरोबर, काही माणसे दुरवस्था प्राप्त झाली तरी, विनाश समोर आला तरी प्रयत्न करीत नाहीत आणि नष्ट होतात. दुसरी काही अपयशी होतात पण निदान त्यांना प्रयत्न केल्याचे समाधान लाभते आणि काही आपले ध्येय गाठेपर्यंत अथक आणि अविरत प्रयत्न करतात आणि यशस्वी होतात.

मुलांनो, आपले माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलामही म्हणत असत, 'स्वप्न झोपेत पाहू नका. जागेपणी पहा आणि ते पूर्ण करण्यासाठी अविश्रांत मेहनत-प्रयत्न करा.''

बोध : अथक प्रयत्न हेच यशाचे गमक. स्वप्नपूर्तीसाठी अविश्रांत मेहनत आवश्यक.

प्रश्न :

१) रामकृष्ण परमहंसांचे सुप्रसिद्ध शिष्य कोण ?

२) रामकृष्ण परमहंस एका हातात माती आणि एका हातात पैसे घेऊन बसत.
त्या कृतीचा अर्थ सांगा.

३) ईश्वर शस्त्राचा वापर कधी करेल ?

२४. संत गुलाबराव महाराज

दि. ६ जुलै १८८१ हा संत गुलाबराव महाराजांचा जन्मदिवस. अमरावती येथील लोणी टाकळी येथे साध्या कुणबी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. संपूर्ण नाव-गुलाब गोंदूजी मोहोड. त्यांचे बालपण मात्र माधान येथे गेले- हे ही अमरावतीतच आहे. त्यांचे वडील रघुजीकाका त्यांना 'गुल्या' या नावाने हाक मारीत. त्यांची पाटीलकी होती. हा वारसा मुलाने चालवावा ही त्यांची इच्छा होती. ईश्वरी नियोजन मात्र वेगळेच होते.

जन्मतः गुलाबराव महाराज डोळस होते. ८/९ महिन्यांचे असताना डोळे आले तेव्हा एक चुकीचे औषध डोळ्यात घातले गेल्यामुळे त्यांना अंधत्व आले ते कायमचेच! वयाच्या एका वर्षाच्या आत डोळे गेले तर वयाच्या ३४ व्या वर्षी त्यांनी जीवनप्रवास संपविला. या अवघ्या ३४ वर्षात त्यांनी इतके अध्ययन केले, ते ज्ञान अंतरी रुजवले, ग्रंथनिर्मिती केली, की त्यांचे काम पाहिले की त्यांची परिस्थितीविरुद्ध झगडण्याची जिद्द लक्षात येते.

आईही बालपणीच गेल्यामुळे त्यांच्या आजीने (आईच्या आईने) त्यांना लोणीस वाढविले. आजीने खूप प्रेमाने लाड पुरविले.

रोज जेवायला बसले की महाराज चंदनाचे गंध घेऊन बोटाने इकडे तिकडे शिंपडीत. जेवतानामध्येच दोन्ही हात पुढे करीत. आजी विचारे'', हे रे काय चालले आहेत तुझे चाळे ?''

त्यावर लहानगा गुलाब म्हणे, ''अग बाई (आजीला ते बाई म्हणत) एक सुंदर लेकरुं आलं होतं!''

''कुठलं रे लेकरु? कसं होतं?'' बाई आश्चर्याने विचारी कारण तिला तर कुणीच दिसत नसे.

महाराज म्हणत, 'अग त्याच्या डोक्यावर मुकुट होता. कपाळाला केशरी गंध- कानात कुंडल होती....'

जणू काही डोळ्यापुढं भगवंताची बालमूर्तीच उभी आहे असे ते वर्णन करीत.

दहावे वर्ष लागले असता महाराजांना आजोळहून माधानला आणण्यात आले. वडिलांनी दुसरे लग्न केले होते. सावत्र आई छोट्या गुलाबचा तिरस्कार करीत असे. एक काकूच काय ती त्यांच्यावर माया करी.

चांदुर बाजार येथे रुपचंदजी नावाचा एक गुजराथी ब्राह्मण रहात होता. तो ज्योतिष वगैरे सांगत असे. सावत्र आईने त्याला म्हटले, ''तुम्ही आमच्या घरी येऊन सांगा, की हा मुलगा मूळनक्षत्रावर जन्माला आला आहे; तेव्हा याला घरात ठेवू नका. याला महानुभावांना देऊन टाका.'' परंतु रुपचंदजी हा भला माणूस होता, त्याने असले भलते-सलते आणि खोटे नाटे सांगायचे साफ नाकारले. त्यांच्या या सरळ स्वभावामुळे महाराजांचा व त्यांचा खूप जवळचा आणि आपलेपणाचा संबंध जडला. बरोबर कुणालाही न घेता ते रात्री-अपरात्री त्यांच्या घरी जात. ते लोक निजले असले तर महाराज गंमत करण्याच्या उद्देशाने घराबाहेर उभे राहून भिकाऱ्याच्या सुरात 'भाकर वाढाऽऽ' असे ओरडत. मग कुर्याभाई हे रुपचंदांचे पुत्र त्यांना दार उघडून घरात घेत व दोघे मिळून रुपचंदजींबरोबर ज्योतिष-संस्कृत वगैरे विषयांवर चर्चा करीत.

त्यांची शिक्षणाची-ज्ञानाची ओढ इतकी तीव्र होती की उन्हात डोक्यावर पुस्तकांची, ग्रंथांची

पेटी घेऊन ते गावोगावी चालत प्रवास करत. माधान, अमरावती, चांदुर बाजार, बडनेरा, अशा अनेक ठिकाणी जाऊन जाणकारांकडून ते समजावून घेत, वाचून घेत. श्रवण केलेल्या विषयावर मनन करून त्यावर स्वतंत्र भाष्ये लिहित. स्वतःचे विचार सोप्या भाषेत मांडत.

गोड बोलून जाणकार ज्ञानियांकडून आपली भारतीय परंपरा, रुढी, तत्वज्ञान, उपासनापद्धती समजून घेत त्यांनी चार वेद, सहा शास्त्रे, अठरा पुराणे यांचे अध्ययन सखोल केले, तसेच पाश्चात्य तत्त्वज्ञ यांचे विचार मूळातून समजावून घेतले. या ग्रंथांचे श्रवण करून, त्याचे चिंतन करून त्यांचे विचार परिपक्व झाले. ते विचार आपल्या बोली भाषेत लिहून त्यांनी अक्षर वाङ्मय-सारस्वताचे सेवा रुपी पूजन केले.

''त्यांनी विविध विषयावर आपली मते मांडली आहेत. १३४ संस्कृत प्रचुर ग्रंथ रचना त्यांनी केली आहे. असे अद्‍भुत कार्य जगात आजवर कुणी केले नाही, ''असे थोर परमसंगणककार 'डॉ. विजय भटकर' म्हणतात. ''परंपरा, धार्मिकता, तत्त्वज्ञान यांचे अंगाने समन्वयादी विचार सगळ्यांनी समजून घेतले पाहिजेत. हे अलौकिक वैचारिक धन जतन केले पाहिजे'' असे जेष्ठ आधुनिक संत प.पू. गोविंदगिरी महाराज म्हणतात.

''अध्यात्म हा भारतीय भूमीचा सहजगुण आहे तरीही विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची कास धरली तर भारत विकासाच्या पंथावर येईल'' असे ते स्पष्टपणे बोलत याचे मुख्य कारण मानवी विकास सर्वांगीण झाला पाहिजे. त्यांचा मूळचा पिंड शिक्षकाचा होता. त्यांच्या स्वतःच्या समदृष्टीने लिहिलेल्या ग्रंथावरुन त्यांना 'समन्वयादि महर्षि' असे म्हणतात.

आपल्या देशात अनेक धर्म, अनेक संप्रदाय-पंथ आहेत. या सर्वांच्यात काही समान बाबी आहेत, त्यावर प्रकाश टाकून त्यांनी समन्वयवाद मांडला.

मुलांनो! तुम्ही ऐकलेत तर नवल वाटेल ते म्हणजे आज आपण संत ज्ञानेश्वरांचे जे छायाचित्र पाहतो ना, ते महाराजांनी ध्यानात पाहिलेले आणि कल्पनेने रंगवलेले आहे, तेच आज सर्वमान्य आहे. संस्कृतीचे, कलेच्या माध्यमातून दिलेले हे मोठे देणे आहे. हे मोठे कृष्णभक्त होते. जात्यावरच्या ओव्या, अभंग, विरहिणी गौळणी, लावण्या असे अनेक काव्य प्रकार त्यांनी हाताळले. संगीत, नृत्य,

नाट्य, अभिनय त्यांना काहीच वर्ज्य नव्हते. या अविष्कारात एक कृष्णभाव सामावलेला होता.

असे अल्पायुषी, महान कर्मयोगी जे ज्ञानभक्ती रसात डुंबलेले होते, यांचे चरित्र मोठे झालात की मुद्दाम वाचा. ते पदोपदी प्रेरणा देऊन नवी दृष्टी देईल.

बोध : शारीरिक अक्षमतेवर मात करून उत्तम कार्य करता येते.

प्रश्न :

१) गुलाबराव महाराजांना काय नाव दिले गेले ?

२) गुलाबराव महाराजांनी किती आणि कोणत्या विषयावर ग्रंथ लिहिले ?

३) गुलाबराव महाराज निस्सीम भक्ती करीत, त्या महाराष्ट्रातील संताचे नाव सांगा.

२५. संत गाडगे बाबा

एकोणिसावे व विसावे शतक महाराष्ट्राच्या दृष्टीने मोठे भाग्याचे होते. कारण या कालखंडात महाराष्ट्रात खूप मोठी माणसे होऊन गेली. यापैकी एक म्हणजे संत गाडगे बाबा. गाडगे बाबांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून अंधश्रद्धा, अज्ञान, शिक्षण, कर्मकांड याविषयी जनजागृती केली, वैचारिक प्रबोधन केले. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ मध्ये विदर्भात झाला. घरची शेती खूप, पण वडील व्यसनी असल्याने सारे कर्जापायी बुडाले. वयाच्या दहाव्या वर्षी वडिलांचे छत्र हरपले आणि आईसोबत डेबू म्हणजेच गाडगेबाबा आपल्या आजोळी दापोऱ्यात आले. डेबू हे त्यांचे लहानपणीचे नाव. त्यांचे पूर्ण नाव डेबू झिंगरानी जानोरकर.

एकदा पूर्णा नदीत आंघोळीला गेले असताना कमरेला खोचून ठेवलेला एक रूपया पाण्यात पडला. तेव्हा डेबू हळहळला. पण त्या प्रसंगाने अकस्मात सावध झाला. विचार करू लागला. हा रूपया गेला तसाच देहही एक दिवस कालप्रवाहात वाहून जाणार. त्यापूर्वी आपला मनुष्य जन्म सार्थकी लागला पाहिजे. काही तरी केले पाहिजे असे त्यांना वाटू लागले. दुसऱ्याच दिवशी त्याने फाटकी वस्त्रे अंगावर घातली, अंगणात एक गाडगे होते ते घेतले, एक काठी घेतली, डोक्याला फडके गुंडाळले आणि घराबाहेर पडले. हातात खराटा घेऊन सकाळी गावात जायचे, दिसेल ती घाण झाडून काढायची. खापरात शिळे अन्न मागून खायचे असा त्यांचा दिनक्रम सुरू झाला. सुरूवातीला चोर, वेडा म्हणून त्यांनी मारही खाल्ला. पण तोंडातून कधी ब्र काढला नाही. संध्याकाळ झाली की, गावातल्या देवळात दगडांचे टाळ केले की, ''गोपाला गोपाला देवकीनंदन गोपालाच्या'' गजरात भजन चालायचे हळूहळू लोक जमू लागले. बाबा रात्रभर कीर्तन करीत. स्वतः जागत,

लोकांना जागवत, नवीन विचार रुजवत बाबांचे कीर्तन म्हणजे एकपात्री अभिनयच जणू. लोकांनाच प्रश्न विचारून त्यांच्याच बोलीभाषेतून त्यांच्याच चुका त्यांना पटवून देत.

त्यांनी मैदाने, गावे स्वच्छ केली, अनेक ठिकाणी गोशाळा उभ्या केल्या. वृद्धाश्रम काढले.

देव दगडात नाही तर माणसात आहे हे पटवून देण्यासाठी ते लोकांना सांगत, ''लोक हो! देव दगडात नाही, तीर्थांत नाही. दरिद्री नारायणाच्या रूपाने तो तुमच्यासमोर उभा आहे. त्याच्या डोळ्यांतला एक अश्रू पुसला की, देवाला अभिषेक घडतो हो !''

एकदा मुलाच्या खुशालीचे पत्र वाचून घेण्यासाठी कुलकर्ण्यांच्या घरची गाडाभर लाकडे फोडताना एकाला पाहून बाबा गहिवरले. त्यांनी स्वत: लाकडे फोडून दिली. या प्रसंगाने बाबा हादरले. तेथून पुढे त्यांनी कीर्तनातून सर्वात जास्त प्रचार केला तो शिक्षणाचा. विद्यादानाचे काम करणाऱ्यांना ते देवतुल्य मानत. निरक्षर माणसात शिक्षणाविषयी किती ही तळमळ! बाबांनी देणगीतून शाळा काढण्यावरही जोर दिला.

प्रत्येक कीर्तनात शिक्षणाबरोबरच अस्पृश्यतेविरूद्ध बाबांची कधी समजावणी तर कधी खडसावणी असे. ते सांगत, कुणी जात विचारली की एकच उत्तर द्या- माणूस!

''भुकेलेल्यांना अन्न द्या, तहानलेल्यांना पाणी द्या. उन्हात आहे त्याला सावली द्या, दु:खात आहे त्याला प्रेमाचे चार शब्द बोला, कुष्ठरोग्यांची सेवा करा, शिकतो म्हणेल त्याला शिक्षण द्या, मुक्या प्राण्यांवर दया करा, आळस सोडून द्या, हुंडा देऊ नका-घेऊ नका, माता-पित्यांची सेवा करा, श्रम केल्याशिवाय खाऊ नका''. असा संदेश त्यांनी कीर्तनातून दिला.

अशा संत गाडगे महाराजांनी आपल्या उपेक्षित, कष्टकरी, शेतकरी, कामकरी समाजाची सेवा करीत दि. २० डिसेंबर १९५६ रोजी बेळगावजवळ पेठी नदीच्या पुलावर आपला प्राण सोडला.

या त्यांच्या समाजसेवेच्या कार्याला आदरपूर्वक नमन करून, त्यांचे कार्य समोर ठेवून आपणही त्याच विचाराने वागण्याचा प्रयत्न करू.

संत गाडगे महाराजांच्या कार्याचा सन्मान करीत महाराष्ट्र शासनाने २०००-२००१ पासून ''संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची'' सुरूवात केली.

बोध : गरिबांची सेवा हीच ईश्वरसेवा.

प्रश्न :

१) गाडगे महाराज कोणाला देवतुल्य मानीत असत?

२) गाडगे महाराजांनी कीर्तनाच्या माध्यमातून कशाची शिकवण दिली?

३) गाडगे महाराजांचे प्रमुख शस्त्र कोणते होते?

२६. आचार्य रमण महर्षि

आपल्या देशात अनेक महापुरुष होऊन गेले, ज्यांनी जनसेवा आणि राष्ट्रसेवा यासाठी आपले आयुष्य समर्पित केले. लोकांबरोबर राहून, लोकांच्या सुखदु:खात सहभागी झाले आणि त्यांच्या दु:खाचा भार हलका करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. महर्षी रमण हे असेच एक महापुरुष होऊन गेले. सर्वसाधारण जनतेची सुखदु:खे त्यांनी आपली मानली आणि त्यात ते वाटेकरी झाले.

महर्षी रमण यांचा जन्म तिरुचुली या तामिळनाडूमधील एका छोट्याशा गावी इसवीसन १८७९ मध्ये झाला. त्यांचे लहानपणीचे नाव व्यंकटरमण असे होते. त्यांचे आई-वडील दोघेही परमेश्वर भक्त आणि मोठ्या दयाळू अंतकरणाचे. व्यंकटरमणाचे लहानपणीचे आयुष्य अगदी साधे, इतर मुलांसारखेच खेळण्याबागडण्यात गेले. थोराड प्रकृती, दणकट बांधा आणि तेजस्वी चेहरा त्याला लाभला होता. अभ्यासात त्याचे मन विशेष रमत नव्हते पण 'कुलोतुंगच्या' 'पेरिय' पुराणाच्या तामिळ कवितांतील एक-एक कविता त्याने वाचली होती. त्या कवितेत शैव संतांचे वर्णन केले होते. शैव संतांच्या कथांनी त्याच्या मनावर खोल ठसा उमटविला होता. ''मी, त्या संतांसारखा होऊ शकेन काय ?'' या गोष्टीची आस त्याच्या मनाला लागली आणि त्याच लहान वयात व्यंकटरमणाने ईश्वराची मौन आराधना करायला प्रारंभ केला.

एकदा व्यंकटरमण यांच्या घरी एक पाहुणे आले होते. विचारपूस करताना कळलं की ते अरुणाचलचे आहेत. 'अरुणाचल' या शब्दाने व्यंकटरमणांवर जादूच केली. अधीरपणे त्याने अरुणाचलसंबंधी प्रश्न विचारायला सुरुवात केली. ''कुठे आहे अरुणाचल ?'' पाहुण्यांनाही त्याच्या

उत्सुकतेचे कौतुक वाटले. त्यांनी सांगितले,'' तू तिरुवन्नामलाईचे नाव ऐकलं नाहीस का ? तेच अरुणाचल.''

त्याक्षणी व्यंकटरमणने ठरवले की काही झाले तरी निदान एकदा तरी अरुणाचलला जायचंच. त्याच्या मनाने तिरुवन्नामलाईचा अक्षरशः ध्यास घेतला. एके दिवशी मनाचा हिय्या करून, घरातली माणसं आपल्याला जाऊ देणार नाहीत, म्हणून गुपचूपपणे घर सोडून ते निघाले. निघताना भावाला पत्र लिहून ठेवले,'' मी परमात्मा ईश्वराच्या शोधासाठी जात आहे. माझा शोध घेऊ नका.'' भावाच्या कॉलेजची फी भरण्यासाठी म्हणून त्यांना पाच रुपये दिले होते, त्यातले तीन रुपये त्यांनी घेतले आणि तितक्याच तुटपुंज्या पैशांवर ते तिरुवन्नामलाईला ईश्वराच्या शोधासाठी निघाले. प्रचंड खस्ता खात, कधी रेल्वेने तर कधीकधी मैलोन मैल अंतर पायी तुडवत ते तिरुवन्नामलाई येथे पोचले. मनात आनंदाचे कारंजे थुई थुई नाचत होते. धावत धावत ते अरुणाचलेश्वराच्या मंदिरात गेले. मंदिर उघडे होते. अत्यंत आनंदाने ते त्या परमेश्वराच्या समोर ठाकले, ज्याच्या शोधासाठी त्यांनी जिवाचे रान केले होते.

पण आत्ता कुठे मूर्तीचे नुसतेच दर्शन झाले. मग खरी कठोर साधना सुरु झाली. ईश्वर चिंतनात भान हरवून गढून गेले आणि या चिंतनातून, स्वतःला विचारलेल्या निरनिराळ्या प्रश्नांमधून त्यांना ज्ञानाचा प्रकाश लाभला. ज्ञानाच्या प्रकाशामुळे त्यांच्या मनातल्या सर्व शंका कुशंकांचे निराकरण झाले, 'एकांत साधना सोडून जनकल्याणाचे कार्य करायचे', असा त्यांनी संकल्प केला. लोकांचे दुःख दूर करायचे, त्यांच्या समस्या सोडवायच्या असा निश्चय केला.

एकदा कार्याला सुरुवात केल्यावर लोकांचा ओघ त्यांच्या भेटीसाठी येऊ लागला. आपल्या व्यथा, गाऱ्हाणी घेऊन लोक त्यांना भेटत. कधीकधी, ईश्वर, आत्मा-परमात्मा याविषयी पण प्रश्न विचारत. प्रत्येक व्यक्तीनुसार समस्या/प्रश्न निराळे पण व्यंकटरमण सर्वांचे समाधान करीत. मुख्य म्हणजे त्यांच्याशी बोलल्यावर लोकांना मनःशांती मिळू लागली. व्यंकटरमण यांना, समजावून सांगण्याची उत्तम हातोटी होती. एच्चमाळसारखा पती आणि पुत्र शोकाने गांजलेली स्त्री असो की गणपतीशास्त्रींसारखे गाढे विद्वान असोत, सर्वांना दुःखावर उतारा मिळत असे. प्रश्नांना योग्य उत्तरे

मिळूवन, विचार करण्याची दिशा मिळत असे. त्यांच्या अद्वितीय गुणांमुळे लोक त्यांना ‘महर्षी’ आणि ‘भगवान’ असे संबोधू लागले आणि व्यंकट रमण हे ‘रमण महर्षी’ म्हणून ओळखले जाऊ लागले. श्रद्धाळू भक्तांची अलोट गर्दी त्यांच्या दर्शनासाठी, तसेच समस्यांचे, दुःखाचे निराकरण व्हावे म्हणून लोटू लागली.

हळूहळू रमण महर्षी यांच्या शिष्यांच्या प्रेरणेने पर्वतशिखरावर एक आश्रम उभारण्यात आला. त्याला ‘रमाणाश्रम’ म्हटले जाऊ लागले. महर्षीजवळ जे श्रद्धावान आणि सेवावृत्तीचे शिष्य रहात होते त्यांच्या अविरत प्रयत्नांनी हा आश्रम आकाराला आला. तिथे एक मंदिर उभारले गेले. मग देशाच्या सर्व भागातूनच नव्हे तर परदेशातूनसुद्धा लोक दर्शनासाठी, आध्यात्मिक जीवनात मार्गदर्शन मिळवण्यासाठी भरभरून येऊ लागले. अशा रीतीने ‘रमणाश्रम’, अध्यात्माचे एक प्रसिद्ध केंद्र बनले.



आश्रमाची कीर्ती वाढत गेली आणि वाईट प्रवृत्तीच्या माणसांना आश्रमातून चोरी करायची बुद्धी झाली. एक दिवस शिष्यांचा वेश धारण करून चोरांची टोळी आश्रमात घुसली आणि आश्रमातील सर्व किमती वस्तू त्यांनी चोरल्या. एका चोराने तर महर्षींना एक ठोसा लगावला. त्याला शिष्यांनी पकडले. शिष्य म्हणाले,''महर्षी, याला कठोर शिक्षा करण्याची अनुमती द्या.'' पण महर्षींनी साफ नकार दिला. ते शिष्यांना म्हणाले, '' सापाचा स्वाभाविक धर्म डसण्याचा, विंचवाचा नांगी मारण्याचा तर बैलाचा शिंगे उभारण्याचा असतो. आपणही त्यांच्यासारखंच व्हायचे काय ? चोरी करणे हा चोराला आपला धर्म वाटू दे, पण क्षमा करणे हा आपला धर्म आहे. क्षमा करण्यातच खरी माणुसकी आहे. आपण चोराला सोडून देऊ या.'' चोराकडे वळून ते म्हणाले, ''तुमचे समाधान झाले नसेल तर मला अजून मारा.'' ते शब्द ऐकून चोरांना पश्चाताप झाला आणि त्यांनी चोरीची कबुली दिली. क्षमायाचना केली. चूक करतो त्याने क्षमायाचना करणे आणि क्षमायाचना करणाऱ्याला क्षमा करणे ही फार महत्त्वाची गोष्ट आहे, असे ते मानत. आपल्याच दाताने आपली जीभ चावली गेली तर आपण काय दात पाडतो का ? बुद्धिवान माणसाने माणसाला समजावून सांगून त्याच्यात सुधारणा घडवून आणावी, त्याला चांगला माणूस बनवावे. चोरांना पण उपदेश करून त्यांनी सोडून तर दिलेच पण त्यांच्या मनातही चोरांबद्दल किल्मिष नव्हते. हसत हसत आपल्या शिष्याला ते म्हणाले.'' ''या चोरांनी माझी पण चांगली पूजा केली.'' नांगी मारणाऱ्या विंचवाला १०८ वेळा पुन्हा पाण्यात सोडून देणाऱ्या महाराष्ट्रातील पैठणच्या एकनाथ महाराजांच्या विचारांची ही दाक्षिणात्य आवृत्ती.

रमण महर्षी म्हणत, ''माणसाने आपल्या कार्यात आणि व्यवसायात मग्न रहावे. माझे सुख आणि वैभव याचा अति विचार करू नये, कारण त्यापासून सुखाची प्राप्ती होत नाही.'' सामान्य माणसांना पण असा मुक्तीचा मार्ग रमण महर्षींनी दाखवला आहे.

बोध : क्षमा करणे हा मानवाचा धर्म आहे.

प्रश्न :

१) चोरांना पकडल्यावर रमण महर्षींची प्रतिक्रिया काय होती ?

२) रमण महर्षींचा आश्रम कुठे उभारण्यात आला ?

३) 'चोरांनी माझी पण चांगलीच पूजा केली' या वाक्याचा अर्थ सांगा.

२७. स्वामी रामतीर्थ



एक संन्यासी, समोर बसलेल्या श्रोत्यांना गोष्ट सांगत होता. 'जुन्या काळातील गोष्ट. घोडा अजून स्वतंत्र होता, मर्जीनुसार चरत-फिरत असे कारण अजून तो माणसाचे वाहन बनला नव्हता.

एकदा घोडा आणि बारशिंग्याचे झाले भांडण. बारशिंग्याकडे हत्यार होते, त्याची शिंगे! बलवान बारशिंग्याने आपल्या शिंगांनी घोड्याला घायाळ केले. जखमांनी त्रस्त झालेला घोडा बारशिंग्याला शिक्षा देण्याचा मार्ग शोधू लागला. काही विचार करून तो माणसाजवळ जाऊन म्हणाला, ''मला आपली मदत द्याल का, बारशिंग्याला हरविण्यासाठी?' त्याची विनंती मान्य करीत मनुष्य म्हणाला, ''चल मला बारशिंग्याकडे घेऊन.'' घोड्याने मनुष्याला पाठीवर बसवून रानात नेले. तिथे गेल्यावर मनुष्याने बारशिंग्याचा पराभव केला आणि त्याला दूर पिटाळून लावले. घोड्याला मोठा आनंद झाला आणि माणसाचे आभार मानून तो म्हणाला. ''माझे काम झाले. आपण आता कृपा करून माझ्या पाठीवरुन उतरावे.'' परंतु संधिसाधू माणसाने मांड सोडली नाही; घोड्याला आपला गुलाम बनविले. बघा, घोड्याला शत्रूवर विजय तर मिळवता आला, पण परिणामी तो स्वातंत्र्य गमावून बसला.''

ही कथा सांगणाऱ्याचे नाव होते स्वामी रामतीर्थ. ते कठीण विषय सोप्या भाषेत समजावून सांगायचे. वर सांगितलेल्या कथेचे तात्पर्य काय? घोडा आणि बारशिंगा दोघेही जंगलवासी. त्यांचे आपापसातील भांडणाचे फळ काय, तर दोघेही माणसाचे गुलाम बनले. याच प्रकारे एखाद्या देशात आपसात यादवी माजली, की परकीय तेथे आक्रमण करून, त्या देशाचे मालक होऊन बसतात आणि त्या देशातील मूळ लोकांना गुलाम करतात.

स्वामी रामतीर्थांचे पूर्ण नाव गोस्वामी तीर्थराम असे होते. 'रामचरित्र मानस' या काव्याचे कर्ते

संत तुलसीदास यांचे ते वंशज होते. २२ ऑक्टोबर, १८७३ रोजी दीपावलीच्या शुभ पर्वावर त्यांचा जन्म झाला. घरची गरिबी होती आणि आईही त्यांच्या लहानपणीच गेली. रामतीर्थांचे शरीर दुबळे होते; पण ते अत्यंत बुद्धिमान होते. त्यांची स्मरणशक्ती तीव्र होती.

पंजाब बोर्डाच्या मॅट्रिकच्या परीक्षेत त्यांनी पहिला क्रमांक मिळविला. वडिलांच्या इच्छेविरुद्ध महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते लाहोरला गेले. अनेक संकटांना तोंड द्यावे लागूनही बी.ए. च्या परीक्षेत त्यांना सर्वाधिक गुण मिळाले.

तीर्थराम शरीराने फार दुबळे होते. याबद्दल त्यांना फार वाईट वाटे. मोकळ्या हवेत फिरणे व व्यायाम करणे या गोष्टींचे महत्त्व त्यांना अनुभवाने कळले. पोषक आहार, आणि योग्य व्यायाम घेऊन शरीर मजबूत बनविण्याकडे त्यांनी लक्ष पुरविले आणि शरीर बलवान बनविले.

एम.ए.ची पदवी प्राप्त केल्यानंतरही त्यांची ज्ञानलालसा पूर्ण झाली नाही. जैमिनी, कपिल, कणाद, गौतम, व्यास, शंकराचार्य, पतंजली अशा असंख्य ऋषींच्या ग्रंथांचे आणि कबीर, तुलसीदास, सूरदास, तुकाराम यांचे साहित्यही वाचले होते. हिमालयाची भ्रमंती, उपनिषदांचा अभ्यास असे करता करता अखेरीस सन १८९८ मध्ये ब्रह्मपुरी येथे त्यांना आत्मसाक्षात्कार झाला.

सतत ६ महिने ते हिमालयात तपश्चर्या करीत राहिले. सन १९०१ मध्ये त्यांनी संन्यास घेण्याचा संकल्प केला. तीर्थराम आता ‘स्वामी रामतीर्थ’ बनले.

स्वामी रामतीर्थांनी दोन वर्षे अमेरिकेत भ्रमण केले. अमेरिकेतील अनेक नगरे त्यांच्या सदुपदेशाने भारावून गेली. स्वामींचे व्यक्तिमत्व त्यांना स्वामी विवेकानंदांसारखेच प्रभावशाली वाटले. त्यांच्या भाषणांची पुस्तके तिथे 'In the woods of God Realisation,' ‘ईश्वरी साक्षात्काराच्या वनात’ या नावाने प्रसिद्ध झाली.

स्वामी विवेकानंदांप्रमाणेच त्यांनी भारतीयांना जागे करण्याचा वसा घेतला. ते म्हणत, “भारताने स्वतंत्र झालेच पाहिजे व तो स्वतंत्र होईलच. स्वातंत्र्य प्राप्त होते ते आत्मबलिदानानेच. पुढील दहा वर्षात असंख्य ‘राम’ निर्माण होतील. ते दुर्बलता आणि अज्ञान दूर करतील आणि मग या भूमीत नव्या चैतन्याचा संचार होईल. व्यक्तीधर्मापेक्षा मातृभूमीच्या सेवेचा धर्म श्रेष्ठ आहे. स्वदेशाच्या पुढे, जाती, संप्रदाय आणि तत्सम अन्य गोष्टींचे स्थान गौण आहे.”

स्वामीजी गोड गोष्टी सांगून आपले म्हणणे मांडत. सुख-दुःख, स्वर्ग-नरक या गोष्टी बाहेरच्या नाहीत तर त्या आपल्या अंतरंगातच आहेत. त्या आपल्याच कर्माचे फळ आहेत हे स्पष्ट

करण्यासाठी ते पुढील गोष्ट सांगत.

'खेळता खेळता एका मुलाला आपली सावली दिसली. आश्चर्यचकित होऊन तो सावलीच्या डोक्याला हात लावण्याचा प्रयत्न करू लागला. पडछायेला स्पर्श करण्यासाठी तो जसजसा पुढे पळे, तसतशी पडछायाही दूरदूर पळे. अखेरीस मुलाची आई म्हणाली, ''अरे, तू स्वत:चेच डोके का धरीत नाहीस?'' आईच्या सूचनेप्रमाणे मुलाने आपल्या डोक्याला हात लावला आणि आनंदाने म्हणाला, ''आई, सावलीचेही हात तिच्या डोक्याला लागले. मज्जा आहे.''

याप्रमाणे, स्वामी म्हणत, ''आपली शेकडो दैवते, स्वर्ग-नरक इत्यादी सर्व आपल्या आतच आहेत. तुम्हाला सत्य जाणून घ्यायचे असेल, तर बाहेरील आभास विसरून आत्म्याच्या शोधासाठी अंतर्मुख व्हा.''

'आपल्या दैनंदिन जीवनातही माणसाने पारमार्थिक दृष्टीने वागावे' हाच स्वामी रामतीर्थांच्या सर्व कथांचा सारांश होता. म्हणूनच त्यांनी आपल्या शिकवणुकीला 'व्यावहारिक वेदांत' असे नाव दिले.

स्वामी रामतीर्थांचे आयुष्य अवघे तेहतीस वर्षांचे. त्यांना स्वदेशाच्या उत्कर्षाची आस्था होती. ते म्हणत, 'भारत म्हणजे काय? अरे मीच भारत! माझे शरीर जणू भारताची भूमी. दोन पोटऱ्या म्हणजे मलबार आणि चोलमंडल; माझे चरण कन्याकुमारी, माझे डोके हिमालय, माझे केस गंगा, ब्रह्मपुत्रादि प्रचंड नद्या, माझे हृदय जणू राजस्थान व गुजरातचे मरुस्थल; माझे पसरलेले बाहू म्हणजे पूर्व-पश्चिम दिशा!

रामतीर्थांना वाटे प्रत्येक व्यक्ती देशभक्त असावी. स्वदेशाचा सन्मान वाढविण्यासाठी त्याने अपार परिश्रम करावे. स्वामीजी याच हेतूच्या पूर्ततेसाठी जगले.

बोध:

१) एखाद्या देशात यादवी माजली की परकीय तेथे आक्रमण करून त्या देशाचे मालक बनून जातात.

२) स्वर्ग-नरक, सुख-दु:ख या गोष्टी बाहेर नाहीत, त्या आपल्या अंतरंगातच आहेत.

३) स्वदेशाचा सन्मान वाढविण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने अपार परिश्रम करावेत.

प्रश्न:

१) स्वामी रामतीर्थ—या संतांचे वंशज होते.

२) स्वामी रामतीर्थांचे व्यक्तिमत्व अमेरिकन लोकांना– यांच्याप्रमाणेच प्रभावी वाटले.

३) स्वामी रामतीर्थांनी आपल्या शिकवणुकीला '——' असे नाव दिले.

२८. योगमूर्ती श्री जनार्दन स्वामी



कवठी या महाराष्ट्रातील जुन्या सावंतवाडी संस्थानातील गावात गोडसे घराण्यात जनार्दनचा जन्म झाला. कवठी या गावात निसर्ग हेच मोठे दैवत होते. गावातील सगळे या रम्य परिसरालाच देव मानीत असत. घरची गरिबी, त्यामुळे जनार्दनच्या वयाची १०-१२ वर्षे घरातच गेली. वडील त्याला दुकान चालवता चालवता लेख, वाचन, अंक, पाढे, गुणाकार, वजाबाकी शिकवत असत. अभ्यास घेता घेता वडिलांना जनार्दनची प्रखर बुद्धिमत्ता जाणवली. त्यांनी हिंमत करून जनार्दनला वेद शिकण्यासाठी बाहेरगावी पाठवायचे ठरविले.

रत्नागिरी जिल्ह्यातील कसबा संगमेश्वर आणि आंजर्ले या दोन गावी वेदांचे अध्ययन घेण्यासाठी जनार्दन राहिला. वेदांचा अभ्यास करायचा तर संस्कृत चांगले आले पाहिजे म्हणून संस्कृत शिकायला तो नाशिकला गेला. सुमारे १५ वर्षे तो अत्यंत खडतर परिस्थितीत घराबाहेर-बाहेरगावी राहिला आणि अध्ययन पूर्ण केले.

लबाडीची त्यांना खूप चीड येत असे. कोकणातील मालवण या गावची गोष्ट. तिथे समुद्रकिनाऱ्यावर एक बाई खाणावळ चालवीत असे. तिच्याकडे जेवून नावेत बसून जाणाऱ्या प्रवाशांना ती जेवायला वाढायला मुद्दाम उशीर करीत असे. बोट सुटायची वेळ व्हायची, प्रवासी म्हणायचे, ''काकू वाढता ना?'' ही ''हो...हो...आता वाढते'' म्हणत वेळ काढायची. बोट सुटायची वेळ झाली की प्रवासी बिचारे घाईघाईने दोन घास पोटात ढकलून बोटीत बसायचे. हिचे अन्न वाचायचे. फायदा अधिक होई. जर्नादन स्वामीनी ह्या वागण्याचे निरीक्षण केले आणि तिला धडा शिकवायचे

ठरवले. ते काही प्रवाशांबरोबर जेवायला बसले. बोटीची वेळ झाली, प्रवासी दोन घास खाऊन बोटीत चढले. परंतु जनार्दन स्वामी शांतपणे जेवत राहिले. त्यांनी बाईंना म्हटले, 'ताई भात वाढता ना!' वर आणखी म्हणाले, 'भात संपला असेल तर शिजवायला ठेवा. मी तोपर्यंत बसतो.'' बाई म्हणाल्या, 'अहो तुमची बोट चुकेल' जनार्दन स्वामी म्हणाले.

''बोट चुकली तर उद्या जाईन.''

आता यावर काय बोलावे हे बाईंना सुचेना. झाला प्रकार तिच्या लक्षात आला. जनार्दन स्वामींनी तिला चांगलीच समज दिली. बाईने क्षमा मागितली आणि इथून पुढे कोणाचीही अशी क्रूर थट्टा करणार नाही असे कबूल केले.

१९२८-२९ च्या सुमारास स्वामीजींचा मुक्काम बारा ज्योतिर्लिंगापैकी प्रसिद्ध त्र्यंबकेश्वर क्षेत्री होता. तिथे परशुराम मंदिरातील वेदशाळेत स्वामी वेद शिकवत असत. स्वामींनी आईला पत्र लिहिले आणि विचारले, ''आई, संन्यास ध्यावा असा माझा विचार आहे. तू परवानगी देशील ना?''

भावाने आईला तिचे मत विचारले, आई म्हणाली, ''आम्ही सगळे संसारात बुडालो आहोत. तो परमार्थ मार्गाला जातो आहे, तर त्याला कशाला आडवू? त्याला परवानगी कळव.'' इतक्या सहजपणे आईची परवानगी मिळाल्याने, काशी क्षेत्री जाऊन स्वामींनी विधीपूर्वक संन्यास घेतला.

ज्या काळात योगाविषयी अज्ञान होते, त्या काळात अत्यंत चिकाटीने स्वामीजी, घरोघर जाऊन, आबालवृद्धांना योगासने शिकवीत होते. मुख्यतः महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि बिहार या प्रांतात!

खांडवा, अमरावती करीत करीत स्वामीजींच्या योगगंगेने नागपूरला विराट रूप धारण केले. १९४८ साली त्यांनी अमरावतीला योगसंमेलन भरविले व 'भारतीय योगाभ्यासी मंडळाची' स्थापना केली. त्यानंतरच त्यांनी 'सुलभ सांघिक आसने,' ''प्राणायाम'' ही पुस्तके लिहिली. शास्त्रीय संशोधन करून योगासनाच्या स्वरूपात सूर्यनमस्कार विकसित केले. त्याचे सचित्र तक्ते तयार केले व या सर्व साहित्याची किंमत ते अत्यल्प ठेवीत असत.

योगासनांच्या प्रचारात स्वामींचे महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे सांघिक आसने. तोपर्यंत योगासने



ही एकट्याने करावयाची मोक्षप्राप्तीची कठोर तपस्या आहे असेच वातावरण होते, परंतु स्वामीजींच्या सोप्या सांघिक पद्धतीमुळे गावोगावी योगाचा प्रचार सुलभ झाला. आज तर संपूर्ण विश्वाने २१ जून ला 'योग दिवस' म्हणून मान्यता दिली आहे.

डॉ. श्री. भा. वर्णेकर नागपूर विद्यापीठात संस्कृत विभागाचे प्रमुख होते. एक दिवस ते योगाभ्यास मंडळात गेले. स्वामीजींनी एक कागद त्यांच्या हाती दिला. त्यात लिहिले होते, 'जीवनामध्ये आरोग्य, सुख आणि समाधान प्राप्त करण्याचा एकमात्र उपाय योगाभ्यास हाच आहे. प्रत्येकाने आपल्या शक्तीप्रमाणे नित्य योगाभ्यास करावयास हवा.'' डॉ. वर्णेकरांनी विचारले, 'हे काय आहे ?' स्वामीजी हसून म्हणाले, 'या अर्थाचा संस्कृत श्लोक आताच करून दाखवा! डॉ. वर्णेकरांनी तत्काळ स्वामींच्या संदेशाचा संस्कृत श्लोक तयार केला.

' समाधानाय सौख्याय नीरोगत्वाय जीवने।

योगमेवाभ्यसेद् प्राज्ञः यथाशक्ति निरन्तरम्।।

योगाभ्यासी मंडळाच्या मुद्रेवर हाच संदेश कोरला गेला. पुढे नागपूरच्या रामनगरातील योगाभ्यासी मंडळात स्वामींजींच्या समाधी स्थळावरही हाच श्लोक अंकित केला आहे. योगाभ्यासी मंडळाचे ते बोधवाक्य म्हणूनच प्रचलित झाले आहे.

आयुष्याची सुमारे ५० वर्षे त्यांनी अखंड योगप्रचार केला होता. पण २ जून १९७८ रोजी रात्री ९.१५ वाजता शरीराचे चैतन्य अनंत चैतन्यात विलीन झाले. स्वामीजी म्हणत, 'आसनामुळे शरीर शुद्ध होते. प्राणायामामुळे मन शुद्ध होते आणि ध्यान धारणेमुळे बुद्धीचा विकास होतो. सात्त्विक विचार सुचतात, स्थिरता प्राप्त होते.

बोध: आसनांमुळे शरीर शुद्ध होते, प्राणायामामुळे मन शुद्ध होते आणि ध्यान धारणेने बुद्धीचा विकास होतो. चिकाटीने आणि सातत्याने अभ्यास करून आत्मोन्नती करावी.

प्रश्न:

१) जनार्दन अध्ययन करण्यासाठी संगमेश्वर व आंजर्ले या गावी राहिला. विधान चूक आहे/ बरोबर आहे.

२) स्वामीजींचे महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे. —

३) योगाभ्यासी मंडळाच्या मुद्रेवर कोणता संदेश कोरला गेला ?

Sanskruti
Samvardhan
Pratishthan
संस्कारेणैव हि संस्कृति